# OBS translationQuestions

## आवृत्ती 4.1

[mr]

# कॉपीराइट आणि परवाना

**OBS translationQuestions**
**तारीख:** 2017-11-28
**आवृत्ती:** 4.1
**द्वारे प्रकाशित:** BCS

**Open Bible Stories**
**तारीख:** 2017-11-28
**आवृत्ती:** 4.2
**द्वारे प्रकाशित:** Door43

# License

## Creative Commons Attribution-ShareAlike 4.0 International (CC BY-SA 4.0)

This is a human-readable summary of (and not a substitute for) the license.

### You are free to:

- **Share** — copy and redistribute the material in any medium or format
- **Adapt** — remix, transform, and build upon the material

for any purpose, even commercially.

The licensor cannot revoke these freedoms as long as you follow the license terms.

### Under the following conditions:

- **Attribution** — You must attribute the work as follows: "Original work available at https://door43.org/." Attribution statements in derivative works should not in any way suggest that we endorse you or your use of this work.
- **ShareAlike** — If you remix, transform, or build upon the material, you must distribute your contributions under the same license as the original.

**No additional restrictions** — You may not apply legal terms or technological measures that legally restrict others from doing anything the license permits.

### Notices:

You do not have to comply with the license for elements of the material in the public domain or where your use is permitted by an applicable exception or limitation.

No warranties are given. The license may not give you all of the permissions necessary for your intended use. For example, other rights such as publicity, privacy, or moral rights may limit how you use the material.

# सामुग्री सारणी

**OBS translationQuestions** ..... **5**
सृष्टी ..... 5
पापाचा जगामध्ये प्रवेश ..... 11
जल प्रलय (महापूर) ..... 15
देवाचा अब्राहामाशी करार ..... 20
अभिवचनानुसार झालेला पुत्र ..... 24
परमेश्वर इसहाकास मदत करतो ..... 28
देव याकोबास आशीर्वाद देतो ..... 31
देव योसेफ व त्याच्या कुटुंबाचा बचाव करतो ..... 34
देव मोशेला पाचारण करतो ..... 39
दहा पीडा ..... 44
वल्हांडण सण ..... 48
निर्गमन ..... 51
देवाचा इस्राएलाशी करार ..... 56
जंगलामध्ये भटकणे ..... 61
वचनदत्त देश ..... 66
तारणारे = = = = = = ..... 71
देवाचा दाविदाबरोबर करार ..... 77
राज्याची विभागणी ..... 82
संदेष्ट्ये ===== ..... 86
पाडाव आणि सुटका ..... 92
देव मसिहा पाठवण्याचे अभिवचन देतो ..... 96
योहानाचा जन्म ..... 101
येशूचा जन्म ..... 104
योहान येशूचा बाप्तिस्मा करतो ..... 108
येशूची सैतानाकडून परिक्षा ..... 112
येशू आपल्या सेवेचा आरंभ करतो ..... 115
चांगल्या शोमरोन्याची गोष्ट ..... 119
एक श्रीमंत तरुण अधिकारी ..... 123
कृतघ्न चाकराची गोष्ट ..... 127
येशू पाच हजारांना भोजन देतो. ..... 130
येशू पाण्यावर चालतो ..... 133
येशू एका भूतग्रस्त मनुष्यास व आजारी स्त्रीस बरे करितो ..... 136
पेरणी करणा-याची गोष्ट ..... 141
येशू अनेक गोष्टी शिकवितो ..... 144
दयाळू पित्याची गोष्ट ..... 147
येशूचे रुपांतर ..... 151
येशू लाजारास जिवंत करितो ..... 154
येशूला विश्वासघाताने धरुन देण्यात येते ..... 158
येशूची चौकशी ..... 163
येशूला वधस्तंभावर खिळतात ..... 167
देव येशूला मेलेल्यातून उठवितो ..... 171
येशूचे स्वर्गारोहण ( येशू परत स्वर्गात जातो) ..... 174
मंडळीची सुरूवात ..... 178
पेत्र व योहान एका भिका-यास बरे करतात ..... 183
फिलिप्प आणि कूशी अधिकारी ..... 186
पौल ख्रिस्ती बनतो ..... 191
फिलिप्पै नगरामध्ये पौल आणि सीला ..... 195

येशू हा अभिवचनानुसार दिलेला मसिहा आहे 200
देवाचा नवा करार 205
येशूचे पुनरागमन (येशूचे पुन्हा येणे) 211

**योगदानकर्ते 216**
OBS translationQuestions योगदानकर्ते 216
Open Bible Stories योगदानकर्ते 216

# OBS translationQuestions

## सृष्टी

### 01:01

अशा प्रकारे सर्व गोष्टींची सुरुवात झाली. देवाने सर्व जग व त्यातील सर्व वस्तु सहा दिवसामध्ये बनविल्या.पृथ्वीची निर्मिती केल्यानंतर ती तशीच काळोखी व रिकामी होती, व तिच्यावर काहीच नव्हते. परंतु देवाचा आत्मा तेथे जलावर (पाण्यावर) होता.

#### विश्वातील सर्व गोष्टी कोठून आल्या आहेत?

देवाने सर्व काही निर्माण केले.

#### देवाला सर्व गोष्टी तयार करण्यासाठी कीती दिवस लागले ?

सहा दिवस.

---

### 01:02

मग देव बोलला, “प्रकाश होवो! आणि प्रकाश झाला. देवाने पाहिले की प्रकाश चांगला आहे आणि त्याने त्यास “दिवस म्हटले.” देवाने त्यास अंधारापासून वेगळे केले व अंधारास “रात्र” म्हटले. देवाने सृष्टीच्या पहिल्या दिवशी प्रकाश बनविला.

#### प्रत्येक दिवशी गोष्टी निर्माण केल्या नंतर देवाची नेहमीची प्रतिक्रिया काय होती?

तो म्हणायचा की हे चांगले आहे.

---

### 01:03

उत्पत्तीच्या दुसऱ्या दिवशी, देव बोलला आणि पृथ्वीच्या वरती आकाश बनविले. त्याने वरील व खालील जलाशयास वेगळे करत आकाश बनविले.

---

## 01:04

तिसऱ्या दिवशी, देव बोलला आणि पाण्यापासून कोरडी भूमि वेगळी केली. त्याने कोरडया भूमिस “पृथ्वी” व पाण्यास “समुद्र” म्हटले. देवाने पाहिले की त्याने जे कांही निर्माण केले ते चांगले आहे.

### प्रत्येक दिवशी गोष्टी निर्माण केल्या नंतर देवाची नेहमीची प्रतिक्रिया काय होती?

तो म्हणायचा की हे चांगले आहे.

---

## 01:05

मग देव बोलला, “पृथ्वीवर वेगवेगळया प्रकारची झाडे तयार होवोत.” आणि तसेच झाले. देवाने पाहिले की त्याने जे कांही निर्माण केले ते सर्व चांगले आहे.

### प्रत्येक दिवशी गोष्टी निर्माण केल्या नंतर देवाची नेहमीची प्रतिक्रिया काय होती?

तो म्हणायचा की हे चांगले आहे.

---

## 01:06

सृष्टीच्या चौथ्या दिवशी, देवाने आपल्या शब्दाद्वारे सूर्य, चंद्र व तारे बनविले. देवाने त्यांना पृथ्वीवर प्रकाश देण्यासाठी व दिवस रात्र, ऋतु व वर्षे दर्शविण्यासाठी बनविले. देवाने पाहिले की जे त्याने निर्माण केले ते सर्व चांगले आहे.

### प्रत्येक दिवशी गोष्टी निर्माण केल्या नंतर देवाची नेहमीची प्रतिक्रिया काय होती?

तो म्हणायचा की हे चांगले आहे.

---

## 01:07

पाचव्या दिवशी, देवाने जलचर प्राणी व पक्षी बनविले. देवाने पाहिले की हे चांगले आहे आणि त्याने त्यांना आशीर्वाद दिला.

### प्रत्येक दिवशी गोष्टी निर्माण केल्या नंतर देवाची नेहमीची प्रतिक्रिया काय होती?

तो म्हणायचा की हे चांगले आहे.

---

## 01:08

उत्पत्तीच्या सहाव्या दिवशी, देव बोलला,"पृथ्वीवर वस्ती करणारे प्राणी तयार होवोत!" आणि देवबाप बोलल्याप्रमाणेच सर्व काही झाले. अशा प्रकारे काही ग्रामपशु, जमीनीवर रांगणारे व कांही वन्यपशु निर्माण झाले. आणि देवाने पाहिले की हे चांगले आहे.

### प्रत्येक दिवशी गोष्टी निर्माण केल्या नंतर देवाची नेहमीची प्रतिक्रिया काय होती?

तो म्हणायचा की हे चांगले आहे.

---

## 01:09

मग देव बोलला, "आपल्या प्रतिरूपाचा मनुष्य आपण करू. त्यांना पृथ्वीवर व सर्व प्राण्यांवर सत्ता चालवता येईल."

### देवाने कशा प्रकारे मनुष्याला इतर प्राण्यापेक्षा वेगळे केले?

देवाने मनुष्याला त्याच्या प्रतिरुपाचा म्हणजे आपल्या सारखा बनवून मनुष्याला वेगळे केले.

### देवाने माणसांला काय जबाबदारी दिली?

त्याला पृथ्वीवरील सर्व प्राण्यांवर अधिकार दिला आणि त्यांची काळजी घेण्याची जाबदारी दिली.

---

## 01:10

मग देवाने मातीपासून मनुष्य निर्माण केला व त्याच्या नाकपुड्यात जीवनी श्वास फुंकला. हया मनुष्याला आदाम हे नाव देण्यात आले. देवाने आदामाला राहण्यासाठी एक बाग निर्माण केली व त्याची काळजी घेण्यासाठी त्याला तेथे ठेवले.

### देवाने मनुष्याला कशापासून बनवले?

देवाने मातीपासूव त्याला बनवले.

### मनुष्य जिवंत कसा झाला?

देवाने त्याच्या मध्ये जीवनाचा श्वास फुंकला.

### माणसाचे नाव काय होते?

आदाम.

### देवाने आदामाला कोठे ठेवले होते?

देवाने लावलेल्या बागेमध्ये.

---

## 01:11

बागेच्या मध्यभागी, देवाने दोन खास झाडे लावली-- जीवनाचे झाड व बऱ्यावाईटाचे ज्ञान करून देणारे झाड. देवाने आदामास सांगितले की त्याने बागेमधून कुठल्याही झाडाचे फळ खावे, फक्त बऱ्यावाईटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खाऊ नये. जर त्याने त्या झाडाचे फळ खाल्ले, तर तो निश्चित मरेल.

### आदामाला कोणत्या विशेष झाडाचे फळ खाण्याची परवानगी नव्हती?

चांगले आणि वाईट ह्याचे ज्ञान करुन देणाऱ्या झाडाचे.

### आदामाने चांगले आणि वाईटाचे ज्ञान करुन देणाऱ्या झाडाचे फळ खाल्ले तर काय होईल?

तर तो मरेल.

---

## 01:12

मग देव बोलला, “मनुष्य एकटा असणे हे बरे नाही. परंतु प्राण्यांमध्ये आदामासाठी योग्य जोडीदार मिळाला नाही.

### बागेत सर्व प्रकारचे प्राणी असताना आदाम "एकटा" का होता?

प्राणी आदामाला "मदतनीस" होऊ शकत नव्हते.

---

## 01:13

मग देवाने आदामाला गाढ अशी निद्रा लागू दिली. मग देवाने आदामाच्या एका फासळीपासून एक स्त्री तयार करुन तिला आदामासमोर आणले.

### देवावे स्त्रीला कसे निर्माण केले?

देवाने आदामाच्या फासळीपासून तिला बनवले.

---

## 01:14

आदामाने तिच्याकडे पाहून म्हटले, “शेवटी मिळाली! ही तर माइयासारखीच आहे! तिला ‘नारी’ म्हणावे कारण, ‘ ती नरापासून बनविली आहे.” आणि म्हणूनच पुरुष आपल्या आईबापास सोडून आपल्या पत्नीशी जडून राहतो

### आदामासाठी "पुरुषी" शब्दाचा अर्थ काय होता?

ती पुरुषापासून निर्माण केली होती.

### मनुष्याला पत्नी असण्याचा उद्देश काय आहे?

ते एक व्हावेत.

---

## 01:15

देवाने आपल्या प्रतिरूपाचे स्त्री पुरुष बनवले. देवाने त्यांना आशीर्वाद दिला, “तुम्हाला पुष्कळ मुलेमुली व नातवंडे होवोत व पृथ्वी भरून टाका !” देवाने पाहिले की सर्व काही चांगले आहे, व त्या सर्वांविषयी तो आनंदित झाला. हे सर्व उत्पत्तीच्या सहाव्या दिवशी, घडले

### ती निर्मिती पूर्ण झाल्यावर देवाचे मूल्यमापन काय होते?

ते अतिशय चांगले होते.

---

## 01:16

सातव्या दिवशी निर्मीतीचे काम पूर्ण झालेले होते. मग आपल्या कामापासून त्या दिवशी देवाने विश्रांती घेतली. देवाने सातव्या दिवसाला आशीर्वादित करुन पवित्र ठरविले कारण त्या दिवशी त्याने आपल्या कामापासून विश्रांती घेतली. अशा प्रकारे जग व त्यातील सर्व काही देवाने निर्माण केले.

### सातव्या दिवशी देवाने काय केले?

देवाने सातव्या दिवसाला आशीर्वाद देऊन तो पवित्र केला व विसावा घेतला.

# पापाचा जगामध्ये प्रवेश

## 02:01

देवाने बनविलेल्या सुंदर बागेमध्ये आदाम व त्याची बायको ही दोघे खूप आनंदीत होते. ती दोघेही नग्न होती, पण त्यांना संकोच वाटत नव्हता, कारण त्यावेळी जगामध्ये पाप नव्हते. ती दोघे नेहमी बागेमध्ये देवाबरोबर फिरत असत व देवाशी बोलत असत.

### आदाम आणि हव्वा नग्न असतानाही त्यांस लाज का वाटत नव्हती?

जगात कोणतेही पाप नव्हते.

---

## 02:02

परंतु त्या बागेमध्ये एक धूर्त साप होता. तो स्त्रीस म्हणाला, “काय तुम्ही बागेतल्या कोणत्याही झाडाचे फळ खाऊ नये असे देवाने तुम्हाला सांगितले हे खरे काय ?

### हव्वेला सापाचा पहिला प्रश्न काय होता?

'देवाने बागेतल्या कोणत्याही झाडाचे फळ खाऊ नका असे खरेच सांगितले नाही का? "

---

## 02:03

स्त्रीने उत्तर दिले, “बागेतील कुठल्याही झाडाचे फळ खाण्याची आम्हाला मोकळीक आहे फक्त बऱ्यावाईटाचे ज्ञान करुन देणारे फळ खाण्यास मनाई आहे.देव बोलला, ‘जर तुम्ही खाल किंवा त्यास स्पर्शही कराल, तर मराल.”

### आदाम आणि त्याच्या बायकोला कोणत्या झाडाचे इळ खाण्याची परवानगी नव्हती?

चांगले आणि वाईटाचे ज्ञान देणा झाडाचे फळ खाण्याची परवानगी नव्हते.

### चांगले आणि वाईटाचे ज्ञान करुन देणाऱ्या झाडाचे फळ खाल्ल्यावर आदम व आणि हव्वेस काय होईल असे देव म्हणाला ?

तर ते मरतील, असें तो म्हणाला.

---

## 02:04

सापाने स्त्रीस म्हटले, “हे खोटे आहे ! तुम्ही खरोखर मरणार नाही. देवाला ठाऊक आहे की हे फळ खाल्ल्यानंतर, तुम्हास त्याच्या प्रमाणेच बऱ्यावाईटाचे ज्ञान होईल.”

### त्यांनी ते फळ खाऊ नये अशा देवाच्या इच्छेचे कारण सापाने काय सांगितले?

तो म्हणाला देव खोटे बोलत आहे कारण देवाची इच्छा नाही की त्यांनी देवासारखे बुद्धीमान व्हावे.

---

## 02:05

स्त्रीने पाहिले की ते फळ खायला चांगले व दिसायला मनोहर आहे. तिला शहाणेसुदधा व्हायचे होते, म्हणुन तिने कांही फळे घेतली व खाल्ली. मग तिने आपल्या नवऱ्यास कांही दिली, तो तिच्याजवळ होता, व त्याने सुदधा ती खाल्ली.

### स्त्रीने फळ का खाल्ले?

तीने पाहिले की ते सुंदर आणि मधुर आहे, तीला स्वत:ला शहाणे व्हायचे होते.

### आदामाला व त्याच्या बायकोला फळ खाण्यास कोणी भाग पाडले का?

नाही, त्यांनी मुक्तपणाने फळ खाल्ले आणि देवाची आज्ञा मोडली.

---

## 02:06

अचानक, त्यांचे डोळे उघडले व ते नग्न आहेत ते त्यांना कळले. मग त्यांनी झाडाची पाने शिवून आपणाला झाकण्यासाठी कटिवेष्टने(कपडे) तयार केली.

### आदाम आणि हव्वेने आपण दोघे नग्न आहेत हे लक्षात आल्यावर काय केले?

त्यांनी कपडे बनविण्यासाठी पाने एकत्र करुन शिवली व कटीवस्त्रे केली.

---

## 02:07

मग आदाम व त्याची बायको यांनी देवबाप बागेत आल्याचा आवाज ऐकला.ती दोघेही देवापासून लपलीमग देव आदामास म्हणाला, “तु कोठे आहेस ? आदामाने उत्तर दिले, “बागेत चालण्याचा तुझा आवाज ऐकला, व मी घाबरलो, कारण मी नग्न आहे. म्हणून मी लपलो.”

---

## 02:08

मग देवाने विचारले,” तु नग्न आहेस हे तुला कोणी सांगितले? “मी मना केलेले फळ तू खाल्ले आहेस काय ? आदामाने उत्तर दिले, “तू मला ही स्त्री दिली, आणि तिने हे फळ मला दिले. मग देव स्त्रीस बोलला, “तू हे काय केलेसे ? स्त्रीने उत्तर दिले, ” सापाने मला फसविले.”

### आदामाला जेव्हा देवानी त्याच्या पापा बद्दल विचारले तेव्हा त्याने काय उत्तर दिले?

त्याने स्त्रीला दोषी ठरवले.

### स्त्रीला जेव्हा देवानी तीच्या पापा बद्दल विचारले तेव्हा तीने काय उत्तर दिले?

तीने सापाला दोषी ठरवले.

---

## 02:09

देव सर्पास बोलला, “तू शापीत झाला आहेस ! तू आपल्या पोटाने चालशील आणि माती खाशीलतू व स्त्री यामध्ये वैर स्थापीत करीन व तुझ्या व स्त्रीच्या संततीमध्येही मी वैर स्थापीत करीन. स्त्रीचे संतान तुझे डोके ठेचील व तु त्याची टाच फोडशिल.”

### देवाने सापाला काय शाप दिला?

तू तुझ्या पोटाने चालशील, आणि स्त्रीचे संतान तुझे डोके फोडील.

---

## 02:10

मग देव स्त्रीस बोलला, “तु मोठया कष्टाने मुले प्रसवशील असे मी करीन. तरीही तुझी ओढ, तुझ्या नवऱ्याकडे राहील, व तो तुझ्यावर स्वामित्व चालविल.”

### देवाने स्त्रीला काय शाप दिला?

तु वेदनेने लेकरे प्रसवशिल, आणि तुझा ओढा तुझ्या नवऱ्याकडे असेल, तो तुझ्यावर राज्य करीन.

---

## 02:11

देव मनुष्यास म्हणाला, “ तू आपल्या स्त्रीचे ऐकलेस व माझी आज्ञा मोडलीसम्हणून जमिन शापित झाली आहे, आता तूला कष्ट करुनच अन्न मिळेल तू मरशील, आणि तुझे शरीर मातीस मिळेल.” आदामाने त्याच्या बायकोस हव्वा हे नाव दिले याचा अर्थ “जन्मदात्री कारण तिच्याद्वारेच सर्व माणसे जन्मास आली. मग देवाने आदाम व हव्वा यांना चर्मवस्त्रे करुन घातली.

### देवाने माणसाला काय शाप दिला?

तु अन्नासाठी कठीण काम करशिल, आणि तु मरशिल आणि परत मातीला मिळशिल

---

## 02:12

मग देव बोलला, “आता मनुष्यप्राणी आपणासारखाच झाला आहे. त्याला बऱ्यावाईटाचे ज्ञान झालेले आहे, त्यांना जीवनाच्या झाडाचे फळ खाऊ देऊन सर्वकाळ जगू देऊ नये.” म्हणून देवाने आदाम व हव्वा यांना सुंदर बागेतून घालवून दिले. देवाने त्या बागेभोवती सामर्थ्यशाली देवदूतांचा पहारा ठेवला, की कोणी त्या झाडाचे फळ खाऊ नये.

### देवाने आदाम आणि हव्वेला सर्वकाळच्या जिवनापासून कसा प्रतिबंध केला?

त्याने त्यांना एदेन बागेतून काढून टाकले आणि शक्तिशाली दूत प्रवेशद्वार राखत होते.

# जल प्रलय (महापूर)

## 03:01

बऱ्याच वर्षानंतर, पृथ्वीवर खूप लोकवस्ती वाढली. लोक खूपच दुष्ट व हिंसाचारी होत गेले.ते एवढे वाईट झाले की देवाने ठरविले की त्यांचा जलप्रलयाने नाश करावा.

### देवाने जगाचा नाश करण्याचा निर्णय का घेतला?

लोक खूप दुष्ट आणि हिंसक झाले होते.

### जगाचा नाशासाठी देवाने कोणती योजना आखली?

तो एक पूर पाठवनार होता.

---

## 03:02

परंतु नोहावर परमेश्वराची कृपादृष्टी होती. पृथ्वीवरील दुष्ट लोकांमध्ये राहणारा हा एक न्यायी पुरुष होता. देव एक मोठा पूर पाठवणार होता त्या जल प्रलयाविषयी देवाने नोहाला सांगितलेत्याने नोहाला एक प्रचंड तारू (जहाज) बनविण्यास सांगितले.

### नोहा देवाच्या नजरेत कृपा का पावला?

तो नितीमान मनुष्य होता.

---

## 03:03

देवाने नोहाला 140 मीटर लांब, 23मीटर रुंद, व 13.5 मीटर उंचीचे तारू तयार करण्यास सांगितले. त्याने नोहास त्यामध्ये तीन मजले, पुष्कळश्या खोल्या, छत, व खिडकी बनविण्यास सांगितले.त्या तारवामध्ये नोहा, त्याचे कुटुंब, आणि पृथ्वीवरील प्रत्येक जातीचे पशु प्रलय समयी सुरक्षित राहाणार होते.

### नोहाला देवाने काय सांगितले?

एक प्रचंड तारु तयार कर.

### तारुचा उद्देश काय होता?

नोहा, त्याचे कुटुंब, आणि पूरा दरम्यान प्राणी सुरक्षित ठेवण्यासाठी.

---

## 03:04

नोहाने देवाची आज्ञा पाळली. त्याने आणि त्याच्या तिन्ही मुलांनी देवाने सांगितल्याप्रमाणे तारू बांधले. हे जहाज बनविण्यासाठी कित्येक वर्षे लागली, कारण ते खूप मोठे होते. नोहाने लोकांना प्रलयाविषयी सांगितले व देवाकडे वळण्यास सांगितले पण कोणीही त्याच्याकडे लक्ष दिले नाही.

### पूर येईल, असे नोहाने त्यांना सांगितले तेव्हा इतर लोकांची प्रतिक्रिया काय होती?

त्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला नाही.

---

## 03:05

देवाने नोहा व त्याच्या कुटुंबियांसाठी व प्राण्यांसाठी पुष्कळसे अन्नधान्य साठविण्यास सांगितले. जहाज तयार झाल्यानंतर देवाने नोहा, त्याची बायको, त्याची मुले व सुना यांना तारवामध्ये जाण्यास सांगितले ते एकूण आठ जण होते.

---

## 03:06

देवाने नोहाकडे प्रत्येक प्राण्याचे व पक्षाचे नर व मादी पाठविले, अशासाठी की त्यांनी तारवात जावे व प्रलयापासून त्यांस संरक्षण मिळावे देवाने प्रत्येक जातीच्या प्राण्याचे सात नर व सात मादी देखील पाठविले त्यांचा उपयोग अर्पण करण्यासाठी होणार होता. त्या सर्वांनी तारवात प्रवेश केल्यानंतर देवाने स्वतः तारवाचा दरवाजा बंद केला.

### पूरच्या अगोदर कोणते प्राणी आधी नावेत आले?

सर्व प्रकारच्या प्राण्यातील नर आणि मादी, आणि सात नर आणि सात माद्या अशा प्रत्येक प्रकारच्या प्राण्यातील जे अर्पणाला वापरले जाऊ शकते.

### नोहा व त्याचे कुटुंब आणि प्राणी आत आल्या नंतर तारुचे दार कोणी बंद केले?

देवाने दरवाजा बंद केला.

---

## 03:07

आणि मग पाऊस सुरु झाला. पाऊस, पाऊस आणि पाऊस. चाळीस दिवस व चाळीस रात्र सतत पाऊस पडला. पृथ्वीखालील पाण्याचे उगम सुदधा मोकळे झाले व त्यातून जोरात पाणी वाहू लागले. सर्व पृथ्वी पाण्याने व्यापून टाकली. सर्व पर्वतही बुडाले

### पाऊस किती काळ होता?

चाळीस दिवस व चाळीस रात्री.

---

## 03:08

तारवातील लोक व प्राणी सोडून, तारवाच्या बाहेर जमिनीवर असलेले सर्व काही प्रलयामध्ये मरून गेले. तारु पाण्यावर तरंगत राहिले व आतील सर्वजण बुडण्यापासून सुरक्षित होते.

### पूराचे पाणी किती उंच पोहोचले?

पुराने संपूर्ण जगातील सर्वगोष्टी झाकून टाकल्या, अगदी सर्वाधिक उंच पर्वत पण.

### जमिनीवर राहणाऱ्या सर्वांचे काय झाले?

सर्वकाही मरण पावले.

---

## 03:09

पाऊस थांबल्यानंतर, तारु पाच महिने पाण्यावर तरंगत होते, व त्या अवधित पाणी ओसरत राहिले. मग एके दिवशी तारु एका पर्वतावर टेकले, परंतु संपूर्ण जग अजूनही पाण्याखालीच होते. आणखी तीन महिन्यानंतर पर्वताचे माथे दिसू लागले.

---

## 03:10

त्यानंतर आणखी चाळीस दिवसांनी नोहाने एक कावळा पाणी सुकले की नाही हे पाहाण्यास बाहेर सोडला. तो कावळा सुकी जमीन मिळावी म्हणुन इकडेतिकडे फिरत राहिला पण त्याला कोरडी जमीन मिळाली नाही.

---

## 03:11

नंतर नोहाने एक कबूतर बाहेर सोडले. परंतु त्यालाही कोरडी जमीन न मिळाल्याने ते नोहाकडे परत आले. एका आठवड्याने त्याने पुन्हा एक कबुतर बाहेर सोडले व ते आपल्या चोचीत जैतुनाची फांदी घेऊन आले पाणी ओसरत होते, आणि वनस्पती वाढू लागल्या होत्या!

---

## 03:12

नोहाने आणखी एक आठवडा वाट पाहून त्या कबूतरास तिसऱ्यांदा पाठविलेयावेळी, त्याला विसावण्यास ठिकाण सापडले व ते माघारी आले नाही. पाणी सुकत चालले होते!

### पाणी आटून गेले आहे हे नोहाला कसे समजले?

त्याने एका कबुतराला बाहेर सोडले आणि ते परत आले नाही.

---

## 03:13

दोन महिन्यानंतर देव नोहास म्हणाला, “ तु व तुझे कुटुंब आता तारवाबाहेर येऊ शकता. तुम्हाला पुष्कळ मुलेमुली व नातवंडे होवोत व पृथ्वी भरून टाका.”मग नोहा व त्याचे कुटुंब तारवाबाहेर आले.

### नावेतून उतरल्यानंतर देवाने नोहाला आणि त्याच्या कुटुंबाला काय करावयास सांगितले?

त्याने त्यांना सांगितले अनेक मुले व नातवंडे होवून संपूर्ण पृथ्वी व्यापून टाका.

---

## 03:14

नोहा तारवाबाहेर आल्यानंतर,त्याने वेदी बांधली व अर्पणासाठी वापरल्या जाणा-या प्राण्यांपैकी प्रत्येक प्रकारातुन काही प्राण्यांचे देवाला होमार्पण केले. देव नोहाच्या होमार्पणाने संतुष्ट झाला व त्याला व त्याच्या कुटुंबाला आशीर्वाद दिला.

### नोहाने नावेतून उतरल्यानंतर देवाची उपासना कशी केली?

त्याने एक वेदी बांधली आणि काही प्राण्यांचे बळी अर्पण केले.

---

## 03:15

देव बोलला, “मी वचन देतो येथूने पुढे मानवाच्या दुष्टाईमुळे भूमीला कधीही शाप देणार नाही, व पाण्याने जगाचा नाश करणार नाही, कारण मानव बाळपणापासुन पापी असतात.”

### देवाने कोणते आश्वासन दिले की ते तो पुन्हा कधीही करणार नाही?

भूमिला असा शाप किंवा झाडून जगाचा नाश करणार नाही.

---

## 03:16

मग देवाने पहिल्यांदा मेघधनुष्य बनवला व नोहा बरोबर करार केला. मेघधनुष्य जेंव्हा जेंव्हा आकाशात दिसते, तेंव्हा तेंव्हा देवाला मानवाबरोबर केलेल्या कराराची आठवण होते व त्याच्या लोकांनाही आठवण होते.

### आपले वचन लक्षात रहावे म्हणून देवाने काय केले?

त्याने आकाशात मेघधनुष्य ठेवला.

# देवाचा अब्राहामाशी करार

## 04:01

महापुरानंतर अनेक वर्षांनी, जगामध्ये पुन्हा लोक वाढले, व सर्वांची एकच भाषा होती. देवाने सांगितल्याप्रमाणे पृथ्वी व्यापून न टाकता, ते एकत्र जमले व त्यानी एक शहर बांधले.

### जलप्रलयानंतर देवाने दिलेल्या आज्ञेप्रमाणे लोकांनी पृथ्वी व्यापून टाकली?

नाहीते एकत्र जमले आणि एक नगर बांधले.

### त्या वेळी जगात किती वेगवेगळ्या भाषा होत्या?

तेथे फक्त एकच भाषा होती.

---

## 04:02

ते खूप गर्विष्ठ होत गेले, व देव काय बोलला याकडे लक्ष दिले नाही. त्यांनी स्वर्गापर्यंत पोहोचेल असा एक उंच बुरुज सुद्धा बांधण्यास सुरुवात केली.देव बोलला अशा प्रकारे दुष्टाई करण्यासाठी ते एकत्र काम करतील, तर ते अजून अधिक दुष्ट कृत्ये करतील.

### सर्व पृथ्वीवर भरून टाकण्या ऐवजी लोक एकत्र येवून काय काम करत होते?

स्वर्गात पोहोचण्यासाठी एक उंच बुरुज बांधण्यास सुरुवात केली.

---

## 04:03

मग देवाने त्यांच्या भाषेमध्ये गोंधळ निर्माण केला व अनेक भाषा निर्माण केल्या व अशा प्रकारे त्यांना सर्व जगात पांगवले. जे शहर त्यांनी बनवण्यास घेतले त्यास बाबेल, म्हणजे “गोंधळ” असे म्हटले आहे.

### लोकांना जगभरात पांगविण्यासाठी देवाने काय केले?

त्याने त्यांची भाषा अनेक विविध भाषेत बदलली.

### ते जे बांधकाम करत होते त्या शहराचे नाव काय होते?

बाबेल

### "बाबेल" नावाचा अर्थ काय?

गोंधळलेला गोंगाट

---

## 04:04

शेकडो वर्षानंतर, देव अब्राम नावाच्या मनुष्याबरोबर बोलला. देव त्यास बोलला, “तू आपला देश व आपल्या नातेवाईकांस सोडून मी दाखविल त्या देशात जा. मी तुला आशीर्वाद देईन व तुझ्यापासून एक मोठे राष्ट्र निर्माण करीन.मी तुझे नाव मोठे करीन. तुला जे आशीर्वाद देतील त्यांना मी आशीर्वाद देईन व तुला जे शाप देतील त्यांना मी शाप देईन. तुझ्याद्वारे पृथ्वीवरील सर्व कुळे आशीर्वादीत होतील.

### देवाने अब्रामाला काय करायला सांगितले?

देवाने अब्रामाला आपला देश आणि आपल्या कुटुंबाला सोडून दुसऱ्या देशात जाण्यासाठी सांगितले.

### अब्रामासाठी काय करण्याचे देवाने आश्वासन दिले?

त्याने वचन दिले की सर्व प्रदेश जो पाहू शकतो तो अब्रामाला देईल, त्याचे नाव मोठे करील, त्याचे संतानाचे एक मोठे राष्ट्र निर्माण करील, आणि त्याची द्वारे पृथ्वीवरील सर्व कुटूंबे आशिर्वादित होतील

---

## 04:05

अब्रामने देवाच्या आज्ञेचे पालन केले. त्याने आपली पत्नी साराय, व सर्व नोकरचाकरासहीत मिळवलेली सर्व मालमत्ता घेऊन अब्राम देवाने दाखविलेल्या कनान देशात जायला निघाला.

### अब्राम कोणत्या देशात गेला ?

कनान देशात.

---

## 04:06

कनान देशात आल्यानंतर देव अब्रामास म्हणाला, “तु तुझ्या आजूबाजूला बघ. हा देश जो तू पाहातोस मी तुला व तुझ्या संतानांना वतन म्हणुन देईन. मग आब्राम तेथे वस्ती करुन राहिला.

### देवाने कनान देशा बद्दल अब्रामास कोणते वचन दिले?

देव अब्राम व त्याच्या संतानाला ते सर्व वतन म्हणून देणार .

---

## 04:07

एके दिवशी, अब्राम परात्पर देवाचा याजक मलकीसदेकास भेटतो. मलकीसदेकाने आब्रामास आशीर्वाद दिला व म्हणाला. “आकाश आणि पृथ्वीचा स्वामी जो परात्पर देव अब्रामाला आशीर्वाद देवो.” मग अब्रामाने मलकीसदेकाला आपल्या सर्व गोष्टींचा दहावा भाग दिला.

### मलकीसदेक कोण होता?

तो सर्वोच्च देवाचा याजक होता.

### अब्रामासाठी मलकीसदेकाने काय केले?

त्याने अब्रामाला आशीर्वाद दिला.

### अब्रामाने मलकीसदेकाला काय दिले?

त्याच्या मिळकतीचा दशमांश.

---

## 04:08

पुष्कळवर्षे गेली, पण अब्राम व साराय यांना अद्याप मुलगा नव्हता. देवाने अब्रामाला पुन्हा दर्शन देऊन म्हटले की त्याला पुत्र होईल व त्याची संतती आकाशातील ताऱ्यांप्रमाणे होईल. अब्रामाने देवाच्या वचनावर विश्वास ठेवला.देवावर ठेवलेल्या विश्वासामुळे देवाने अब्रामाला नितिमान ठरवले.

### अनेक वर्षे कनान देशात राहिल्या नंतर देवाने अब्रामाला काय वचन दिले?

अब्रामाला एक मुलगा आणि आकाशातील ताऱ्यांप्रमाणे त्याची संतती होईल.

### देवाने अब्रामाला धार्मिक का म्हटले?

कारण अब्रामाने देवाच्या वचनावर विश्वास ठेवला.

---

## 04:09

मग देव अब्रामाबरोबर करार करतो. करार हा दोन व्यक्तीमध्ये किंवा दोन पक्षांमध्ये केला जातो. देव बोलला, “तुला तुझ्याच पोटचा पुत्र होईल.” तुझ्या संतानाला मी कनान देश देईल.” परंतु अद्याप अब्रामास पुत्र झाला नव्हता

### करार काय आहे?

दोन पक्षांमध्ये करार.

# अभिवचनानुसार झालेला पुत्र

## 05:01

अब्राम व साराय कनान देशात येऊन दहा वर्षे झाली, तरीही त्यांना मुल झाले नव्हते. म्हणून अब्रामाची पत्नी, साराय, त्यास म्हणाली, " देवाने मला मुले दिली नाहीत आणि आता मी खूप म्हातारी झाल्यामुळे मला मुले होणार नाहीत, म्हणून तुम्ही माझी दासी, हागार घ्या.
तिच्याबरोबर लग्न सुद्धा करा म्हणजे ती मजसाठी पुत्र प्रसवेल."

### का साराय हीला मुल बाळ नव्हते?

ती वांझ असून शिवाय खूप म्हातारीही होती.

### अब्रामास मूल होण्यासाठी साराने काय करावयास सांगितले?

तिची दासी हागार सोबत लग्न कर, मग त्यामुळे हागार तिच्या साठी एक मूल देईल.

---

## 05:02

यास्तव अब्रामाने हागारेशी विवाह केला. हागारेपासून अब्रामास पुत्र झाला, व त्याचे नाव त्याने इश्माएल ठेवले. परंतु साराय हागारेचा द्वेष करु लागली. इश्माएल तेरा वर्षांचा असतांना, देव पुन्हा अब्रामाशी बोलला.

### हागारेच्या मुलाचे नाव काय होते?

इश्माएल

### साराय आणि हागार यात काय समस्या निर्माण झाली?

साराय हागारेचा द्वेश करु लागली.

---

## 05:03

देव बोलला, "मी सर्वसमर्थ देव आहे. मी तुझ्याशी करार करीन." मग अब्रामाने परमेश्वरास जमिनीपर्यंत लवून नमन केले. देवाने अब्रामास असे सुद्धा म्हटले की, "तु अनेक राष्ट्रांचा पिता होशील. मी तुला व तुझ्या संतानास कनान देश देईल व मी त्यांचा निरंतरचा देव होईन. तु आपल्या घराण्यातील प्रत्येक पुरुषाची सुंता कर.

### देवाने अब्रामाशी कोणता कराराचे वचन दिले?

अब्राम अनेक राष्ट्रांचा पिता होईल, आणि देव त्याला व त्याच्या वंशजांना कनान देश वतन देईल.

### देवाने त्यांच्या दरम्यान केलेल्या कराराचा पुरावा म्हणून अब्रामाला काय करायला सांगितले?

त्याच्या कुटुंबातील प्रत्येक पुरुषांची सुंता करण्यास सागितले.

---

## 05:04

“तुझी पत्नी साराय हीस पुत्र होईल- तोच खरा वारसदार होईल. त्याचे नाव इसहाक ठेव. मी त्याच्याशी आपला करार करीन, व त्याचे महान राष्ट्र करीन.मी इश्माएलचेही एक मोठे राष्ट्र करीन, पण माझा करार इसहाकाशी असेल.” मग देवाने अब्रामाचे बदलून अब्राहाम असे ठेवले, याचा अर्थ “पुष्कळांचा पिता.” देवाने सारायचेही नाव बदलले “सारा असे ठेवले याचा अर्थ, “राजकन्या.”

### देव कोणाला वचनाचा पुत्र असे म्हणाला?

इसहाक सारायचा मुलगा.

### एक मोठे राष्ट्र होईल असे देव कोणाला म्हणला?

इसहाक व इश्माएल या दोघांना.

### अब्रामाचे नवीन नाव काय, अब्राहाम, याचा अर्थ काय?

अनेकांचा पिता.

---

## 05:05

त्या दिवशी अब्राहामाने आपल्या घराण्यातील सर्व पुरुषांची सुंता केली. एका वर्षानंतर, अब्राहाम 100 वर्षाचा व सारा 90 वर्षाची असतांना सारेने अब्राहामाच्या पुत्राला जन्म दिला. त्यांनी देवाने सांगितल्याप्रमाणे त्याचे नाव इसहाक ठेवले

---

## 05:06

जेंव्हा इसहाक तरूण झाला तेंव्हा देवाने अब्राहमाच्या विश्वासाची परिक्षा पाहाण्यासाठी, तो म्हणाला, “इसहाक, तुझा एकुलता एक पुत्र इसहाक याला घे व त्याचे मला होमार्पण कर.” अब्राहाम पुन्हा देवाची आज्ञा मानतो व इसहाकाचे अर्पण करतो.

### देवाने अब्राहामास जेव्हा इसहाक एक तरुण होता तेव्हा काय करण्यात सांगितले?

देवाने अब्राहामाला सांगितले इसहाकाला माझ्यासाठी अर्पण दे.

### देव अब्राहामाला इसहाकाचे अर्पण का मागतो?

अब्राहामाच्या विश्वासाची परीक्षा करण्यासाठी.

---

## 05:07

अब्राहाम व इसहाक होमार्पणाच्या ठिकाणी जात असतांना इसहाकाने विचारले “बाबा, होमापर्णासाठी लाकडे आहेत, पण कोकरु कोठे आहे?” अब्राहाम म्हणाला, “मुला, देव स्वत: होमार्पणासाठी कोकरु पाहून देईल.”

### अर्पणाला कोकरु नव्हते तेव्हा अब्राहामाने इसहाकाला काय कारण सांगितले?

अब्राहाम म्हणाला अर्पणाला देव कोंकरु पुरवून देईल.

---

## 05:08

जेंव्हा ते होमार्पणाच्या ठिकाणी जेंव्हा पोहोचले तेंव्हा अब्राहामाने आपला पुत्र इसहाक यास बांधले व वेदीवर ठेविले. तो आपल्या पुत्राला ठार मारणार इतक्यात देव बोलला, “थांब! मुलास इजा करु नकोस! आता मला कळले की तु माझी भिती बाळगतोस कारण तु आपला पुत्र माझ्यापासून राखून ठेवला नाही.”

### अब्राहामाने इसहाकाला मारावे अशी देवाची इच्छा होती का?

नाही.त्याला फक्त अब्राहाम त्याची आज्ञा पाळते की नाही ते पहायची इच्छा होती.

---

## 05:09

अब्राहामाने जवळच्या झुडूपामध्ये शिंगे गुंतलेला एक एडका पाहिला. इसहाकाच्या ठिकाणी देवाने एडका पुरविला होता. अब्राहामाने आनंदाने त्या एडक्याचे अर्पण केले.

### इसहाक ऐवजी अर्पणाला देवाने काय दिले?

त्याने झुडपामध्ये अडकलेला एक मेंढा दिला.

## 05:10

मग देव अब्राहामाशी बोलला, “कारण तु आपले सर्वस्व माझ्यासाठी देऊ केलेस आपला एकूलता एक पुत्र देखिल देऊ केलास म्हणून मी तुला आशीर्वाद देईन.तुझी संताने आकाशातील ताऱ्यांपेक्षा जास्त होतील. तु माझी आज्ञा पाळलीस म्हणून तुझ्या संततीद्वारे पृथ्वीवरील सर्व राष्ट्रे आशीर्वादित होतील.”

### अब्राहामाने देवाची आज्ञा पाळली म्हणून त्याने अब्रामासाठी काय करायचे वचन दिले?

त्यांनी वचन दिले की, अब्राहामाची संतान आकाशातील ता-यां पेक्षा अधिक असेल, आणि जगातील सर्व कुटुंबे त्याच्या कुटुंबाद्वारे आशीर्वादित होतील.

# परमेश्वर इसहाकास मदत करतो

## 06:01

जेंव्हा अब्राहाम म्हातारा झाला होता, तेंव्हा त्याचा मुलगा, इसहाक तरूण पुरुष झाला होता.म्हणून अब्राहामाने आपल्या दासांपैकी एका दासाला त्याचे नातेवाईक राहत असलेल्या प्रदेशामध्ये जाऊन आपला मुलगा इसहाक,याच्यासाठी वधू आणण्यास पाठविले.

### अब्राहामाने त्याचा सेवकाला आपल्या नातेवाईकाच्या देशात परत का पाठवले?

त्याचा मुलगा इसहाक याच्यासाठी नवरी परत आणण्यासाठी.

---

## 06:02

खूप लांब प्रवास केल्यानंतर अब्राहमचे नातेवाईक राहात असलेल्या ठिकाणी, देवबाप त्या सेवकास रिबकाकडे घेऊन येतो.ती आब्राहमच्या भावाची नात होती.

### सेवकाला रिबेका कशी मिळते?

देव त्याला तिच्याकडे नेतो.

### अब्राहामाचे रिबकाशी काय नाते होते?

रिबका अब्राहामाच्या भावाची नात होती.

---

## 06:03

रिबका आपल्या बापाचे घर सोडून त्या सेवकाबरोबर इसहाकाच्या घरी जाण्यास तयार झाली.ती आल्यानंतर लगेच इसहाकाने तिच्याशी विवाह केला.

### रिबेकाला इसहाकाशी लग्न करण्यास भाग पाडले होते का?

नाही, ती जाण्यासाठी मान्य झाली.

---

## 06:04

ब-याच वर्षांनंतर, अब्राहाम मरण पावला व देवाने त्याला कराराच्या रुपाने दिलेली सर्व अभिवचने इसहाकाकडे सोपवण्यात आली.देवाने अब्राहामास असंख्य संतती देण्याचे अभिवचन दिले होते, परंतु इसहाकाची पत्नी रिबेकास मुलबाळ नव्हते.

### अब्राहाम मेला, तेव्हा देवाची कोणती आश्वासने इसहाका वर आली होती?

अब्राहामाशी केलेली सर्व आश्वासने, ज्यात त्याची संताने आकाशातील ता-यांच्या समान होतील याचा सुद्धा समावेश आहे.

### अगणित संतानाचे जे वचन दिले होते ते इसहाकाच्या माध्यमातून पूर्ण केले जाणार नाही, असे का दिसत होते?

रिबेकाला मुल नव्हते.

---

## 06:05

इसहाकाने रिबेकासाठी प्रार्थना केली, व देवाच्या कृपेने ती गरोदर राहीली व तिच्या पोटात जुळी मुले होती.ही दोन मुले रिबकेच्या पोटामध्ये असतांनाच एकमेकांशी झगडू लागली, तेंव्हा तिने देवाला विचारले की असे का होत आहे.

---

## 06:06

देव रिबकेस म्हणाला, "तुझ्या पोटातील दोन मुलांद्वारे दोन राष्ट्रे होतील.ते एकमेकांशी झगडतील; आणि वडील धाकट्याची सेवा करील."

### देवाने रिबेकाला तिच्या दोन जुळ्या मुलांनी जन्म घेण्यापुर्वी काय सांगितले?

मोठा मुलगा धाकट्याची सेवा करील, आणि ती दोन राष्ट्रे होतील.

---

## 06:07

जेंव्हा रिबकेच्या मुलांचा जन्म झाला, तेंव्हा पहिला तांबूस वर्णाचा असून त्याचे सर्व अंग केशवस्त्रासारखे होते, त्याचे नांव एसाव ठेवले.त्यानंतर त्याचा धाकटा भाऊ एसावाची टाच पकडून बाहेर आला आणि त्याचे नाव याकोब ठेवण्यात आले.

## मोठ्या मुलाचे नाव काय होते?

एसाव .

## धाकट्या मुलाचे नाव काय होते?

याकोब.

# देव याकोबास आशीर्वाद देतो

## 07:01

ही मुले वाढत असतांना, याकोबाला घरीच राहायला आवडत असे, परंतु एसावाला शिकार करायला आवडत असे.याकोब रिबकेचा आवडता होता, परंतु इसहाकाला एसाव आवडत होता.

---

## 07:02

एके दिवशी, एसाव शिकारीहून आला असता, त्याला खूप भूक लागली होती.एसाव याकोबास म्हणाला, "तू बनवलेल्या जेवणातून मला काही दे."याकोबाने उत्तर दिले, "पहिल्याने, तू मोठा मुलगा म्हणून तुझे जे हक्क आहेत ते हक्क मला दे."अशा प्रकारे एसावाने याकोबाला आपला ज्येष्ठत्वाचा (मोठ्या मुलाचा) हक्क देऊन टाकला.मग याकोबाने त्याला काही अन्न दिले.

### याकोबाचा धाकटा मुलगा याने मोठ्या मुलाचा अधिकार कसा प्राप्त केला?

जेवनाच्या बदल्यात एसावाने आपले अधिकार याकोबाला दिले.

---

## 07:03

इसहाक आपला आशीर्वाद एसावास देऊ इच्छित होता.परंतु असे करण्यापूर्वी रिबका आणि याकोब यांनी मिळून याकोब हा एसाव असल्याचे ढोंग करून इसहाकास फसविले.इसहाक म्हातारा झाल्यामुळे त्याला दिसत नव्हते.याकोबाने एसावाचे कपडे घातले आणि आपल्या मानेवर व हातांवर शेळीची कातडी घातली.

### इसहाक आपला औपचारिक आशीर्वाद कोणाला देवू इच्छित होता?

एसाव .

### याकोबाने त्याला आशीर्वाद देताना इसहाकाने कोणती युक्ती केली?

तो शेळीचे कातडे पांघरुन इसहाकाला एसाव असल्याचे भासवत होता.

---

## 07:04

याकोब इसहाकाकडे येऊन म्हणाला, "मी एसाव आहे.तुम्ही मला आशीर्वाद द्यावा म्हणुन मी तुम्हाकडे आलो आहे."जेंव्हा इसहाकाने शेळीच्या केसास स्पर्श केला व त्याच्या कपड्यांचा वास घेतला, तेंव्हा तो एसावच आहे असे वाटून त्याने त्यास आशीर्वाद दिला.

---

## 07:05

एसाव याकोबाचा द्वेष करू लागला कारण याकोबाने त्याचा जेष्ठत्वाचा अधिकार आणि आशीर्वाद सुदधा चोरला होता.म्हणून आपला बाप वारल्यानंतर त्याने याकोबास ठार मारण्याची योजना आखली.

### याकोबाने एसावाचे आशीर्वाद चोरले या कारणाने एसावाने त्याला काय करण्याची योजना आखली?

एसावाने याकोबाला ठार मारण्याची योजना आखली.

---

## 07:06

परंतु रिबकेने एसावच्या योजनेबद्दल ऐकले.म्हणून तिने आणि इसहाकाने याकोबास आपल्या दूर देशी असलेल्या नातेवाईकाकडे राहाण्यास पाठवले.

### जेव्हा याकोबाला ठार मारण्याची एसावाची योजना रिबेकानी ऐकली तेव्हा इसहाक व रिबकाने काय केले?

त्यांनी याकेबाला दूर रिबेकाच्या नातेवाईकाकडे राहण्यास पाठविले.

---

## 07:07

याकोब बरीच वर्षे रिबकेच्या नातेवाईकांबरोबर राहिला.या कालावधीमध्ये त्याने लग्न केले व त्यास बारा पुत्र व एक कन्या झाली.परमेश्वराने त्यास खूप श्रीमंत बनविले.

### पुढील वीस वर्षा दरम्यान याकोबाचे काय झाले?

त्याने लग्न केले,त्याला बारा मुलगे आणि एक मुलगी होती, आणि देवाने त्याला श्रीमंत केले.

---

## 07:08

त्यानंतर वीस वर्षांनी कनानामध्ये असणा-या आपल्या घरी, याकोब आपला परिवार, नोकर-चाकर व गुराढोरांच्या कळपासह परतला.

---

## 07:09

याकोब खूप घाबरत होता कारण त्याला वाटले की त्याचा भाऊ एसाव अजूनही त्यास मारण्यासाठी टपला असेल.म्हणून त्याने आपल्या जनावरांचे अनेक कळप एसावाकडे भेट म्हणून पाठविले.ज्या सेवकांनी ते कळप एसावाकडे नेले ते त्यास म्हणाले, "आपला दास याकोब आपणासाठी हे कळप भेट म्हणून देत आहे.तो लवकरच येत आहे."

### तो कनान देशात परत आला तेव्हा याकोबाला भीती का वाटत होती?

त्याला वाटले एसाव त्याला ठार मारेल.

### याकोबाने एसावाचा राग कमी करण्यासाठी काय केले?

त्याने गुरेढोरांचा एक कळप भेट म्हणून एसावला पाठविला.

---

## 07:10

परंतु एसावाने अगोदरच याकोबास क्षमा केली होती, आणि त्यांना एकमेकांना भेटून आनंद झाला.मग याकोब सुखाने कनानामध्ये राहू लागला.मग इसहाक मरण पावला, आणि याकोब व एसावाने त्यास पुरले.देवाने अब्राहामाशी केलेल्या कराराचे अभिवचन आता इसहाकाकडून याकोबाकडे सुपूर्त करण्यात आले.

### एसाव अजूनही याकोबावर रागावला होता?

नाही, त्याने आधीच त्याला क्षमा केली होती.

### याकोब कोठे राहीला?

कनाना मध्ये.

### इसहाक यांच्या मृत्यूनंतर देवाच्या कराराची आश्वासने जी मूळात अब्राहामाला दिला होती ती कोणाला प्राप्त झाली?

याकोबाला.

# देव योसेफ व त्याच्या कुटुंबाचा बचाव करतो

## 08:01

ब-याच वर्षांनंतर याकोब वयोवृद्ध झाला असतांना, त्याने आपला आवडता पुत्र, योसेफ, यास मेंढरांचे राखण करत असलेल्या आपल्या जेष्ठ भावांकडे त्यांचे कसेकाय चालले आहे हे पाहाण्यास पाठविले.

---

## 08:02

आपला पिता याकोब याचे योसेफावर जास्त प्रेम असल्यामुळे व योसेफ आपल्या भावांवर राज्य करील असे स्वप्न त्याला पडल्यामूळे त्याचे भाऊ त्याचा द्वेष करू लागले.जेंव्हा योसेफ आपल्या भावांकडे आला, तेंव्हा त्यांनी त्यास काही गुलामांच्या व्यापा-यांस विकून टाकले.

### योसेफाचे भाऊ त्याचा द्वेष का करतात?

कारण योसेफ याकोबाचा आवडता मुलगा होता व योसेफाला स्वप्न पडले होते की तो त्यांचा शासक होईल.

### योसेफाच्या भावांनी त्याच्या विषयी कोणती वाईट गोष्ट केली?

त्यांनी त्याला धरले आणि त्याला कोणा गुलाम व्यापाऱ्याला विकले.

---

## 08:03

योसेफाच्या भावांनी घरी परतण्यापूर्वी योसेफाचा झगा शेळीच्या रक्तामध्ये बुडवला.मग त्यांनी तो झगा आपल्या बापास दाखविला अशासाठी की हिंस्त्र पशूने योसेफाची हत्या केली आहे यावर त्याचा विश्वास बसावा.याकोबास फार दु:ख झाले.

### कसे योसेफाच्या भावांनी त्याच्या नाहिसे होण्याचे स्पष्टिकरण याकोबाला कसे दिले?

त्यांनी त्याच्या अंगरख्याला शेळीचे रक्त लावले जेणेकरून याकोबाला वाटेल त्याला कोणी वन्य प्राण्याने ठार केले असेल.

---

## 08:04

त्या गुलामांच्या व्यापा-यांनी योसेफास मिसर देशामध्ये आणले.नाईल नदीच्या तीरावर वसलेला मिसर देश हा एक मोठा, व सामर्थ्यशाली देश होता.गुलामांच्या व्यापा-यांनी योसेफास एका श्रीमंत सरकारी अधिका-यास विकून टाकले.योसेफाने आपल्या स्वामीची चांगली सेवा केली, आणि देवाने योसेफास आशीर्वादित केले.

### देवाने योसेफाला मिसर देशा मध्ये सोडून दीले का?

नाहीयोसेफाने जे सर्वकाही केले, देवावे त्याला आशीर्वाद दिला.

---

## 08:05

त्याच्या स्वामीच्या पत्नीने योसेफाबरोबर कुकर्म करण्याचा प्रयत्न केला, परंतु अशा प्रकारे देवाच्या विरूद्ध पाप करण्यास योसेफाने नकार दिला.यावर तिने संतप्त होऊन योसेफावर खोटा आरोप केला व योसेफास पकडून तुरुंगामध्ये टाकण्यात आले.तुरुंगामध्ये देखिल, योसेफ देवाशी विश्वासू राहिला, आणि देवाने त्यास आशीर्वाद दिला.

### योसेफाला मिसरामध्ये तुरुंगात का पाठविण्यात आले?

योसेफाने आपल्या स्वामीच्या पत्नी बरोबर झोपण्यास नकार दिला, त्यामुळे तीने त्याच्यावर खोटा आरोप केला होता.

---

## 08:06

दोन वर्षांनंतर, निष्पाप असूनही योसेफ तुरुंगातच होता.एके रात्री, फारोला, दोन चिंताजनक स्वप्ने पडली.त्याच्या सल्लागारांपैकी कोणीही त्याला स्वप्नांचा अर्थ सांगू शकला नाही.

---

## 08:07

देवाने योसेफाला स्वप्नांचा अर्थ सांगण्याची क्षमता दिली होती, म्हणून फारोने योसेफास तुरूंगातून आपल्या घरी आणले.योसेफाने त्याच्या स्वप्नांचा अर्थ सांगितला व म्हटले, "देव सात वर्षे पुष्कळ पिकपाणी देईल व त्यानंतर सात वर्षे दुष्काळ पडेल.

### देवाने योसेफाला काय योग्यता दिली होती?

स्वप्नांचा अर्थ सांगण्याची योग्यता.

### फारोच्या स्वप्नाचा काय अर्थ होता?

देव सात वर्षे विपुल पिके देणार होता आणि सात वर्षे दुष्काळ पाठवणार होता.

---

## 08:08

योसेफाची फारोवर एवढी छाप पडली की त्याने त्याला मिसर देशाचा पंतप्रधान बनविले.

### फारोने योसेफाला आपल्या स्वप्नाचा अर्थ सांगितल्या नंतर योसेफाला कसे प्रतिफळ दिले?

त्याने योसेफाला मिसरावर दुसऱ्या क्रमांकाचा सर्वांत शक्तिशाली पुरुष केले.

---

## 08:09

योसेफाने लोकांना सुकाळातील सात वर्षांमध्ये धान्याचा भरपूर साठा करून ठेवण्यास सांगितले.मग योसेफाने दुष्काळातील सात वर्षे लोकांना खाण्यासाठी पुरेसे होईल इतके धान्य विकले.

### योसेफाने दुष्काळासाठी कशी तयारी केली?

योसेफाने मिसरी लोकांना सुगीच्या सात वर्षात अन्न मोठ्या प्रमाणात साठवण्यास सांगितले, आणि नंतर दुष्काळाच्या सात वर्षात लोकांना अन्न विकले.

---

## 08:10

तो दुष्काळ फक्त मिसरातच नव्हे तर याकोब आणि त्याचे कुटुंबिय राहात असलेल्या कनान देशामध्येही भयंकर असा होता.

---

## 08:11

मग याकोब आपल्या मोठ्या मुलांस अन्न विकत घेण्यासाठी मिसरात पाठवतो.धान्य विकत घ्यायला आलेले भाऊ योसेफाच्या समोर उभे होते पण त्यांनी त्यास ओळखले नाही.परंतु योसेफाने त्यांना ओळखले.

### योसेफाचे भाऊ मिसरला का आले?

कनान मध्ये दुष्काळ तीव्र झाला होता म्हणून ते अन्न विकत घेण्याकरता आले होते.

---

## 08:12

ते बदलले आहेत की नाही याची परीक्षा पाहिल्यानंतर, योसेफ त्यांना म्हणाला, "मी तुमचा भाऊ योसेफ आहे!"भिऊ नका.तुम्ही मला गुलाम म्हणून विकून माझे वाईट करण्याचा प्रयत्न केला, पण देवाने त्याच वाईटाचा माझे चांगले करण्यासाठी उपयोग केला!या आणि मिसर देशामध्ये वस्ती करून राहा, म्हणजे मी तुम्हास व तुमच्या कुटुंबियांस धान्याचा पुरवठा करीन.

### योसेफाने आपल्या भावांना तो कोण आहे हे सांगण्यापूर्वी, त्याने त्याची परिक्षा घेतली का ?

ते बदलले का ते पाहण्यासाठी त्याने परिक्षा घेतली.

### आपल्या भावांकडून गुलाम म्हणून त्याची विक्री केल्यादर सुद्धा देवाने चांगल्या गोष्टी केल्या?

योसेफ सर्व मिसर मध्ये एक शक्तिशाली शासक बनला, आणि देवाने दुष्काळाच्या काळात त्याच्या कुटुंबाला आणि इतर अनेक लोकांना अन्न पुरवण्यासाठी त्याला वापरले.

---

## 08:13

जेंव्हा योसेफाचे भाऊ घरी आले व त्यांनी आपल्या बापास, याकोबास, योसेफ अजून जीवंत आहे असे सांगितले, तेंव्हा याकोबास खूप आनंद झाला.

---

## 08:14

जरी याकोब आता वृद्ध झाला होता, तरीही तो आपल्या कुटुंबियांसह मिसरात आला व ते सर्व तेथे राहू लागले.याकोबाने आपल्या मरणापूर्वी, आपल्या सर्व मुलांस आशीर्वाद दिला.

### योसेफ जिवंत आहे हे समजल्यावर याकोबाने त्याला काय केले?

त्याने त्याचे सर्व कुटुंब मिसरला हलविले.

---

## 08:15

देवाने अब्राहमाशी केलेल्या कराराचे अभिवचन इसहाकाकडे, मग याकोब आणि त्याच्या बारा पुत्रांकडे व त्यांच्या कुटुंबियांकडे सोपविण्यात आले होते.या बारा पुत्रांची संतती ही इस्राएलाचे बारा वंश झाले.

### याकोब मरण पावल्या नंतर देवाने अब्राहामाला दिलेली अभिवचने कोणाला मिळाली?

याकोबाच्या बारा मुलांना.

### याकोबाचे बारा मुलांचे वंशज कोण झाले?

इस्राएलाचे बारा वंश .

# देव मोशेला पाचारण करतो

## 09:01

योसेफ मृत्यु पावल्यानंतर, त्याचे सर्व नातेवाईक मिसर देशात राहत होते.ते आणि त्यांची संताने अनेक वर्षे तेथे राहिली व त्यांस पुष्कळ मुले झाली.त्यांना इस्राएली असे म्हणत असे.

---

## 09:02

शेकडो वर्षांनंतर इस्राएली लोकांची संख्या खूप वाढली.योसेफाने केलेल्या कामगिरीचा मिसरी लोकांना विसर पडला.त्यांना आता इस्राएली लोकांची भिती वाटू लागली. कारण ते पुष्कळ होते.म्हणून त्यावेळी मिसरावर राज्य करत असलेल्या फारोने इस्राएल लोकांस मिसरी लोकांचे गुलाम करून ठेवले.

### मिसरी सोक इस्राएल लोकांना का घाबरत होते?

कारण इस्राएली लोक संख्येने पुष्कळ होते.

### इस्राएल लोकांची फारोला भीती वाटत होती म्हणून त्याने काय केले?

त्याने त्यांना मिसरी लोकांचे गुलाम केले.

---

## 09:03

मिस-यांनी इस्राएलांस अनेक इमारतींचे बांधकाम करण्यास व मोठमोठ्या शहरांचे निर्माण करण्यास सक्ती केली.अशा कष्टांच्या कामाने त्यांचे जीवन खूप त्रासदायक झाले, परंतु देवाने त्यांना आशीर्वादित केले व त्यांना आणखी मुले झाली.

---

## 09:04

फारोने पाहिले की इस्राएल लोकांना पुष्कळ मुले होत आहेत, म्हणून त्याने आदेश दिला की इस्राएलांच्या पुत्र संतानांस नाईल नदीमध्ये फेकून द्यावे.

#### इस्राएल लोकांची संख्या वाढू नये म्हणून फारोने काय प्रयत्न केले?

त्याने सर्व इस्राएली लहान पुरुषसंतानांना नाईल नदीत फेकून देणायाचा आदेश दिला.

---

### 09:05

एका इस्राएली स्त्रीने एका मुलास जन्म दिला.तिने व तिच्या पतीने आपल्या बाळास काही काळापर्यंत लपविण्याचा प्रयत्न केला.

---

### 09:06

जेंव्हा त्या बाळाचे आईवडिल त्यास लपवू शकले नाही, तेंव्हा त्यांनी त्या बाळास मृत्युपासून वाचविण्यासाठी त्याला एका तरंगणा-या टोपलीमध्ये ठेवून ती नाईल नदीच्या तीरावर लव्हाळ्यात ठेवली.त्या बाळाची थोरली बहिण त्याचे काय होईल ते पाहत होती.

#### नदीतील टोपलीतल्या मुलाचे काय झाले?

फारोच्या मुलीने त्याला पाहिले, तिने स्वत: चा मुलगा म्हणून घेतले आणि त्याचे नाव मोशे ठेवले.

---

### 09:07

फारोच्या मुलीने ती टोपली उघडून आत बघितले.जेंव्हा तिने त्या बाळास पाहिले, तेंव्हा तिने त्यास आपला पुत्र बनविले.तिने त्या बाळास दुध पाजण्यासाठी एका इस्राएली स्त्रीस बोलाविले, परंतु ती त्याची आई होती हे तिला ठाऊक नव्हते.जेंव्हा ते बाळ मोठे झाले व त्यास आपल्या आईच्या दुधाची आवश्यकता नव्हती, तेंव्हा तिने त्यास फारोच्या मुलीकडे सोपवले, तिने त्याचे नाव मोशे ठेवले.

#### नदीतील टोपलीतल्या मुलाचे काय झाले?

फारोच्या मुलीने त्याला पाहिले, तिने स्वत: चा मुलगा म्हणून घेतले आणि त्याचे नाव मोशे ठेवले.

---

### 09:08

एके दिवशी, जेंव्हा मोशे मोठा झाला, तेंव्हा त्याने एका मिसरी मनुष्यास एका यहूदी गुलामास मारताना पाहिले.मोशेने आपल्या इस्राएली बांधवास वाचविण्याचा प्रयत्न केला.

### मोशेने इस्राएली बांधवाचे रक्षण करण्यासाठी काय केले?

त्याने एका मिसरी माणसाला ठार मारले आणि मिसरी माणसाचे शरीर पुरले.

---

## 09:09

आपणांस कोणी पाहत नाही हे बघून मोशेने त्या मिस-यास जीवे मारले व त्याचे शरीर पुरले.परंतु मोशेने केलेले हे कृत्य कोणीतरी पाहिले होते.

### मोशेने इस्राएली बांधवाचे रक्षण करण्यासाठी काय केले?

त्याने एका मिसरी माणसाला ठार मारले आणि मिसरी माणसाचे शरीर पुरले.

---

## 09:10

जेंव्हा फारोने मोशेने केलेल्या कृत्याविषयी ऐकले तेंव्हा त्याने त्यास मारण्याचा प्रयत्न केला. फारोच्या शिपायांपासून सुरक्षित राहाण्यासाठी मोशे मिसर देश सोडून जंगलामध्ये पळून गेला.

### मोशे मिसर मधून पळून का जातो?

जेव्हा फारोला कळले की त्याने मिसरी माणसाला ठार मारले, तेव्हा तो त्याला जिवे मारायाला पाहत होता.

### मोशे फारो पासून पळून कुठे जातो?

तो वाळवंटात जातो.

---

## 09:11

मोशे आता मिसर देशापासून दूर जंगलामध्ये मेंढरे चारू लागला.त्याने तिथेच एका स्त्रीशी विवाह केला व त्यास दोन पुत्र झाले.

---

## 09:12

एके दिवशी मेंढरे चारत असतांना, मोशेने एक झुडूप जळत असतांना पाहिले.परंतु ते झाड जळून भस्म झाले नाही असे त्यास दिसून आले.मग ते न्याहाळून पाहावयास तो त्या झुडूपाकडे गेला.तो त्या जळत असलेल्या झुडूपाजवळ जात असतांना, देवाचा आवाज त्याच्या कानी पडला, "मोशे, तू आपल्या पायातले जोडे काढ.कारण तू पवित्र भूमीवर उभा आहेस."

### वाळवंटात आपल्या मेंढरांची काळजी घेत असताना मोशेने काय असामान्य गोष्ट पाहिली?

त्याने आगीत जळणारे झुडुप पाहिले, पण ते जळून जात नव्हते.

### तो जळणाऱ्या झुडुपाजवळ आला तेव्हा देव मोशेला काय बोलला?

देव म्हणाला, "मोशे, आपले जोडे काढ.तु पवित्र भुमीवर उभा आहेस. "

---

## 09:13

देव म्हणाला, "मी आपल्या लोकांचे दु:ख पाहिले आहे.मी तुला फारोकडे माझ्या लोकांना मिसराच्या गुलामगिरीतून सोडविण्यासाठी पाठविणार आहे.मी त्यांना कनान देश देणार आहे, जो मी अब्राहाम, इसहाक व याकोबास देण्याची प्रतिज्ञा केली होती."

### देवाला मिसर मध्ये इस्राएली लोकांची काळजी आहे, हे आपल्याला कसे कळते?

देव मोशेला म्हणाला, "मी माझ्या लोकांचे दु: ख पाहिले आहे."

### देवाने मोशेला मिसर मध्ये काय करायला पाठवले?

देवाने त्याला सांगितले फारोकडे जा आणि इस्राएल लोकांना मिसर मधल्या गुलामगिरी मधून बाहेर आण.

### देव इस्राएल लोकांना कोणती भुमी देणार असे म्हणाला होता?

कनान देशातील जमीन, देवाने अब्राहाम, इसहाक व याकोब अभिवचन दिले होते.

---

## 09:14

मोशे म्हणाला, "जर लोकांनी मला विचारले की तुला कोणी पाठविले आहे, तर मी त्यास काय सांगू?"देव म्हणाला, "मी आहे तो आहे.त्यांना सांग, ‘मी आहे याने मला तुम्हाकडे पाठविले आहे.’त्यांना हेही सांग की, मी त्यांच्या पूर्वजांचा अर्थात अब्राहाम, इसहाक व याकोबाचा देव आहे.हेच माझे सनातन नाव आहे."

### कोणत्या देवाचे नाव सर्वकाळ राहणार आहे?

परमेश्वर

---

## 09:15

मोशे फार भयभित झाला व फारोकडे जाण्यास नकार देऊ लागला कारण त्याला व्यवस्थित बोलता येत नव्हते, म्हणून देवाने मोशेचा भाऊ, अहरोन, ह्यास त्याच्या मदतीस पाठविले.देवाने मोशे व अहरोनास अगोदरच सांगून ठेवले की फारो हट्टीपणा करील.

### मोशेला मदत करण्यासाठी देवाने कोणाला पाठवले?

देवाने मोशेचा भाऊ अहरोन, याला मदत करण्यासाठी पाठविले.

### फारो मोशे व अहरोनशी कसा वागेल हे देवाने कसे सांगितले?

फारो हट्टी होईल.

# दहा पीडा

## 10:01

मोशे आणि अहरोन फारोकडे गेले.ते म्हणाले, "इस्राएलाचा देव असे म्हणतो, 'माझ्या लोकांना जाऊ द्या!" फारोने त्यांचे ऐकले नाही.इस्त्राएल लोकांना मोकळे करण्याऐवजी त्याने त्यांस आणखी कष्टाची कामे करण्याची सक्ती केली!

### मोशे आणि अहरोनाकडे फारोला देण्यासाठी देवाचा संदेश काय होता?

"माझ्या लोकांना जाऊ दे!"

### तो हा आदेश ऐकेल तेव्हा फारो काय करेल?

तो इस्राएल लोकांस अगदी कठिण काम करण्यास भाग पाडेल.

---

## 10:02

फारोने लोकांना जाण्याची सतत मनाई केली, म्हणून देवाने मिसर देशावर दहा भयानक पीडा पाठविल्या.या पीडांद्वारे देवाने दाखवून दिले की तो फारो आणि मिसरातील देवतांपेक्षा अधिक सामर्थ्यशाली आहे.

### फारो इस्राएली लोकांना जाऊ देण्यास नकार देईल तेव्हा देव काय करेल?

तो अवघ्या मिसरावर दहा भयंकर पीडा पाठविल.

### या पिडांच्या माध्यमातून देव फारोला काय दाखवेल?

की तो फारो आणि मिसरच्या सर्व देवांच्या पेक्षा अधिक प्रभावी आहे.

---

## 10:03

देवाने नाईल नदीच्या पाण्याचे रक्तामध्ये रूपांतर केले, पण तरीही फारो इस्राएलाची सुटका करावयास तयार झाला नाही.

### नाईल नदीच्या पाण्याचे देवाने काय केले?

देवाने नाईल नदीचे पाणी रक्तात बदलले.

---

## 10:04

मग देवाने सर्व मिसर देशामध्ये बेडूक पाठविले.फारोने मोशेस बेडूक दूर करण्यास विनंती केली.परंतु सर्व बेडूक मेल्यानंतर फारोचे अंतःकरण आणखी कठोर झाले व त्याने इस्राएलास मिसर देश सोडण्याची परवानगी दिली नाही.

---

## 10:05

मग देवाने उवांची पीडा पाठविली.मग त्याने गोमाशांची पीडा पाठविली.फारोने मोशे व अहरोनास बोलावून म्हटले की जर ते गोमाशांची पीडा दूर करतील तर मी इस्राएली लोकास मिसर देश सोडून जाऊ देईल.जेंव्हा मोशेने प्रार्थना केली, तेंव्हा देवाने सर्व गोमाशा दूर केल्या.परंतु फारोने आपले अंतःकरण आणखी कठोर केले व लोकांना जाण्यास मनाई केली.

---

## 10:06

पुढे, देवाने मिसरी लोकांचे सर्व पाळीव प्राणी आजारी पाडून मारले.परंतु फारोचे मन अधिक कठोर होत गेले व त्याने इस्राएलास जाऊ दिले नाही.

---

## 10:07

मग देवाने मोशेस फारोसमोर हवेमध्ये राख उधळण्यास सांगितले.त्याने असे केल्यानंतर, सर्व मिसर देशातील लोकांच्या अंगावर गळवे तयार झाले, मात्र इस्राएलावर त्याचा काही परिणाम झाला नाही.देवाने फारोचे अंतःकरण अधिक कठोर केले, व फारो आता इस्राएलास सोडण्यास तयार नव्हता.

### वेदनादायक फोडाचा परिणाम कोणावर झाला होता?

फोड मिसरच्या लोकांवरच दिसू लागले, पण इस्राएली लोकांवर नाही.

---

## 10:08

त्यानंतर, देवाने मिसर देशावर गारांचा पाऊस पाडून ब-याच पिकांचे नुकसान केले व बाहेर गेलेल्या प्रत्येक व्यक्तीस ठार मारले.फारोने मोशे व अहरोनास बोलावून म्हटले, "मी मोठे पाप केले आहे.तुम्ही जाऊ शकता."मग मोशेने प्रार्थना केली व गारांचा पाऊन थांबला.

---

## 10:09

परंतु फारोने पुन्हा पाप केले व आपले मन कठोर केले.

---

## 10:10

मग देवाने मिसर देशावर टोळांची पीडा पाठवली.या टोळांनी गारपिटीच्या पावसामध्ये शिल्लक राहिलेले सर्व पिक खाऊन टाकले.

---

## 10:11

मग देवाने मिसरावर तीन दिवस निबिड अंधकाराची पीडा पाठविली.एवढा काळोख होता की मिसरी लोक घराबाहेर पडू शकत नव्हते.परंतु इस्राएली लोक राहत असलेल्या ठिकाणी प्रकाश होता.

**अंधाराच्या पिडेचा प्रभाव सर्वांना सारखाच झाला का?**

नाही.

---

## 10:12

या नऊ पीडांनंतरही, फारो इस्राएल लोकांना जाऊ देण्यास नाकारत होता.फारो ऐकत नसल्यामूळे देवाने आणखी एक शेवटची पीडा पाठविली.या पीडेने फारोचे मन बदलले.

## फारोने पहिल्या नऊ पीडांना कसा प्रतिसाद दिला?

त्याने लोकांना मुक्त करून जाऊ देण्यास नकार दिला.

## फारोने पहिल्या नऊ पीडांना प्रतिसाद न दिल्यामुळे देवाने काय केले?

देवाने शेवटची एक पिडा पाठवण्याचे नियोजन केले.

## ह्या शेवटच्या पिडेने असे काय केले जे पहिल्या नऊ पिडांनी केले नाही?

त्याने फारोचे मन बदलेल.

# वल्हांडण सण

## 11:01

देवाने फारोला सांगितले की जर तो इस्राएल लोकांना जाऊ देणार नाही, तर देव मिसरातील प्रथम जन्मलेल्या मनुष्यांस व प्राण्यांस जीवे मारील.जेव्हा फारोने हे ऐकले तेव्हाही त्याच्यावर काही परिणाम झाला नाही व त्याने इस्राएलास सोडले नाही.

### जर फारोने इस्राएली लोकांना जाऊ दिले नाही तर मिसरातील लोकांचे देव काय करेल, असा देव म्हणाला?

तो लोकांचे आणि प्राण्याचे सर्व प्रथम जन्मलेल्या नरांना मारुन टाकणार होता.

---

## 11:02

जो कोणी देवावर विश्वास ठेवील त्याच्या घरातील प्रथम जन्मलेल्यास वाचविण्यासाठी देवाने मार्ग काढला.प्रत्येक कुटुंबाला एक निष्कलंक कोकरु निवडायचे होते आणि ते वधायचे होते.

### लोकांची आपल्या पहिला जन्मलेल्या मुलाचे रक्षण कसे केले?

त्यांना एक निर्दोष कोकरु मारायचे होते आणि त्याचे रक्त घराच्या दारापाशी लावायचे होते.

---

## 11:03

देवाने इस्राएलास सांगितले की त्यांनी कोक-याचे कांही रक्त त्यांच्या घराच्या दरवाजाच्या चौकटीस लावावे, आणि त्याचे मांस विस्तवावर भाजून बेखमीर भाकरी व कडू भाजी बरोबर घाईघाईने खावे.त्याने त्यांना भोजन झाल्यानंतर मिसर देश सोडण्यास तयार राहण्यासही सांगितले.

### लोकांची आपल्या पहिला जन्मलेल्या मुलाचे रक्षण कसे केले?

त्यांना एक निर्दोष कोकरु मारायचे होते आणि त्याचे रक्त घराच्या दारापाशी लावायचे होते.

### देवाने कोणते विशिष्ट अन्न भाजलेल्या कोकऱ्यासोबत खाण्यास इस्राएली लोकांना सांगीतले?

खमिर न घातलेली भाकरी.

### ते खाल्या बरोबर इस्राएली लोकांना कशाची तयारी करायची होती?

मिसर सोडून जाण्यास तयार व्हायचे राहीले.

---

## 11:04

देवाने सांगितल्याप्रमाणे इस्राएलांनी सर्व तयारी केली.मध्यरात्री, देवाने जाऊन मिसरातील प्रत्येक कुटुंबातील प्रथम जन्मलेल्या पुत्रास मारले.

---

## 11:05

इस्राएलाच्या सर्व घरांच्या चौकटीवर कोक-याचे रक्त असल्यामूळे देव त्या घरांना ओलांडून गेला. त्या घरातील सर्वजण सुरक्षित होते.कोक-याच्या रक्तामुळे त्यांचा बचाव झाला होता.

### ज्या घराच्या दरवाज्यावर रक्त होते त्या घराचे देवाने काय केले?

तो ते घर ओलांडून पुढे गेला आणि आतील प्रत्येकजण सुरक्षित होते.

---

## 11:06

परंतु मिस-यांनी देवावर विश्वास ठेवला नाही व त्याच्या आज्ञा पाळल्या नाहीत.म्हणून देवाने त्यांचे घर ओलांडले नाही.देवाने मिसरातील प्रत्येक प्रथम जन्मलेल्यांस जीवे मारले.

### मिसरातील प्रत्येक लोकांच्या घरात देवाने काय केले?

त्याने प्रथम जन्मलेल्या मुलांना ठार केले.

---

## 11:07

तुरुंगातील प्रथम जन्मलेल्या मुलापासून ते फारोच्या घरातील प्रथम जन्मलेल्या मुलापर्यंत प्रत्येक मिसरी पुरूष मरण पावला.मिसर देशातील पुष्कळ लोक खुप दु:खाने रडत व विव्हळत होते.

### मिसरी लोकांच्या प्रथम जन्मलेल्या किती मुलांना ठार मारले?

फारोचे मुलासहित त्यांच्यातील सर्व प्रथम जन्मलेले.

---

## 11:08

त्याच रात्री, फारोने मोशे व अहरोनास बोलावून म्हटले, "इस्राएलांना घेऊन लगेच मिसर देश सोडा व आपल्या देवाची भक्ती (उपासना) करा.मिसरातील लोकांनीही इस्राएली लोकांना मिसर देश लगेच सोडण्याची विनंती केली.

### या पिडे नंतर फारोने मोशे व अहरोन यांना काय सांगितले?

"इस्राएली लोकांना घे आणि ताबडतोब मिसर सोडून जा!"

# निर्गमन

## 12:01

मिसर देश सोडत असतांना इस्राएल लोकांना खूप आनंद झाला.आता ते गुलाम नव्हते, ते आता वचनदत्त भूमीकडे वाटचाल करत होते!मिसरातील लोकांनी इस्राएल लोकांनी मागितलेल्या सर्व वस्तु अर्थात सोने, चांदी व इतर मौल्यवान वस्तू त्यांना दिल्या.काही परराष्ट्रीय लोकांनीही देवावर विश्वास ठेवला व इस्राएल जनतेबरोबर त्यांनीही मिसर देश सोडला.

### मिसरच्या लोकांनी इस्राएली लोकांना मिसर सोडताना काय दिले होते?

जे मागेल ते अगदी सोने, चांदी आणि इतर मौल्यवान गोष्टी.

### इस्राएली लोकांशिवाय आणखी अन्य कोणकोण मिसर सोडून गेले?

ज्यांनी देवावर विश्वास ठेवला होता अशे इतर राष्ट्रांचे काही लोक.

---

## 12:02

देवाने एका ऊंच ढगाच्या खांबाद्वारे जो दिवसा त्यांच्या पुढे चालत असे व रात्री तोच ऊंच अग्निचा खांब बनत असे त्याद्वारे त्यांचे मार्गदर्शन केले.देव नेहमी त्यांच्याबरोबर होता व प्रवासात त्यांचे मार्गदर्शन करत होता.त्यांना एकच गोष्ट करायची होती ती म्हणजे देवाचे आज्ञापालन करणे.

### इस्राएली लोकांचे देवाने कसे नेतृत्व केले?

दिवसाच्या वेळी एका उंच खांबासारख्या ढगातून आणि रात्री अग्निस्तंभाद्वारे.

---

## 12:03

थोड्या वेळाने इकडे फारोचे व त्याच्या लोकांचे मन बदलले व इस्राएलांना पुन्हा त्यांचे गुलाम करावे असे त्यांना वाटले.परमेश्वराने फारोला हट्टी व कठोर बनविले, अशासाठी की लोकांना ख-या व जीवंत देवाची ओळख पटावी व यहोवा देव हा फारो व त्याच्या देवतांपेक्षा अधिक सामर्थ्यशाली आहे हे त्यांना समजावे.

### देवाने फारोला हट्टी का केले आणि इस्राएली लोकांचा पाठलाग का करु दिला?

हे सिद्ध करण्यासाठी की तोच एक खरा देव आहे जो फारो व त्याच्या दैवतांपेक्षा अधिक शक्तिशाली आहे.

## 12:04

मग फारो व त्याचे सैन्य इस्राएल लोकांना पुन्हा त्यांचे गुलाम बनविण्यासाठी त्यांचा पाठलाग करू लागले.जेव्हा इस्राएलांनी मिसरी सैन्य त्यांचा पाठलाग करतांना पाहिले तेव्हा त्यांना समजले की ते आता मिसरी सैन्य आणि तांबड्या समुद्राच्या मध्ये अडकले आहेत.ते फार घाबरले व ओरडले, "आम्ही मिसर देश का सोडला?आता आम्ही मरणार !"

### जेव्हा इस्राएली लोक समुद्र आणि फारोच्या सैन्यांमध्ये सापडले होते तेव्हा त्यांची काय प्रतिक्रिया होती?

ते म्हणाले, "आम्ही मिसर का सोडले? आम्ही आता मरणार आहोत!"

---

## 12:05

मोशेने इस्राएलास सांगितले, "भिऊ नका! देव तुमच्या वतीने आज लढणार आहे व तुमचे तारण करणार आहे.”मग देव मोशेस म्हणाला, "लोकांना तांबड्या समुद्राकडे जाण्यास सांग."

### त्यांची भीती जाऊन शांत होण्यासाठी मोशेने इस्राएली लोकांस काय सांगितले?

"भिऊ नका!आज तुम्हासाठी देव लढेल आणि तुमचे रक्षण करीन. "

---

## 12:06

मग देवाने इस्राएली लोक व मिसरी सैन्य यांच्या मधोमध मेघस्तंभ (ढगाचा खांब) उभा केला व यामुळे मिसरी सैन्य इस्राएलास पाहू शकत नव्हते.

### देवाने इस्राएली लोकांची सुटका करताना मिसरी लोकांना कसा अडथळा आणला ?

त्याने त्यांच्या दरम्यान ढगाचा खांब ठेवला.

---

## 12:07

देवाने मोशेला तांबड्या समुद्रावर आपली काठी उभारण्यास व तो समुद्र दुभागण्यास सांगितले.मग देवाने जोरदार वा-याच्या साह्याने समुद्राचे पाणी डावीकडे व उजवीकडे हटवले,व समुद्रात कोरडी वाट तयार केली.

### देवाने इस्राएली लोकांच्या सुटकेसाठी एक मार्ग तयार करण्यासाठी मोशेला काय सांगितले?

देवाने त्याला आपला हात समुद्रावर पसरायला सांगितला ज्यामुळे पाण्याचे देन भाग होतील.

---

## 12:08

इस्राएली लोक भरसमुद्रात कोरड्या भूमिवरून चालत गेली व त्यांच्या दोन्ही बाजूंनी पाणी भिंतीसारखे झाले.

### इस्राएली लोक समुद्र पार करण्यासाठी कसे सक्षम झाले?

ते कोरड्या भूमीवरुन चालत गेले.

---

## 12:09

मग देवाने मेघस्तंभ वरती घेऊन मार्गातून हलवला यासाठी की इस्राएली लोक आपल्या हातातून निसटून जात आहेत हे मिसरी लोकांना दिसावे.मिसरी लोकांनी त्यांचा पाठलाग करावयाचे ठरवले.

---

## 12:10

व ते इस्राएलांचा पाठलाग करत समुद्रातील वाटेने आत आले, परंतु देवाने त्यांना भिती घातली व त्यांचे रथही चिखलामध्ये अडकून बसले.ते ओरडले, "पळा!"कारण देव इस्राएलांच्या वतीने लढत आहे!"

### समुद्र पार करताना इस्राएली लोकांचा पाठलाग करणाऱ्या मिसरी लोकांचे काय झाले?

परमेश्वराने मिसरच्या लोकांना गोंधळात टाकले व त्यांचे रथ अडकून बसले.

---

## 12:11

जेव्हा सर्व इस्राएल लोक सुरक्षितपणे समुद्राच्या दुस-या बाजुला पोहोचले, देवाने मोशेला आपला हात उंच करावयास सांगितले.त्याने असे केल्यानंतर, समुद्राचे पाणी मिसरी सैन्यावर पडू लागले व पूर्वीसारखे झाले.सर्व मिसरी सैन्य पाण्यात बुडून मेले.

### देवाने मिसरी सैन्याला कसे नष्ट केले?

देवाने त्या सर्व मिसरी सैन्याला पाण्याने झाकून टाकले आणि ते सगळे बुडाले.

---

## 12:12

जेव्हा इस्राएलांनी पाहिले की मिसरी सैन्य मेले, तेव्हा त्यांनी देवावर व मोशे हा देवाचा संदेष्टा आहे याजवर विश्वास ठेवला.

### मिसरी लोकांना मेलेले पाहून इस्त्राएल लोकांनी कशा प्रकारे प्रतिक्रिया केली?

त्यांनी देवावर भरवसा ठेवला आणि मोशे देवाचा संदेष्टा होता असा विश्वास ठेवला.

---

## 12:13

इस्राएल लोकांनी मोठा आनंद केला, कारण देवाने त्यांचे मरण व गुलामगिरीपासून तारण केले होते! आता ते आपल्या देवाची सेवा करण्यासाठी स्वतंत्र झाले होते.इस्राएल लोकांनी त्यांना नुकत्याच मिळालेल्या स्वातंत्र्याबद्दल पुष्कळ गीते गाऊन आनंद केला व देवाची स्तुती केली, कारण देवाने त्यांना मिसरी सैन्यांपासून तारले होते.

### इस्राएली लोकांनी देवाचे गाणे गाऊन स्तुती का केली?

कारण देवाने मिसरच्या लोकांपासून त्यांचे संरक्षण केले होते.

---

## 12:14

देवाने इस्राएलाला मिसरी लोकांवर कसा विजय दिला व त्यांची गुलामगिरीपासून कशी सुटका केली याचे स्मरण त्यांना राहावे म्हणून देवाने इस्राएलास दरवर्षी वल्हांडण सण साजरा करण्याची आज्ञा दिली.निष्कलंक कोक-याचे बलिदान देऊन त्याचे मांस बेखमीर भाकरीबरोबर खाऊन त्यांनी हा सण साजरा केला.

### इस्राएली लोकांना देवाने मिसरच्या लोकांवरील विजय लक्षात ठेवण्यासाठी काय करण्यास सांगितले?

दरवर्षी वल्हांडण सण साजरा करण्याची आज्ञा केली.

# देवाचा इस्राएलाशी करार

## 13:01

तांबडा समुद्र पार केल्यानंतर, देव इस्राएलाला जंगलामधून सीनाय पर्वताकडे घेऊन गेला.मोशेने जेथे जळते झाड पाहिले होते, तो हाच पर्वत होता.लोकांनी पर्वताच्या पायथ्याशी आपले तंबू ठोकले.

### लाल समुद्र पार केल्यानंतर देव इस्राएली लोकांना कोठे घेऊन गेला?

तो त्यांना सीनाय नावाच्या डोंगरावर घेऊन आला.

---

## 13:02

देव मोशेला व इस्राएल लोकांस म्हणाला, "जर तुम्ही माझी आज्ञा व माझा करार पाळाल, तर तुम्ही माझे खास निवडलेले लोक व्हाल, राजकीय याजकगण व पवित्र राष्ट्र असे व्हाल."

### जर इस्राएली लोकांनी देवाचे ऐकले तर देवाने त्यांना काय आश्वासन दिले?

ते त्याचे खासगीचे धन, याजकांचे राज्य, एक पवित्र राष्ट्र होईल.

---

## 13:03

तिस-या दिवशी, लोकांची आत्मिक तयारी झाल्यानंतर, देव सिनाय पर्वताच्या शिखरावर उतरत असतांना मेघगर्जना, विजेचा प्रखर प्रकाश, धूर, प्रचंड शिंगाचा नाद यासह उतरून आला.पर्वतावर जाण्याची परवानगी केवळ मोशेलाच होती.

### जेव्हा देव सीनाय पर्वतावर परत आला, तेव्हा काय चमत्कार झाला?

गडगडाट, आकाशात चमकणारी वीज, धूर व मोठ्याने रणशिंगाचा आवाज व डोंगर कंपायमान झाले.

---

## 13:04

मग देवाने त्यांना ही वचने सांगितली, "मी यहोवा, तुमचा देव आहे, ज्याने तुम्हास मिसरच्या दास्यत्वातून सोडवले.तुम्ही अन्य देवतांची पूजा करू नका."

---

## 13:05

"आपल्यासाठी कोरीव मुर्ती करू नका व तिच्या पाया पडू नका, कारण मी, यहोवा, तुझा देव ईर्षावान देव आहे.तू माझे नाव व्यर्थ घेऊ नकोस.शब्बाथ दिवसाची आठवण ठेवून तो पवित्रपणे पाळ.अर्थात सहा दिवस तू आपले सर्व काम कर व सातवा दिवस हा तुझा विश्रांतीचा दिवस व माझी आठवण करण्याचा दिवस म्हणून पाळ."

---

## 13:06

"आपल्या बापाचा व आईचा मान राख.तू खून करू नकोस.तू व्यभिचार करू नकोस.तू चोरी करू नकोस.तू खोटी साक्ष देऊ नकोस(खोटे बोलू नकोस.)तू आपल्या शेजा-याच्या बायकोचा, त्याच्या घराचा, किंवा त्याच्या कुठल्याही गोष्टीचा लोभ धरू नकोस."

---

## 13:07

मग देवाने ह्या दहा आज्ञा दगडाच्या दोन पाट्यांवर लिहून मोशेकडे दिल्या.देवाने त्यांना पालन करण्यासाठी आणखी पुष्कळ नियम व विधी देखिल दिले.जर त्यांनी हे सर्व नियम पाळले, तर देवाने त्यांना आशीर्वाद व संरक्षण देण्याचे अभिवचन दिले.जर त्यांनी त्याचे उल्लंघन केले, तर देव त्यांना शासन करील.

### त्याची आज्ञा मोडली तर देव इस्राएली लोकांना काय करेल?

तो त्यांना शिक्षा करीन.

---

## 13:08

देवाने इस्राएल लोकांना त्याच्यासाठी एक मंडप बनवण्यासाठी तपशिलवार माहिती दिली.ह्याला निवासमंडप म्हणत, यामध्ये दोन खोल्या होत्या व त्यांना दुभागणारा एक मोठा पडदा होता.पडद्याच्या पाठीमागे असणा-या खोलीमध्ये केवळ महायाजकासच जाण्याची परवानगी होती कारण तेथे देवाचा निवास होता.

### देवाने इस्राएली लोकांना त्याच्यासाठी काय बांधण्यास सांगितले.?

देवासाठी पवित्रस्थान तयार करावे यासाठीकी देवाने त्यांच्यात वस्ती करावी.

### त्याला पडद्याआड खोलीमध्ये जेथे देव राहत होता तेथे कोण प्रवेश करु शकत होते?

फक्त मुख्य याजक.

---

## 13:09

देवाच्या आज्ञेचे उल्लंघन करणारा प्रत्येक जण निवासमंडपा समोर असणा-या वेदीवर देवाला होमार्पण करण्यासाठी पशू आणू शकत असे.याजक त्या पशूस मारून त्याचे वेदीवर होमार्पण करत असे.त्या पशूच्या रक्ताद्वारे त्या व्यक्तीचे पाप झाकले जाऊन ती व्यक्ति देवाच्या दृष्टीने शुद्ध ठरत असे.मोशेचा भाऊ अहरोन व अहरोनाचे संतान यांना देवाने आपले याजक म्हणून निवडले.

### लोक त्यांच्या पापाना कसे झाकत असत?

ते अर्पणासाठी याजकाकडे प्राणी आणत असत.अर्पणातील प्राण्याचे रक्त त्यांची पापे झाकीत असत.

### देवाने त्याचे याजक म्हणुन कोणाला निवडले?

अहरोन व त्याच्या वंशाला.

---

## 13:10

देवाने दिलेल्या आज्ञा पाळावयास व केवळ त्याचीच उपासना करून त्याचे खास लोक होण्यास इस्राएल लोक सहमत झाले.परंतु देवाला आज्ञापालनाचे वचन दिल्यानंतर थोड्याच दिवसांनी त्यांनी भयंकर पाप केले.

---

## 13:11

पुष्कळ दिवस, मोशे सिनाय पर्वत शिखरावर देवाशी संभाषण करत होता. लोकांना त्याची वाट पाहता-पाहता कंटाळा आला.म्हणून त्यांनी सोने आणून त्याची मूर्ती बनविण्यासाठी ते अहरोनाकडे दिले.

### लोकांनी सीनाय पर्वतावरुन मोशेची परत येण्याची प्रतीक्षा करुन थकल्यानंतर काय केले?

त्यांनी अहरोनास एक सोन्याची मूर्ती करण्यासाठी सांगितले, आणि नंतर त्यांनी तीची उपासना केली आणि अर्पणे अर्पिली.

---

## 13:12

अहरोनाने त्याची एक वासराच्या आकाराची सोन्याची मूर्ती बनवली.लोक बेभान होऊन तिची पूजा करू लागले व त्या मूर्तीस यज्ञ करू लागले.त्यांच्या पापामुळे देवाला त्यांचा भयंकर राग आला व त्याने त्यांचा नाश करावयाचे ठरविले.

### लोकांनी सीनाय पर्वतावरुन मोशेची परत येण्याची प्रतीक्षा करुन थकल्यानंतर काय केले?

त्यांनी अहरोनास एक सोन्याची मूर्ती करण्यासाठी सांगितले, आणि नंतर त्यांनी तीची उपासना केली आणि अर्पणे अर्पिली.

### त्यांनी त्याची आज्ञा मोडली तेव्हा परमेश्वराने इस्राएली लोकांचा नाश का केला नाही?

कारण मोशेने त्यांच्यासाठी मध्यस्ती केली.

---

## 13:13

परंतु मोशेने त्यांच्यासाठी प्रार्थना केली व देवाने त्याची प्रार्थना ऐकली व त्यांचा नाश केला नाही.मोशेने पुन्हा दहा आज्ञा लिहिण्यासाठी दगडाच्या दोन नविन पाट्यां बनवल्या कारण पहिल्या पाट्या त्याने फोडल्या ङोत्या.

### देवाने दहा आज्ञा ज्या दगडी पाट्यांवर लिहिल्या होत्या त्याचे काय झाले?

मोशे रागावला आणि त्याने त्या दगडी पाट्या फोडल्या.

---

## 13:14

मग त्याने त्या मूर्तीचा कुटून चुरा केला, तो त्याने पाण्यामध्ये टाकला व लोकांना ते पाणी प्यावयास दिले.देवाने लोकांवर भयानक पीडा पाठविली व त्यांपैकी बरीचशी माणसे त्यामध्ये मरण पावली.

### मोशेने मूर्तीचे काय केले?

त्याने त्या मूर्तीचे कुटून चूर्ण केली, ती पाण्यात टाकली, आणि ते पाणी लोकांना प्यायला लावले.

---

## 13:15

मोशे पुन्हा पर्वतावर चढला व त्याने लोकांच्या क्षमेसाठी देवाकडे प्रार्थना केली.देवाने मोशेचे ऐकले व त्यांना क्षमा केली.मोशे दहा आज्ञा लिहिलेल्या नवीन पाट्या घेऊन परत पर्वतावरुन खाली उतरतो. मग देवाने सीनाय पर्वतापासून वचनदत्त देशाकडे जाण्यास लोकांचे मार्गदर्शन केले.

### दहा आज्ञा सह दगडी पाट्या कशा बदलल्या?

मोशेने नवीन दगडी पाट्या वर दहा आज्ञा लिहिल्या.

### सीनाय पर्वतावरुन नंतर इस्राएली लोक कुठे गेले?

देव इस्राएली लोकांना वचन दिलेल्या देशात घेवून गेला.

# जंगलामध्ये भटकणे

## 14:01

देवाने इस्राएल लोकांशी केलेल्या कराराचा भाग म्हणून जे नियम त्यांना पाळण्यासाठी दिले होते ते सांगून झाल्यानंतर त्यांनी सीनाय पर्वत सोडला.देव त्यांना वचनदत्त देशाकडे, ज्याला कनान देश सुदधा म्हटले जायचे त्याकडे त्यांना घेऊन जात होता.कनान देशाकडे जात असतांना मेघस्तंभ त्यांच्यापुढे गेला व ते त्यांच्या पाठीमागे गेले.

### सीनाय पर्वत सोडल्यानंतर देव इस्राएली लोकांना कुठे घेवून गेला?

तो त्यांना वचन दिलेल्या कनान, देशात घेवून गेला.

---

## 14:02

देवाने अब्राहाम, इसहाक व याकोब यांना वचन दिले होते की त्यांच्या वंशजांना तो वचनदत्त देश देईल, पण आता त्या ठिकाणी अनेक प्रकारचे लोक राहत होते.त्यांना कनानी असे म्हणत असत.कनानी लोक देवाची आराधना करीत नव्हते व त्याची आज्ञा मानत नव्हते.ते खोट्या देवदवतांची पुजा करीत होते व पुष्कळ वाईट गोष्टी करीत होते.

---

## 14:03

देव इस्राएलास म्हणाला, "वचनदत्त देशामधील कनानी लोकांचा तुम्ही पुर्णपणे नाश करा.त्यांच्याशी शांतीने वागू नका व त्यांच्याशी विवाह करू नका.तुम्ही त्यांच्या सर्व मूर्त्यांचा समूळ नाश करा.जर तुम्ही माझ्या आज्ञा पाळल्या नाही, तर तुम्ही माझ्याऐवजी त्यांच्या मूर्त्यांच्या पाया पडाल ."

### देवाने इस्राएली लोकांना कनानी लोकांशी कसे वागण्यास सांगितले?

त्यांना घालवून द्या, त्यांच्याबरोबर शांतीने राहू नका, त्यांच्याशी लग्न करु नका, आणि त्यांच्या सर्व मूर्ती नष्ट करा.

---

## 14:04

जेव्हा इस्राएल लोक कनान देशाच्या सीमेवर आले, तेव्हा मोशेने इस्राएलाच्या बारा वंशामधून प्रत्येकी एक अशा बारा मनुष्यांस निवडले.त्याने त्या मनुष्यांस कसे जावे व देश कसा हेरावा याविषयी सुचना देऊन तो देश कसा आहे हे बघायला सांगितले.कनानी लोकांवरतीही हरगिरी करुन ते शक्तिशाली आहेत की दुर्बल आहेत हे पाहायला सांगितले.

---

## 14:05

ही बारा माणसे चाळीस दिवस कनानात फिरली व परत आली.त्यांनी लोकांस सांगितले. "जमीन एकदम सुपीक आहे व पिकपाणी भरपूर आहे.परंतु दहा हेर म्हणाले, "शहरे खूप मजबूत व तटबंदीची आहेत तेथिल लोक धिप्पाड आहेत!"जर आपण त्यांच्यावर हल्ला केला तर ते निश्चितच आपला पराभव करतील व आपणांस जीवे मारतील!"

### बारा हेरांनी कनान देशा विषयी काय म्हटले?

जमीन फार सुपीक आहे आणि पिके फार आहेत.

### दहा हेर इस्राएली लोकांना कनान लोकांवर हल्ला करु नये असे का म्हणाले?

ते म्हणाले, "नगरे मजबूत आहेत आणि लोक महाकाय आहेत.जर आपण त्यांच्यावर हल्ला केला तर ते आपला पराभव करतील आणि आपल्याला मारतील! "

---

## 14:06

लगेच कालेब आणि यहोशवा हे दोघे हेर म्हणाले, "कनानी लोक उंच व बलाढ्य आहेत ही गोष्ट खरी आहे, परंतु आपण त्यांचा निश्चितपणे पराभव करु शकतो.देव आमच्या बाजूने लढेल!"

### कनानी लोकांविषयी कालेब व यहोशवा काय म्हणतात?

लोक खूप शक्तिशाली आहेत, पण आम्ही त्यांना पराभव करू शकतो. देव आमच्यासाठी लढेल!

---

## 14:07

परंतु लोकांनी कालेब व यहोशवाचे ऐकले नाही.ते मोशे व अहरोनावर भडकले व म्हणाले, "तुम्ही आम्हांस अशा भयानक ठिकाणी का आणिले?"इथे युद्धामध्ये मरणे व आमच्या बायका व मुले यांना गुलाम बनण्यापेक्षा मिसर देशामध्ये राहणे हे बरे होते.आपणांस पुन्हा मिसर देशामध्ये घेऊन जाईल असा वेगळा नेता त्यांना निवडायचा होता.

### हेरांनी आणलेली बातमी ऐकल्यानंतर लोक काय करू इच्छित होते?

ते दुसरा नेता निवडून आणि मिसर देशात परत जाणार होते.

---

## 14:08

हे पाहून देव रागावला व दर्शनमंडपाजवळ आला.देव म्हणाला, "तुम्ही माझ्याविरूद्ध बंड पुकारल्यामुळे आता तुम्हा सर्वांना ह्या जंगलामध्ये भटकावे लागेल.फक्त यहोशवा आणि कालेब, यांना सोडून बाकी सर्व वीस वर्षाचे व वीस वर्षांवरील लोक या जंगलामध्येच मरतील व त्यांचा वचनदत्त देशामध्ये प्रवेश होणार नाही.”

### त्यांच्या आज्ञाभंगामुळे देवाने लोकांना कशी शिक्षा दिली?

ते प्रत्येकजण जे वीस वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वर्षाचे आहेत ते फक्त कालेब व यहोशवा वगळता अरण्यात भटकतील, आणि मरण पावतील.

---

## 14:09

लोकांनी हे ऐकल्यावर, त्यांना असे केल्याचे दु:ख झाले.त्यांनी आपली हत्यारे घेतली व कनानी लोकांविरूद्ध लढाई करायला गेले.मोशेने त्यांना सावध केले व म्हटले की जाऊ नका कारण देव त्यांच्याबरोबर नव्हता, तरी त्यांनी त्याचे ऐकले नाही.

---

## 14:10

या युद्धामध्ये देव त्यांच्याबरोबर गेला नव्हता, म्हणून त्यांचा पराभव झाला व बरेच जण मृत्युमुखी पडले.मग इस्राएली लोक कनानमधून परतले व चाळीस वर्षे जंगलामध्ये भटकत राहिले.

### त्यांनी कनानी लोकांवर हल्ला केला तेव्हा इस्राएली लोकांचा पराभव का झाला?

कारण लढाईसाठी देव त्यांच्या बरोबर गेला नाही.

---

## 14:11

त्यांच्या या चाळीस वर्षाच्या भटकंतीच्या समयी देवाने जंगलामध्ये देखिल त्यांच्या सर्व गरजा पुरविल्या.त्याने त्यांना स्वर्गातील भाकर ज्याला त्यांनी "मान्ना" म्हटले ती खावयास दिली.त्याने त्यांच्या तंबूमध्ये लावा पक्षांचे(हे पक्षी मध्यम आकाराचे असतात) थवे पाठविले, अशासाठी की त्यांना मांस खावयास मिळावे.या काळामध्ये, देवाने त्यांची वस्त्रे फाटू दिली नाहीत व त्यांची पादत्राणेही झिजू दिली नाहीत.

### इस्राएली लोक अरण्यात किती काळ भटकले?

चाळीस वर्षे.

### देवाने इस्राएली लोकांना वाळवंटात कशी तरतूद केली?

त्याने त्यांना "मान्ना" दिला, लावे पक्षाचे कळप पाठविले, आणि त्यांचे कपडे आणि जोडे फाटले नाहीत, खडकातील पाणी पाजले.

---

## 14:12

देवाने आश्चर्यकारक रितीने त्यांना खडकामधून पाणी दिले.पण तरीहि इस्राएल लोकांनी देवाविरूद्ध व मोशेविरूद्ध कुरकुर केली.तरीदेखील देव अब्राहाम, इसहाक व याकोब यांना दिलेल्या अभिवचनाविषयी विश्वासू राहिला.

### लोकांनी तक्रार केली आणि पुटपुटले तेव्हा देवाने कसा प्रतीसाद दिला?

देव अजूनही अब्राहाम, इसहाक व याकोब यांना दिलेल्या वचना बद्दल विश्वासू होता.

---

## 14:13

अजून एकदा जेव्हा लोकांना प्यावयास पाणी नव्हते, तेव्हा देव मोशेस म्हणाला, "खडकाशी बोल, म्हणजे त्यातून पाणी निघेल."परंतु त्या खडकास आज्ञा करण्याऐवजी त्याने दोनदा त्या खडकावर काठी मारून सर्व लोकांसमोर देवाचा अनादर केला.सर्वांना पिण्यासाठी खडकातून पाणी आले, परंतु देव मोशेवर रागावला आणि म्हणाला, "तू वचनदत्त देशात प्रवेश करणार नाहीस."

### मोशेने खडकावर मारले तेव्हा देव का रागावला होता?

कारण देवाने जसे सांगितले तसे मोशेने नाही केले म्हणून देव रागावला.

### देवची आज्ञा न पाळल्यामुळे मोशेला काय शिक्षा दिली?

देव मोशेला, वचन दिलेल्या देशात तुला प्रवेश करता येणार नाही, असे म्हणाला.

---

## 14:14

चाळीस वर्षे इस्राएल लोक जंगलामध्ये भटकले, ज्या इस्राएलांनी देवाविरूद्ध बंड केले, ते सर्व तेथेच मरण पावले.मग देवाने लोकांस पुन्हा त्या वचनदत्त देशाकडे येण्यास त्यांचे मार्गदर्शन केले.मोशे आता वयोवृद्ध झाला असल्यामूळे परमेश्वराने लोकांचे नेतृत्व करण्यास त्याची मदत करण्यासाठी यहोशवाची निवड केली.देवाने मोशेस हेही आश्वासन दिले की एक दिवस त्याच्या सारखाच दुसरा संदेष्टा देव पाठविल.

### भविष्यात एक दिवस कोणाला पाठविण्याचे आश्वासन देवाने दिले?

मोशे सारखा दुसरा संदेष्टा.

---

## 14:15

मग देवाने मोशेस अबीराम पर्वताचे नबो नामक शिखरावर जाऊन वचनदत्त देश पाहावयास सांगितले.मोशेने वचनदत्त देश पाहिला, परंतु देवाने त्यास तेथे प्रवेश करण्यास परवानगी दिली नाही.मग मोशे मरण पावला व इस्राएलांनी चाळीस दिवस त्याच्यासाठी शोक केला.यहोशवा त्यांचा नविन नेता बनला.यहोशवा एक चांगला नेता झाला कारण त्याने देवावर विश्वास ठेविला व त्याच्या आज्ञा पाळल्या.

### मोशेच्या मृत्यूनंतर नंतर इस्राएली लोकांचे नेतृत्व कोणी केले?

यहोशवा.

### यहोशवा नेता कसा होता?

तो एक चांगला नेता होता कारण तो देवावर विश्वास ठेवत होता आणि त्याच्या आज्ञेत राहात होता.

# वचनदत्त देश

## 15:01

शेवटी आता इस्राएलांना कनानामध्ये, वचनदत्त देशामध्ये प्रवेश करण्याची वेळ आली.यहोशवाने कनानी शहर यरीहो जे मोठ्या वेशींनी सुरक्षित केले गेले होते, तेथे दोन हेरांस हेरगिरी करण्यास पाठविले.त्या शहरामध्ये रहाब नावाची एक वेश्या राहत होती. तिने त्या हेरांना आपल्या घरामध्ये लपवले व नंतर त्यांना निसटून जाण्यास मदत केली.तिने असे केले कारण तिने देवावर विश्वास ठेवला होता.जेव्हा इस्राएल लोक यरीहोचा नाश करतील तेव्हा रहाब व तिच्या घराण्याचे रक्षण करण्याचे त्यांनी वचन दिले.इस्राएलांना वचनदत्त देशामध्ये प्रवेश करण्यासाठी यार्देन नदी पार करणे अगत्याचे होते.

### जेव्हा वचन दिलेल्या देशात प्रवेश करण्याची वेळ आली, तेव्हा यहोशवाने प्रथम काय केले?

त्याने यरीहो शहर पाहण्यासाठी दोन हेर पाठवले.

### हेरांनी रहाब वेश्याला काय वचन दिले?

इस्राएली लोक शहर नष्ट करतील तेव्हा ते रहाब आणि तिच्या कुटुंबाचे संरक्षण देतील.

---

## 15:02

देवाने यहोशवास सांगितले, "प्रथम याजकांस पुढे जाऊ द्या."जेव्हा याजकांच्या पायाचा स्पर्श पाण्यास झाला तेव्हा यार्देन नदीचा वरून येणारा प्रवाह बंद झाला व इस्राएल लोक कोरड्या जमिनीवरून चालत नदीच्या पलिकडे जाऊ शकले.यार्देन नदी पार केल्यानंतर, देवाने यहोशवास सांगितले की कशा प्रकारे त्यांनी मजबूत यरीहो नगरावर हल्ला करावा.

### इस्राएली लोकांना यार्देन नदी पार करणे कसे शक्य झाले?

याजकांनी यार्देन नदी मध्ये पाउल टाकले असताना, वाहते पाणी थांबले.

---

## 15:03

लोकांनी देवाच्या आज्ञेचे पालन केले.देवाने सांगितल्या प्रमाणेच सर्व सैनिकांनी व याजकांनी यरीहो शहरास सहा दिवस प्रत्येकी एक वेळा प्रदक्षिणा घातल्या.मग सातव्या दिवशी, इस्राएलांनी आणखी सात वेळा शहरास प्रदक्षिणा घातल्या.

### इस्राएली लोकांनी यरीहोवर कसा हल्ला केला?

त्या सर्वांनी नगराभोवती दिवसातून एकदा असे सहा दिवस व नंतर सातव्या दिवशी त्यांनी नगराभोवती चालून आणखी सात वेळा फेऱ्याघातल्या.जेव्हा ते शेवटच्या वेळी नगराभोवती चालत असताना याजक कर्णे वाजवत असताना, सैनिकांनी मोठ्यांनी जयजयकार केला.

---

## 15:04

शेवटच्या वेळी प्रदक्षिणा घालत असतांना सैनिकांनी गर्जना केल्या व याजकांनी आपली कर्णे वाजवले.मग यरीहो शहराच्या भिंती कोसळल्या.

### इस्राएली लोकांनी यरीहोवर कसा हल्ला केला?

त्या सर्वांनी नगराभोवती दिवसातून एकदा असे सहा दिवस व नंतर सातव्या दिवशी त्यांनी नगराभोवती चालून आणखी सात वेळा फेऱ्याघातल्या.जेव्हा ते शेवटच्या वेळी नगराभोवती चालत असताना याजक कर्णे वाजवत असताना, सैनिकांनी मोठ्यांनी जयजयकार केला.

---

## 15:05

देवाने आज्ञा दिल्याप्रमाणे इस्राएलांनी शहराचा नाश केला.त्यांनी केवळ राहाब व तिच्या कुटुंबास जिवंत ठेविले, जे नंतर इस्राएलांचा एक भाग बनले.जेव्हा कनानमध्ये राहणा-या इतर लोकांनी ऐकले की इस्राएलांनी यरीहो नगराचा नाश केला आहे, तेव्हा इस्त्राएली लोक त्यांच्यावरही हल्ला करतील याची त्यांना भिती वाटली.देवाने इस्राएलास आज्ञा केली होती की त्यांनी कनानी लोकांबरोबर शांतीचा करार करु नये.

### सैनिकांनी जयजयकार केला व याजकाने कर्णे वाजवले तेव्हा काय झाले?

यरीहोच्या भिंती खाली पडल्या आणि जेणेकरुन इस्राएली लोकांनी शहरातील सर्वकाही नष्ट करावे.

### रहाब आणि तिच्या कुटुंबाचे काय झाले?

त्यांना ठार करण्यात आले नाही, आणि इस्राएलाचा भाग बनवले.

---

## 15:06

परंतु गिबोनी नावाचा कनानामधील एक लोकगट यहोशवाबरोबर खोटे बोलला ते म्हणाले की ते कनानापासून खूप लांब रहातात.त्यांनी यहोशवास त्यांच्यासोबत शांतीचा करार करण्यास विनंती केली.यहोशवा व इस्राएल यांनी गिबोनी लोक कोठून आले होते याची देवाकडे विचारपूस केली नव्हती.

### गिबोनच्या लोकांनी इस्राएली लोकांशी फसवणूक करुन कशा प्रकारे शांती तह केला?

ते म्हणाले त्यांचे ठिकाणी कनान पासून फार दूर आहे.

### यहोशवा व इस्राएली लोकांना गिबोनच्या खोट्यापणा विषयी का समजले नाही?

त्यांनी देवाला विचारले नाही.

---

## 15:07

म्हणून यहोशवाने त्यांच्याशी शांतीचा करार केला.जेव्हा इस्राएलास समजले की गिबोनी लोकांनी त्यांची फसवणूक केली आहे, तेव्हा ते खूप रागावले, पण तरीही त्यांनी तो करार पाळला कारण त्यांनी देवासमोर त्यांना वचन दिले होते.काही काळानंतर, कनानामधील इतर लोकगटाच्या राजांनी, अमोरी लोकांनी, ऐकले की गिबोनी लोकांनी इस्राएलाबरोबर करार केला आहे, तेव्हा त्यांनी आपले सैन्य एकत्र करून गिबोन्यांवर हल्ला केला.गिबोन्यांनी यहोशवाकडे संदेश पाठविला व त्यांना मदत करण्याची विनंती केली.यास्तव यहोशवाने इस्राएलाच्या सैनिकांस जमा केले व गिबोन्यांकडे पोहोचण्यासाठी रात्रभर चालत राहिले.

### इस्राएली लोकांनी शांती तहाचा मान का ठेवला आणि गिबोनचे रक्षण केले?

त्यांनी देवाला वचन दिले होते.

---

## 15:08

पहाटेच त्यांनी अमोरी सैनिकांना आश्चर्याचा धक्का दिला व त्यांच्यावर हल्ला केला.त्या दिवशी इस्राएलाच्या बाजूने देव स्वतः लढला.

---

## 15:09

त्याने अमोरी सैनिकांमध्ये गोंधळ निर्माण केला व त्यांच्यावर मोठ्या गारा पाडल्या, ज्यामध्ये अनेक अमोरी मरण पावले.देवाने सुद्धा सूर्यास आकाशात एका जागी स्थिर राहाण्याची आज्ञा केली कारण इस्राएलांना अमो-यांचा पुर्णपणे नाश करण्यास वेळ मिळावा.

### देव अमोरी लोकांविरुद्ध इस्राएली लोकांसाठी कसा लढला?

त्याने अमोरीचा गोंधळ केला, त्यांच्यावर मोठ्या गारा पाठवल्या, आणि इस्राएली लोकांना त्यांचा पूर्णपणे पराभूत करण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून सूर्याला एकाच ठिकाणी स्थिर राहू दिले.

---

## 15:10

त्या दिवशी देवाने इस्राएलाला मोठा विजय प्राप्त करून दिला.देवाने त्या सैनिकांस पराजित केल्यानंतर, अनेक कनानी लोकगटांनी एकत्र येऊन इस्त्राएलावर चढाई केली.

### देव अमोरी लोकांविरुद्ध इस्राएली लोकांसाठी कसा लढला?

त्याने अमोरीचा गोंधळ केला, त्यांच्यावर मोठ्या गारा पाठवल्या, आणि इस्राएली लोकांना त्यांचा पूर्णपणे पराभूत करण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून सूर्याला एकाच ठिकाणी स्थिर राहू दिले.

---

## 15:11

यहोशवा आणि इस्राएलांनी त्यांच्यावर हल्ला करून त्यांचा नाश केला.या लढाईनंतर देवाने इस्राएलाच्या प्रत्येक वंशास वचनदत्त देशाची वाटणी करुन दिली.

### इतर कनानी लोकांच्या गटाने त्यांच्यावर हल्ला केला तेव्हा यहोशवा व इस्राएली लोकांनी काय केले?

यहोशवा व इस्राएली लोकांनी त्यांचा नाश केला.

---

## 15:12

त्यानंतर देवाने इस्राएलाच्या सर्व सीमेवर शांती प्रस्थापित केली.जेव्हा यहोशवा वृद्ध झाला, तेव्हा त्याने सर्व इस्राएली लोकांस एकत्र बोलावले.

### वचन दिलेल्या देशाची कशी विभागणी झाली?

देवाने इस्राएलच्या बारा वंशांना त्याच्या स्वत: च्या मालकीचा भाग दिला.

---

## 15:13

मग यहोशवाने इस्राएली लोकांस देवाने त्यांच्याशी केलेल्या सीनाय पर्वतावरील कराराचे स्मरण करून दिले की त्यांनी देवाच्या आज्ञा पाळाव्यात.सर्व लोकांनी देवाशी विश्वासू राहण्याचे व त्याच्या आज्ञा पाळण्याचे वचन दिले.बायबल कथाः

## यहोशवाने तो म्हातारा झाल्यावर इस्राएली लोकांना एकत्र का बोलवले?

देवाच्या कराराचे पालन व त्यांच्या बंधनाची त्यांना आठवण करून देण्यासाठी जेणेकरुन देव त्यांच्यासोबत असावा.

## इस्राएली लोकांनी यहोशवाला कसे उत्तर दिले?

त्यांनी देवाशी विश्वासू राहण्याचे आणि त्याच्या आज्ञा पाळण्याचे वचन दिले.

# तारणारे = = = = = =

## 16:01

यहोशवाच्या मृत्युनंतर, इस्त्राएल लोकांनी देवाचे अनुकरण केले नाही, उरलेल्या कनानी लोकांना घालवून दिले नाही व देवाचे नियम पाळले नाहीत.याव्हे ख-या व जिवंत देवाची उपासना न करता इस्त्राएली लोक कनानी देवतांची पूजा करू लागले.इस्त्राएलांस राजा नव्हता, म्हणून प्रत्येक जण आपल्या दृष्टिने जे बरे ते तो करत असे.

### इस्राएली लोकांनी यहोशवाच्या मृत्यूनंतर देवाची आज्ञा कशी मोडली?

त्यांनी परमेश्वर देवा या खऱ्या देवा ऐवजी, कनानी दैवतांची उपासना केली.

---

## 16:02

इस्त्राएलांनी सतत देवाच्या आज्ञा मोडल्यामुळे, देवाने त्यांना त्यांच्या शत्रूंच्या पुढे पराभूत करून शिक्षा दिली. ह्या शत्रूंनी इस्त्राएल लोकांची वस्तूंची चोरी केली, त्यांच्या संपत्तीचा नाश केला व त्यांच्यातील कित्येकांना मारून टाकले.अनेक वर्षानंतर देवाचा आज्ञाभंग व शत्रूद्वारे जुलूम सोसून झाल्यानंतर त्यांना पश्चाताप झाला व त्यांनी सुटकेसाठी देवाकडे धाव घेतली.

### देवाने इस्राएली लोकांना त्यांच्या पापांची शिक्षा कशा प्रकारे दिली?

देवाने त्यांच्या शत्रूंना त्यांना पराभूत करण्यासाठी परवानगी दिली.

---

## 16:03

मग देवाने त्यांना एक तारणारा पाठविला ज्याने त्यांना शत्रूंपासून सोडविले व त्यांच्या मध्ये शांती प्रस्थापित झाली.पण नंतर इस्त्राएल लोकांना देवाचा विसर पडला व ते पुन्हा मूर्तिपूजा करू लागले.मग देवाने शेजारच्या मिद्यांनी लोकांद्वारे त्यांचा पराभव केला.

### इस्राएल मदतीसाठी धावा केला तेव्हा देवाने कसे उत्तर दिले?

त्याने एक तारणारा दिला, जो त्यांची सुटका करेल आणि देशात शांतता आणील.

---

## 16:04

मिद्यांनी लोकांनी सात वर्षे इस्त्राएल लोकांचे अन्न - धान्य हडप केले.आता इस्त्राएली खूप भयभीत झाले व आपण मिघान्यांच्या हातामध्ये सापडू नये म्हणून ते गुहेमध्ये राहू लागले. शेवटी आपला बचाव व्हावा म्हणून ते देवाकडे विनवणी करू लागले.

---

## 16:05

एके दिवशी गिदोन नावाचा एक इस्त्राएली मनुष्य मिद्यान्यांनी आपले धान्य चोरू नये म्हणून गुप्तपणे त्यांची झोडणी करीत होता.यहोवाचा एक दूत येऊन त्याला म्हणाला, ‘‘हे बलवान वीरा, देव तुझ्याबरोबर आहे.जा आणि इस्त्राएलाला मिद्यान्यांच्या हातातून सोडव.’’

### परमेश्वराचा दूत त्याच्याकडे आला तेव्हा गिदोन काय करत होता?

मिद्यानी लेकांनी चोरु नये म्हणुन गिदोन गुप्तपणे धान्याची मळणी करीत होता.

---

## 16:06

गिदोनाच्या पित्याने एका मूर्तीसाठी वेदी बनवली होती.देवाने गिदोनास ती वेदी तोडण्यास सांगितले.परंतु गिदोनास लोकांचे भय वाटल्यामुळे तो अंधार पडण्याची वाट पाहत होता.मग त्याने ती वेदी फोडून तिचे तुकडे तुकडे केले.मुर्तीसाठी बांधलेल्या वेदीजवळत्याने जीवंत देवासाठी एक नवीन वेदी बांधली व त्यावर देवाला पशूबली अर्पण केला.

---

## 16:07

दुस-या दिवशी त्या वेदीचा कोणीतरी नाश केला आहे हे पाहून लोक खूप रागावले.ते गिदोनास जीवे मारण्यासाठी त्याच्या घरी गेले, पण गिदोनाचा पिता त्यांस म्हणाला, ‘‘तूम्ही आपल्या देवाची मदत करण्याचा प्रयत्न का करता?जर तो देव आहे तर त्याला स्वत:चे रक्षण करु द्या!’’त्याने असे म्हटल्यामुळे त्यांनी गिदोनास मारिले नाही.

---

## 16:08

मग मिद्यानी लोक पुन्हा इस्त्राएल लोकांचे धान्य चोरी करण्यासाठी आले. ते इतके पुष्कळ होते की, ते मोजण्याच्या पलीकडे होते.गिदोनाने इस्त्राएल लोकांस एकत्र बोलावून मिद्यान्यांशी युध्द करण्यास तयार केले.गिदोनाने देव आपणास इस्त्राएल लोकांची सुटका करण्यासाठी उपयोग करणार आहे याची खा़त्री पटावी म्हणून देवाकडे दोन चिन्हे मागितली.

### कोणते दोन चमत्कार देवाने केले ज्यामुळे गिदोनच्या माध्यमातून इस्राएली लोकांचे रक्षण होईल?

देवाने सकाळी दव फक्त कापडावर पाडले आणि जमिनीवर नाही, आणि नंतर दव फक्त जमिनीवर पाडले कापडावर नाही.

---

## 16:09

पहिले चिन्ह म्हणून गिदोनाने जमिनीवर कपडा ठेवला व देवाला म्हटले की उद्या सकाळी जमिनीवर दहिवर न पडता फक्त कापडावरच पडावे असे होवो.देवाने तसेच केले.दुस-या रात्री, त्याने म्हटले की जमीन भिजावी पण कपडा सुकाच रहावा असे होवो.देवाने तेही केलेहया दोन्ही चिन्हांद्वारे गिदोनास खात्री पटली की देव त्याचा उपयोग इस्राएलाला मिद्यान्यांपासून सोडविण्यासाठी उपयोग करणार आहे.

### कोणते दोन चमत्कार देवाने केले ज्यामुळे गिदोनच्या माध्यमातून इस्राएली लोकांचे रक्षण होईल?

देवाने सकाळी दव फक्त कापडावर पाडले आणि जमिनीवर नाही, आणि नंतर दव फक्त जमिनीवर पाडले कापडावर नाही.

---

## 16:10

32,000 इस्त्रायली सैनिक त्याच्याकडे आले, परंतु देवाने त्याला सांगितले की, ते खूप आहेत.म्हणून युध्द करण्यास भिणा-या 22000 सैनिकांना त्याने परत पाठविले.देवाने गिदोनास सांगितले की ते अजूनही पुष्कळ आहेत.म्हणून 300 सैनिकांना सोडून बाकी सर्वांना त्याने घरी पाठवून दिले.

### गिदोनाने 300 सैनिक वगळता सर्व घरी का पाठवून दिले?

कारण देवाने त्याला सांगितले की ती खूप माणसे होती.

---

## 16:11

त्या रात्री देवाने गिदोनास सांगितले,‘‘तू मिद्यान्यांच्या छावणीकडे जा व ते काय बोलतात हे ऐकून भयभित होऊ नकोस.’’म्हणून त्या रात्री तो छावणीकडे गेला व आपणास पडलेले स्वप्न एक मिद्यानी सैनिक आपल्या मित्रास सांगत असल्याचे गिदोनाने ऐकले.त्या सैनिकाचा मित्र म्हणाला,‘‘ हया स्वप्नाचा अर्थ गिदोनाचे सैन्य मिद्यानी सैन्यांचा पराभव करील असा होतो!’’गिदोनाने हे ऐकून देवाची उपासना केली.

### देवाने कोणते अतिरिक्त चिन्ह गिदोनाने भिऊ नये म्हणून दिले?

गिदोनाने ऐकले की एक मिद्यानी सैनिक त्याचे स्वप्न सांगत होता की गिदोनाचे सैन्य मिद्यानी सैन्यांला पराभूत करेल.

### गिदोन जेव्हा मिद्यानी सैनिकाचे स्वप्न ऐकले तेव्हा काय केले?

त्याने देवाची उपासना केली.

---

## 16:12

मग गिदोन आपल्या सैनिकांकडे परतला व त्याने प्रत्येकास एक शिंग, एक मडके व एक मशाल दिली.मिद्यानी सैनिक झोपले होते त्या छावणीस त्यांनी घेरा घातला.गिदोनाच्या 300 सैनिकांनी आपल्या मशाली मडक्यात घालून ठेवल्यामुळे मिद्यान्यांना त्यांचा प्रकाश दिसला नाही.

---

## 16:13

मग, एकाच वेळी गिदोनाच्या सैनिकांनी मडकी फोडली व आपल्या मशालीचा जाळ दिसू दिला.त्यांनी आपापली रणशिंगे फूंकली व गर्जना केली,‘‘याव्हे देवाची तलवार व गिदोनाची तलवार!’’

### गिदोन आणि त्याच्या बरोबरचे लोकांनी मिद्यानीवर कसा हल्ला केला?

त्यांनी मिद्यानी छावणीला वेढला दिला आणि त्यांच्या मशाली एकदम दिसण्यासाठी त्यांनी आपली भांडी फोडली, आणि त्यांनी शिंगे फुंकली आणि मोठ्याने ओरडले, "यहोवाची आणि गिदोनची तलवार."

---

## 16:14

देवाने मिद्यान्यांना गोंधळून टाकले व त्यामुळे ते आपसांतच एकमेकांवर हल्ले करु लागले व मारु लागले.लगेच, मिद्यान्यांना हाकलण्यासाठी मदत करायला म्हणून बाकीच्या इस्राएली लोकांना त्यांच्या घरी बोलावणे पाठवले गेले.त्यांनी त्यांपैकी कित्येकांना जीवे मारिले व बाकीच्यांना इस्त्राएलाच्या भूमितून घालवून दिले.त्याच दिवशी 120000 मिद्यांनी सैनिक मारले गेले.देवाने इस्त्रायलाची अशा प्रकारे सुटका केली.

### मिद्यानी पराभूत करण्यासाठी देवाने गिदोनाला काय मदत केली?

देवाने मिद्यानींना गोंधळून टाकले त्यामुळे त्यांनी हल्ला केला आणि एकमेकांना ठार केले.

---

## 16:15

लोक गिदोनास आपला राजा बनवू पहात होते.गिदोनाने त्यांना असे करण्यास मना केले, पण त्यांच्यातील प्रत्येकाने मिद्यान्यांकडून घेतलेल्या सोन्याच्या अंगठयांपैकी कांही त्याने मागितल्या.लोकांनी गिदोनास पुष्कळ सोने दिले.

---

## 16:16

मग गिदोनाने त्या सोन्यापासून महायाजक घालत असलेल्या वस्त्रासारखे एक विशेष वस्त्र तयार केले.परंतू लोकांनी त्या वस्त्रास एक मूर्ती मानून तिची पूजा ते करु लागले.मग देवाने इस्त्रायलांस पुन्हा शासन केले, कारण त्यांनी मूर्तिपूजा केली होती.देवाने त्यांच्या शत्रूंना त्यांचा पराभव करु दिला.शेवटी त्यांनी देवाचीच मदत मागितली व देवाने त्यांना दुसरा तारणारा पाठविला.

### काय गिदोनाने नंतर असे काय केले की लोकांना परत मूर्तिपूजेकडे वळनिले?

त्याने सोन्याचे एक विशेष वस्त्र केले ज्याची नंतर लोकांनी एक मूर्ती समजून पूजा करायला सुरवात केली.

---

## 16:17

हया नमुन्याची अनेकदा पुनरावृत्ती झाली. इस्त्रायली पाप करत, देव त्यांना शासन करी, ते पश्चात्ताप करत आणि देव त्यांचे तारण करण्यासाठी तारणारा पाठवत असे.अनेक वर्षापासून, देवाने इस्त्राएली लोकांकडे त्यांना शत्रूंपासून सोडविण्यासाठी अनेक तारणारे पाठविले.

### इस्राएली लोक अनेक वेळा कोणत्या गोष्टीची पुनरावृत्ती करत होते?

इस्राएली लोकांनी पाप करायचे, देवाने त्यांना शिक्षा करायची, त्यांनी पश्चात्ताप करायचा आणि देवाने त्यांचे रक्षण करण्यासाठी तारणारा पाठवायचा.

---

## 16:18

शेवटी, लोकांनी इतर राष्ट्रांसारखा राजा देवाकडे मागितला.त्यांना उंच, सशक्त व युद्धामध्ये नेतृत्व करणारा असा राजा हवा होता.देवाला हे आवडले नाही, तरीही त्याने त्यांच्या मागणी नुसार त्यांना एक राजा दिला.

### लोकंनी देवाला राजा का मागितला?

इतर राष्ट्रांना राजे होते, आणि त्यांना लढाईमध्ये कोणीतरी मदतीला घेऊन जण्याची ईच्छा होती.

### देवाने त्यांच्या विनंतीचे उत्तर कसे दिले?

त्याने त्यांना विचारले होते, म्हणून त्यांना राजा दिला.

# देवाचा दाविदाबरोबर करार

## 17:01

शौल इस्त्रायलचा पहिला राजा होता.इस्राएल लोकांना पाहिजे तसाच तो सुंदर व ऊंच होता.इस्त्राएलावर काही वर्षे शौल राजाने चांगले राज्य केले.परंतु नंतर तो एक दुष्ट राजा बनला व त्याने देवाची आज्ञा मानली नाही, म्हणून देवाने त्याच्या जागी राज्य करण्यासाठी दुस-या मनुष्यास नेमले.

### शौल इस्राएलचा पहिला राजा होता, तो एक चांगला किंवा दुष्ट राजा होता का?

शौल प्रथम काही वर्षे चांगला होता, पण नंतर तो दुष्ट झाला.

---

## 17:02

देवाने शौलानंतर दाविद नावाच्या एका इस्त्रायली तरुणांस राजा होण्यास निवडले.दाविद हा बेथलेहेम नगरातील एक मेंढपाळ होता.आपल्या पित्याची मेंढरे चारीत असताना दाविदाने अनेकदा मेंढरांवर हल्ला करणा-या सिंह व अस्वलास जीवे मारिले होते.दाविद हा देवाचे भय बाळगणारा नम्र व धार्मिक पुरुष होता.

### राजा होण्या आधी दावीदाचा उद्योग काय होता?

दावीद हा मेंढ्या चारणारा मेंढपाळ होता.

---

## 17:03

दाविद एक महान योद्धा व पुढारी झाला.दाविद लहान असतानाच त्याने गल्याथ नावाच्या एका राक्षसी मुनष्याबरोबर युद्ध केले.गल्याथ हा एक प्रशिक्षित, बलाढय व तीन मीटर उंचीचा सैनिक होता!परंतू देवाने दाविदाचे सहाय्य केले व त्याच्याकरवी गल्याथाचा वध करुन इस्त्रायल लोकांस सोडविले.त्यानंतर दाविदाने इस्राएलाच्या शत्रूंवर अनेक विजय मिळविले त्यामुळे लोकांनी त्याची प्रशंसा केली.

### दावीदाने गल्याथाचा वध केला त्यात काय आश्चर्यकारक होते?

गल्याथ एक प्रशिक्षित सैनिक होता, फार मजबूत, आणि जवळजवळ तीन मीटर उंच होता!

### इस्राएलाच्या सैन्याने दावीदाची स्तुती का केली?

त्याने इस्राएलाच्या शत्रूंवर अनेक विजय मिळवले होते.

---

## 17:04

लोक दाविदाची प्रशंसा करत असेलेले पाहूल शौलाला त्याचा हेवा वाटू लागला.शौलाने अनेकदा त्यास जीवे मारण्याचा प्रयत्न केला, पण दाविदाने स्वत:स शौलापासून लपविले.एके दिवशी शौल दाविदास मारण्यासाठी शोधीत होता.दाविद लपून बसलेल्या गुहेमध्ये शौल गेला, परंतू शौलाला तो दिसला नाही.दाविद आता शौलाच्या अगदी जवळ होता व तो त्याला मारु शकत होता, पण त्याने तसे केले नाही.त्याऐवजी, दाविदाने शौलाच्या वस्त्राचा काठ कापला व सिद्ध केले की राजा बनण्यासाठी तो शौलाचा वध करणार नाही.

### गुहेत शौलाला ठार करण्याची संधी मिळाली होती तेव्हा दावीदाने काय केले?

त्याने शौलाच्या कपड्याचा एक तुकडा कापला.

---

## 17:05

शेवटी, शौल युद्धात मरण पावला आणि दाविद इस्त्रायलाचा राजा झाला.तो खूप चांगला राजा होता व लोक त्याजवर प्रेम करत.देवाने दाविदास आर्शिवादीत केले व तो यशस्वी झाला.दाविदाने अनेक युद्ध केले व देवाने त्यास इस्त्रायलांच्या शत्रूस पराजित करण्यास सहाय्य केले.दाविदाने यरुशलेम जिंकली व तिला आपली राजधानी बनविली.दाविदाच्या कारकीर्दीत इस्त्रायल सामर्थ्यवान व श्रीमंत राष्ट बनले.

### दावीदाने जिंकून आणि नंतर त्याची राजधानी केले त्या नगराचे नाव काय होते?

यरुशलेम.

---

## 17:06

दाविदाला एक मंदिर बांधावयाचे होतो ज्यामध्ये सर्व इस्राएल लोक देवाची उपासना व अर्पणे करु शकतील.जवळजवळ 400 वर्षे लोक मोशेने बांधलेल्या दर्शन मंडपाच्या समोर देवाची उपासना करत व अर्पणे आणत.

### दावीदाला देवासाठी काय बांधायची इच्छा होती?

दावीदाला सर्व इस्राएली लोकांना उपासना आणि जेथे बळी अर्पण करु शकतील असे मंदिर बांधायचे होते.

---

## 17:07

परंतु देवाने नाथान संदेष्ट्यास दाविदाकडे संदेश घेऊन पाठविले,'' तू लढाईचा माणुस असल्यामुळे हे मंदिर बांधू शकत नाही.''तूझा पुत्र ते मंदिर बांधील.परंतू मी तुला खूप आशीर्वादीत करीन.तुझ्याच वंशातील एक पुरुष माझ्या लोकांवर सर्वकाळ राज्य करील!''सर्वकाळ राज्य करणारा दाविदाच्या वंशातील एकमेव पुरुष म्हणजे मशिहा.''मशिहा हा देवाचा निवडलेला अभिषिक्त जगातील लोकांना त्यांच्या पापांपासून सोडविणारा होता.

### देवाने दावीदाला मंदिर बांधायला परवानगी का दिली नाही?

दावीद योद्धा होता.

### देव मंदिर कोण बांधील म्हणाला?

दावीदाचा पुत्र ते बांधील.

### देवाने दावीदाला कोणते महान वचन दिले?

देवाने दावीदाला वचन दिले की त्याच्या संतानातला एक जण देवाचे लोकांच्या राज्याचा कायमचा राजा होईल.

### ख्रिस्त कोणते महान काम करणार होता?

तो जगातील लोकांना त्यांच्या पापांपासून वाचवणार होता.

---

## 17:08

दाविदाने हे शब्द ऐकल्यावर लगेच देवाचा धन्यवाद केला व त्याची स्तूती केली, कारण देवाने त्याला हा सन्मान व पुष्कळ आशीर्वाद देण्याचे अभिवचन दिले होते.देव हे कधी पूर्ण करील याविषयी दाविदास कल्पना नव्हती.परंतु मशिहा येण्याच्या अगोदर इस्त्रायली लोकांना जवळ जवळ 1000 वर्षे त्याची वाट पाहावी लागली.

---

## 17:09

दाविदाने न्यायाने व विश्वासूपणाने अनेक वर्षे राज्य केले व देवाने त्यास आशीर्वादित केले.तथापी, त्याच्या आयुष्याच्या शेवटी त्याने देवाविरुध्द भयंकर पाप केले.

---

## 17:10

एके दिवशी दाविदाचे सर्व सैन्य युद्धासाठी बाहेर गेले असताना, त्याने आपल्या राजमहालातून एक सुंदर स्त्री स्नान करीत असताना पाहिली.तिचे नाव बथशेबा होते.

### नंतर आपल्या जीवनात दावीदाने कोणते भयंकर पाप केले?

तो उरीयाची पत्नी बथशेबा हिच्या बरोबर झोपला आणि उरीयाची हत्या केली.

---

## 17:11

दुसरीकडे बघण्याऐवजी, दाविदाने त्या स्त्रीस आपणाकडे आणावे म्हणुन कोणालातरी पाठवले.तो तिच्यापाशी निजला व तिला तिच्या घरी पाठवून दिले.काही काळानंतर आपण गरोदर असल्याचा निरोप तिने दाविदास पाठविला.

### नंतर आपल्या जीवनात दावीदाने कोणते भयंकर पाप केले?

तो उरीयाची पत्नी बथशेबा हिच्या बरोबर झोपला आणि उरीयाची हत्या केली.

---

## 17:12

बथशेबाचा पती उरीया हा दाविदाचा शूर योद्धा होता.दाविदाने उरीयास युद्धातून परत बोलावले व आपल्या पत्नी बरोबर राहण्यास सांगितले.परंतु दूसरे सैनिक युद्ध करत असताना आपण घरी जाणे योग्य नव्हे असे समजून त्याने घरी जाण्यास नकार दिला.म्हणून दाविदाने उरीयास परत युद्धामध्ये पाठविले व सेनापतीस सांगितले की त्याने तुंबळ युद्धाच्या ठिकाणी उरीयाची नेमणूक करावी म्हणजे उरीया युद्धात मारला जाईल.

### नंतर आपल्या जीवनात दावीदाने कोणते भयंकर पाप केले?

तो उरीयाची पत्नी बथशेबा हिच्या बरोबर झोपला आणि उरीयाची हत्या केली.

---

## 17:13

उरीया मेल्यानंतर दाविदाने बथशेबाशी लग्न केले.नंतर तिने दाविदाच्या पुत्रास जन्म दिला.दाविदाने केलेल्या कृत्याबद्दल देवाचा क्रोध भडकला, व त्याने नाथान संदेष्टयाला दाविदाकडे पाठवून त्याचे पाप किती दुष्ट होते याविषयी सांगितले.दाविदाने आपल्या

पापाविषयी पश्चाताप केला आणि देवाने त्यास क्षमा केली.नंतर मरेपर्यंत दाविदाने अगदी कठिण प्रसंगी देखिल देवाच्या आज्ञा पाळल्या.

### नाथानाने त्याच्या पापा बद्दल त्याला सगळे सांगितले तेव्हा दावीदाने काय केले?

दावीद आपल्या पापाचा पश्चात्ताप केला, आणि देवाने त्याला क्षमा केली.

---

## 17:14

परंतु पापाची शिक्षा म्हणून दाविदाचा पुत्र मरण पावला.दाविदाच्या उरलेल्या जीवनात त्याच्या कुटुंबात नंतर भांडणे होत राहिली व त्याचे सामर्थ्यही खुप कमी झाले.जरी दाविद देवाशी अविश्वासू राहिला होता तरीही देव आपले वचन पाळण्यासाठी दाविदाशी विश्वासू राहिला.नंतर दाविद व बथशेबा यांना आणखी एक पुत्र झाला, आणि त्यांनी त्याचे नाव शलमोन असे ठेवले.

### देवाने दावीदाला त्याच्या पापाची शिक्षा कशी दिली?

दावीदाच्या मुलगा मरण पावला, दावीदाच्या उरलेल्या आयुष्यात कुटुंबात सतत लढाई होती आणि त्याची शक्ती कमजोर होत गेली.

### देवाने अजूनही दावीद अविश्वासू असूनही दावीदाला दिलेले वचन पाळले का?

होय.

### नंतर दावीद आणि बथशेबा यांच्यापासून जन्मलेल्या मुलाचे नाव काय होते?

शलमोन.

# राज्याची विभागणी

## 18:01

ब-याच वर्षानंतर, दाविद मरण पावला आणि त्याचा पुत्र शलमोन हा इस्त्राएलवर राज्य करु लागला.देवाने शल्मोनास दर्शन दिले व त्यास सर्वात अधिक काय हवे आहे असे विचारले.जेंव्हा शल्मोनाने बुद्धि मागितली तेंव्हा देव त्याच्यावर प्रसन्न झाला व त्याने त्याला जगातील सर्वांत ज्ञानी मनुष्य बनविले.शल्मोन अनेक गोष्टी शिकला व तो एक सुज्ञ न्यायाधीश झाला.देवाने त्यास खूप श्रीमंतही बनविले.

### शलमोनाने देवाला काय मागणे मागितले?

शहाणपणा.

---

## 18:02

आपला बाप दाविद याच्या योजनेप्रमाणे व त्याने जमविलेल्या साधन सामग्रीने शल्मोनाने यरुशलेममध्ये एक मंदिर बांधले.लोक दर्शनमंडपासमोर उपासना न करता आता मंदिरामध्ये देवाची उपासना व अर्पण करु लागले.देव मंदिरात आला व त्याची उपस्थिती त्या मंदिरामध्ये होती, आणि देव आपल्या लोकांमध्ये वस्ती करु लागला.

### शलमोनाने बांधलेल्या मंदिराचा काय उद्देश होता?

हे लोकांना देवाची उपासना करण्यासाठी आणि अर्पणे आणण्याची एक जागा होती.

---

## 18:03

परंतू शल्मोनाने परराष्ट्रीय स्त्रीयांवर प्रेम केले.त्याने अनेक स्त्रीयांशी विवाह करुन देवाची आज्ञा मोडिली. त्याने 1000 स्त्रीयांशी विवाह केला!त्यापैकी अनेक स्त्रीया परराष्ट्रीय होत्या त्यांनी आपली दैवते बरोबर आणिली व त्यांची पूजा करणे चालू ठेवले.शल्मोन वृद्ध झाल्यानंतर त्यानेही त्यांच्या दैवतांची पूजा केली.

### शलमोन कोणते गंभीर पाप केले?

त्यांनी अनेक परकीय स्त्रियांशी विवाह केले आणि त्याच्या वृद्धपणा मध्ये त्यांने त्यांच्या दैवतांची पूजा केली.

---

## 18:04

देव शल्मोनाने केलेल्या कृत्यांविषयी त्याजवर कोपला. त्याच्या हया अविश्वासूपणाबद्दल देवाने त्यास शासन केले. देवाने शल्मोनाच्या मृत्यूनंतर इस्त्रायलाच्या राज्याचे दोन भाग केले.

### देवाने शलमोनाला पापाची शिक्षा कशी दिली?

देवाने शलमोनाच्या मृत्यूनंतर इस्राएल राष्ट्र दोन राज्यात वाटण्याचे वचन दिले.

---

## 18:05

शल्मोनाच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र रहोबाम हा राजा झाला.रहोबाम हा मूर्ख मनुष्य होता.इस्त्रायल राष्ट्रातील सर्व लोक त्याला राजा म्हणून मान्यता देऊन त्याचा राज्याभिषेक करण्यास एकत्र आले.त्यांनी रहोबामाकडे तक्रार केली की, शल्मोनाने त्यांना खूप परिश्रम करण्यास भाग पाडले व जास्त प्रमाणात कर वसूल केला.

---

## 18:06

रहोबामाने मूर्खपणाने उत्तर दिले,‘‘तुम्हांस वाटले असेल की माझा पिता शल्मोन हयाने तुमच्याकडून परिश्रम करुन घेतले, परंतु मी तर त्याहीपेक्षा अधिक परिश्रम तुमच्याकडून करुन घेईन व तुमच्याशी क्रूरतेने वागेन.’’

### रहबामाने लोकांना काय मूर्ख उत्तर दिले?

मी तुमचे काम अजून कठीन करीन आणि मी माझे वडील शलमोन याच्यापेक्षा जास्त शिक्षा करीन.

---

## 18:07

इस्त्राएल राष्ट्राच्या दहा गोत्रांनी एकत्र येऊन रहोबामाविरुद्ध बंड पुकारले.केवळ दोनच गोत्रे त्याच्याशी विश्वासू राहिली.ही दोन गोत्रे मिळून यहूदाचे राज्य झाले.

### रहबाम सोबत राहिले दोन दक्षिण वंश यांच्या राज्याचे नाव काय होते?

यहूदाचे राज्य.

---

## 18:08

इस्राएल राष्ट्राच्या अन्य दहा बंडखोर गोत्रांनी यरुबाम नावाच्या मनुष्यास आपला राजा म्हणून नेमले.त्यांनी उत्तरेच्या भागात आपल्या राज्याची स्थापना केली व त्यांस इस्त्रायलचे राज्य असे संबोधण्यात आले.

### किती वंशानी रहबाम याच्या विरुद्ध बंड केले आणि उत्तर राज्याची स्थापना केली?

दहा वंश इस्राएलच्या राज्यात सामील झाले.

---

## 18:09

यराबामाने देवाविरुध्द बंड पुकारले व लोकांना पापात पाडिले.यहूदाच्या राज्यामध्ये असलेल्या देवाच्या मंदिरात उपासना न करता त्याने आपल्या लोकांसाठी दोन मूर्ति स्थापन केल्या व त्यांची पूजा करु लागल्या.

### यराबामाने आपल्या लोकांना यहूदा मंदिरात देवाची पूजा करण्यासाठी जात ते रोखण्यासाठी काय केले?

त्याने लोकांना उपासना करण्यासाठी दोन मूर्ती तयार केल्या.

---

## 18:10

यहूदाचे राज्य व इस्त्रायलचे राज्य एकमेकांचे शत्रू झाले व त्यांच्यामध्ये नेहमी लढाया होऊ लागल्या.

---

## 18:11

इस्त्रायलाच्या नवीन राज्यामध्ये, सर्वच राजे दुष्ट होते.त्यांपैकी बहुतेक राजांचा वध अन्य इस्त्राएल लोकांनीच केला जे त्यांच्या जागी राज्य करु पाहात होते.

### इस्राएलचे किती राजे देवासोबत विश्वासू होते?

एकही नाही.

---

## 18:12

सर्व राजे व इस्त्रायलाच्या राज्यातील बहुसंख्य प्रजा मूर्तीची पूजा करु लागले.त्यांच्या हया मूर्तिपूजेमध्ये बहुधा व्यभिचार व नरबली (बालकांचे अर्पण) यांचा समावेश होता.

### मूर्तीच्या उपासनेत कोणत्या वाईट गोष्टी समाविष्ट केल्या होत्या?

लैंगिक अनैतिकता आणि बाल यज्ञ.

---

## 18:13

यहूदाचे राजे हे दाविदाच्या वंशातील होते.त्यांपैकी काही राजे चांगले होते. त्यांनी न्यायाने राज्य केले व ख-या देवाची उपासना केली.परंतु यहूदाच्या राजांपैकी अनेक राजे दुष्ट होते. त्यांनी भ्रष्ट होऊन मूर्तिपूजा केली.त्यापैकी काही राजांनी तर स्वत:च्या मुलांचेही अर्पण खोटया देवांसाठी केले.यहूदाच्या राज्यातील बहुसंख्य प्रजेने ही देवाविरुध्द बंड करुन अन्य दैवतांची पूजा केली.

### यहूदाच्या राजांचे पूर्वज कोण होते?

राजा दावीद.

### यहूदाचे कोणते राजे देवाशी विश्वासू होते?

होय, काही विश्वासू होते, पण जास्त करुन वाईट होते.

# संदेष्ट्ये =====

## 19:01

इस्त्रायलाच्या संपूर्ण इतिहासामध्ये, देवाने त्यांच्याकडे संदेष्ट्ये पाठविली.संदेष्ट्ये देवाकडून संदेश ऐकत व तो लोकांपर्यंत पोहचवित असत.

### संदेष्ट्यांना लोकांशी बोलण्यासाठी संदेश कोठे मिळतात?

ते देवाकडून संदेश ऐकतात.

---

## 19:02

जेंव्हा अहाब इस्राएल राज्याचा राजा होता तेंव्हा एलीया हा संदेष्टा होता.अहाब हा एक दुष्ट राजा होता व त्याने लोकांस बालदेवाची उपासना करावयास प्रोत्साहित केले.एलीया अहाबास म्हणला,‘‘जोपर्यंत मी सांगत नाही तोपर्यंत इस्त्रायलमध्ये पाऊस पडणार नाही.’’हे ऐकून अहाबाला खूप राग आला.

### एलीयाने अहाब राजाला काय भविष्यवाणी सांगितली?

"मी असे म्हणे पर्यंत इस्राएलच्या राज्यात पाऊस किंवा दव पडणार नाही."

---

## 19:03

अहाब एलीयास जीवे मारु इचछीत होता म्हणून देवाने एलीयास जंगलातील एका ओहोळाजवळ लपून राहाण्यास सांगितले.प्रत्येक दिवशी सकाळी व संध्याकाळी, पक्ष्यांच्या द्वारे देवाने त्यास भोजन पुरविले.अहाब व त्याचे सैन्य एलीयास शोधत होते, पण त्यांना तो सापडला नाही.दुष्काळ एवढा भयानक होता की शेवटी तो ओहोळही आटला.

### तो लपला होता तेथे देवाने वाळवंटात एलीया कशी मदत केली?

देव दररोज सकाळ संध्याकाळी पक्षा बरोबर भाकरी व मांस पाठवित असे.

---

## 19:04

म्हणून एलीया शेजारच्या देशामध्ये गेला.त्या देशात राहणारी एक विधवा व तिचा मुलगा यांच्याकडे असणारी अन्नसामग्री दुष्काळामुळे संपत आली होती.परंतु त्यांनी एलीयाची काळजी घेतली, म्हणून देवाने त्यांच्या गरजा पूर्ण केल्या व त्यांच्या डब्यातले पीठ व कुप्पीतील तेल कधीच संपले नाही.संपूर्ण दुष्काळ संपेपर्यंत त्यांच्याकडे अन्न उपलब्ध होते.एलीया त्या ठिकाणी पुष्कळ वर्षे राहिला.

### विधवा व तिच्या मुलासोबत एलीयाल देवाने कशी मदत केली?

देवाने त्यांच्या डब्यातील पीठ आणि बाटलीतले तेल कधीही संपू दिले नाही.

---

## 19:05

साडेतीन वर्षानंतर देवाने एलीयास इस्त्रायलच्या राज्यात जाऊन देव आता पाऊस पाठविणार आहे याची अहाब राजासमोर घोषणा करावयास सांगितली.जेव्हा अहाबाने एलियास पाहिले तेंव्हा तो म्हणाला,‘‘ तूच तो छळणारा ना!” एलियाने त्यास उत्तर दिले,‘‘तूच छळणारा आहेस !तू आपला खरा देव याव्हे यास सोडून बालदेवतेची पूजा केली आहेस.इस्त्रायल राज्याच्या सर्व लोकांना कर्मेल डोंगरावर घेऊन ये.’’

### एलीयाने अहाबाची कोणती भयंकर दुष्टता सांगितली?

अहाबाने यहोवा, खरा देव सोडून, बाल देवाची पूजा केली.

---

## 19:06

तेंव्हा इस्त्रायलाच्या राज्यातील सर्व लोक, बालदेवतेच्या 450 संदेष्टयांसहित कर्मेल डोंगराकडे आले.एलीया लोकांस म्हणाला,‘‘तुम्ही किती वेळ आपले मन बदलत राहणार ?जर याव्हे हा खरा देव असेल तर त्याचीच सेवा करा!जर बाल देव असेल, तर त्याची सेवा करा!”

### लोकांसमोर एलीयाने कोणती निवड ठेवली?

जर यहोवा हाच देव आहे, तर त्याची सेवा, पण जर बाल खरा देव असेल तर त्याची सेवा करा.

---

### 19:07

मग एलीया बालदेवतांच्या संदेष्टयांस म्हणाला,‘‘एक बैल मारा व अर्पण तयार करा, पण त्यास आग लावू नका.मीही तसेच करीन.जो देव अग्निच्या द्वारे उत्तर देईल तोच खरा देव.’’अशा प्रकारे बालदेवतेच्या याजकांनी होमार्पण तयार केले पण त्यास आग लावली नाही.

---

### 19:08

मग बालदेवतेचे संदेष्टये प्रार्थना करु लागले,‘‘बालदेवता, आमचे ऐका!’’ते दिवसभर प्रार्थना करत व ओरडत होते, त्यांनी स्वत:ला चाकूने कापलेही तरीही त्यांना उत्तर मिळाले नाही.

---

### 19:09

शेवटी संध्याकाळच्या वेळी एलियाने देवासाठी होमार्पण तयार केले.मग त्याने लोकांस बारा घागरी(पाणी भरण्याचे मोठे भांडे) पाणी त्या होमबलीवर व इंधनावर ओतण्यास सांगितले. इतके की होमबली व इंधन व वेदी भोवतालची जमीन सुद्धा पूर्णपणे भिजली.

---

### 19:10

मग एलीयाने प्रार्थना केली,‘‘हे परमेश्वरा, अब्राहाम, इसहाक व याकोब यांच्या देवा, इस्त्रायलामध्ये तूच देव आहेस व मी तुझा सेवक आहे हे सर्वांस दाखव.मला उत्तर दे म्हणजे तूच खरा देव आहेस अशी या लोकांना खात्री पटेल.”

---

### 19:11

तेंव्हा परमेश्वरापासून अग्नि उतरला आणि त्याने होमबली, इंधने, धोंडे आणि माती आणि त्या खळग्यातले पाणी सुद्धा भस्म करुन टाकले.हे पाहून सर्व लोक पालथे पडून म्हणाले, परमेश्वर (याव्हे) हाच देव !परमेश्वर हाच देव!’’

#### तो खरा देव होता हे देवाने कसे दाखवले?

देवाने आकाशातून अग्नि पाठविला आणि मांस, लाकूड, खडक, माती, आणि वेदी सभोवतालचे सगळे पाणी जाळले.

### लोकांनी या शक्तीचे प्रात्यक्षिक पाहिल्या वर कसा प्रतिसाद दिला?

ते जमिनीवर पडले आणि म्हणाले, "यहोवा हाच देव आहे! यहोवा हाच देव आहे! "

---

## 19:12

तेंव्हा एलीया त्यांस म्हणाला,‘‘बआलाच्या संदेष्टयांस पकडा; त्यातल्या एकासही निसटून जाऊ देऊ नका !’’तेंव्हा त्यांनी त्यांस पकडिले; आणि त्यास दूर नेऊन त्यांस जीवे मारिले.

### बालच्या संदेष्ट्यांचे काय झाले?

त्याना तेथून दूर नेले आणि मारुन टाकले.

---

## 19:13

मग एलीया अहाब राजास म्हणाला,‘‘लवकर नगरास जा कारण पाऊस येत आहे.’’लगेच आकाशामध्ये काळे ढग जमा होऊन मुसळधार पाऊस पडू लागला.याव्हे देवाने अशाप्रकारे दुष्काळ संपवला आणि आपणच खरा देव आहे हे सिद्ध केले.

---

## 19:14

एलीया नंतर देवाने अलीशा नावाच्या मनुष्यास आपला संदेष्टा म्हणुन नेमले.देवाने अलीशाद्वारे अनेक चमत्कार केले.एक चमत्कार शत्रुचा सेनापती नामान, याच्यासाठी झाला, त्याला एक भयंकर चर्मरोग होता.त्याने अलीशाविषयी ऐकले होते म्हणून तो त्याच्याकडे गेला व आपणास बरे करा अशी विनंती केली.अलीशाने नामानास यार्देन नदीमध्ये सात वेळा डुबकी मारण्यास सांगितले.

### आपला त्वचा रोग बरा करण्यासाठी अलीशाने नामानाला काय करणयास सांगितले?

यार्देन नदीत सात वेळा बुडी मार.

---

## 19:15

सुरुवातीस नामानास राग आला व असे करण्यास तो तयार झाला नाही, कारण ते त्याला मूर्खपणाचे वाटले.परंतु नंतर त्याने आपले मन बदलले व त्याने यार्देन नदीमध्ये जाऊन सात वेळा डुबकी मारली.जेंव्हा सातव्या वेळी त्याने डुबकी मारली तेंव्हा त्याचे कोड पूर्णपणे बरे झाले!देवाने त्याला बरे केले होते.

### अलीशाची सूचना ऐकल्या नंतर नामानाने काय केले?

प्रथम तो रागावला होता आणि तसे करायचे नाही ठरविले कारण ते त्याला मूर्खपणाचे वाटले, पण नंतर त्याने त्याचे मन बदलले, आणि तसे केले आणि पूर्णपणे बरा झाला.

---

## 19:16

देवाने अन्य संदेष्टयेही पाठविले.त्या सर्वांनी लोकांना मूर्तीपूजा बंद करा आणि दुस-यांना न्याय व दया दाखवा असे सांगितले.संदेष्टयांनी त्यांना इशारा दिला की जर त्यांनी आपला वाईट मार्ग सोडून देवाच्या आज्ञा पाळल्या नाहीत तर देव त्यांना दोषी ठरवून त्यांना शिक्षा करील.

### संदेष्ट्याचा लोकांना सामान्य संदेश काय होता?

मूर्ती पूजा थांबवा आणि इतरांना न्याय आणि दया दाखवा; अन्यथा, देव तुम्हाला शिक्षा करीन.

---

## 19:17

पुष्कळ वेळा लोकांनी देवाच्या आज्ञा पाळल्या नाहीत.त्यांनी वारंवार संदेष्टयांचा अपमान केला व कधी कधी त्यांस जीवे मारिले.एकदा त्यांनी यिर्मया संदेष्टयास मरण्यानाठी कोरड्या विहिरीमध्ये ढकलून दिले.विहिरीच्या तळाशी असलेल्या गाळामध्ये तो रुतला, परंतु नंतर राजाला त्याची दया आली व तो मरण्यापुर्वी त्याला बाहेर काढण्याची त्याने त्याच्या सेवकांना आज्ञा दिली.

### साधारणतया, लोक संदेष्ट्यांला कसे वागवत?

लोक संदेष्ट्यांना त्रास देत असत आणि कधी कधी अगदी जिवे मारत.

### लोकांनी संदेष्टा यिर्मयाला कसे वागवले?

लोकांनी यिर्मयाला कोरड्या विहिरीत टाकले आणि त्यास तेथे मरण्यास सोडले.

### यिर्मया तेथे मरण पावला का?

नाही. राजाने त्याच्यावर करुणा केली व त्याच्या सेवकांनी यिर्मयाला बाहेर काढले.

---

## 19:18

जरी लोक त्यांचा द्वेष करत होते, तरी संदेष्टे देवासाठी बोलत राहिले. त्यांनी लोकांस सावधानतेचा इशारा दिला की जर त्यांनी पश्चाताप केला नाही तर देव त्यांचा नाश करील.देवाच्या अभिवचना प्रमाने मशीहा (ख्रिस्त) येणार आहे याचीही त्यांनी लोकांना आठवण करुन दिली.

### संदेष्टे लोकांना आठवण करून देत की देवाने विशेष व्यक्ती पाठवून द्यावी, ती व्यक्ती कोण होती?

देवाने पाठवून द्यावी, ती व्यक्ती मसिहा होती.

# पाडाव आणि सुटका

## 20:01

इस्त्रायलाचे राज्य व यहूदाचे राज्य या दोहोंनीही देवाविरुध्द पाप केले.देवाने त्यांच्याशी सिनाय पर्वतावर केलेला करार त्यांनी तोडला.देवाने त्यांनी पश्चाताप करावा व देवाकडे वळावे म्हणून भविष्यवक्ते पाठविले, परंतु त्यांनी आज्ञा मानण्याचे त्यांनी नाकारले.

### संदेष्ट्यांनी लोकांना कोणत्या गोष्टी विषयी चेतावणी दिली होती?

संदेष्ट्यांनी त्यांना सांगितले पश्चात्ताप करा आणि देवाची उपासना करा.

### लोकांनी संदेष्ट्यांच्या संदेशाला कसे उत्तर दिले?

त्या नियमांचे पालन करण्यास नकार दिला.

---

## 20:02

म्हणून देवाने त्या दोन्ही राज्यांना शिक्षा दिली, त्यांच्या शत्रूंना त्यांचा नाश करु दिला.अश्शूर हया दुष्ट व शक्तिशाली राष्ट्राने इस्त्रायलाचा नाश केला.अश्शूरी लोकांनी इस्त्रायलाच्या अनेक लोकांस जीवे मारिले, मौल्यवान वस्तूंची लूटालूट केली व देशाचा बराच भाग जाळून टाकला.

### कोणत्या शत्रूने इस्राएलचे राज्य नष्ट केले?

अश्शूरचे साम्राज्य.

---

## 20:03

अश्शूरी लोकांनी सर्व नेत्यांस, श्रीमंतांस व कुशल कारागिरांस एकत्र करुन आपल्या देशामध्ये नेले.केवळ फार गरीब इस्त्रायल लोक जे युद्धमध्ये मारले गेले नाहीत, तेच इस्त्रायलमध्ये शिल्लक राहिले.

---

## 20:04

तेंव्हा अश्शूराने इस्त्रायल राहत असलेल्या ठिकाणी परराष्ट्रीय लोकांस वस्ती करण्यासाठी आणिले.परराष्ट्रीयांनी नाश झालेल्या शहरांची पुनर्बांधणी केली व इस्त्रायली स्त्रीयांशी विवाह केला इस्त्रायली वंशातील ज्या लोकांनी परराष्ट्रीयांशी विवाह केला त्यांना शोमरोनी म्हणण्यात आले.

### शोमरोनी कोण होते?

इस्राएली वंशज ज्यांनी अश्शूरच्या देशातील परदेशी लग्न केले.

---

## 20:05

यहूदा राज्यातील लोकांनी पाहिले की, इस्त्रायल राज्यातील लोकांना अविश्वास व आज्ञा मोडल्यामुळे देवाने कशाप्रकारे शासन केले आहे.पण तरीही त्यांनी मूर्तिपूजा केली व कनानी दैवतांचीही उपासना केली.देवाने इशारा देण्यासाठी त्यांच्याकडे संदेष्टये पाठविले, पण त्यांनी त्यांचे ऐकले नाही.

### इस्राएल राज्यातील लोकांना शिक्षा झालेली पाहिली, तेव्हा यहूदा राज्यातील लोकांनी देवाच्या आज्ञेचे पालन केले होते का?

नाही, ते मूर्तीची पूजा करत राहिले.

---

## 20:06

सुमारे 100 वर्षांनंतर जेंव्हा अश्शूराने इस्त्रायल राज्याचा नाश केला, तेंव्हा देवाने यहूदाच्या राज्यावर हल्ला करण्यासाठी नबूखद्नेस्सर हया बाबेलच्या राजास पाठविले.बाबेल हे एक शक्तिशाली राष्ट्र होते.यहूदाचा राजा नबुखद्नेस्सराचा सेवक बनण्यास तयार झाला व प्रतिवर्षी मोठया प्रमाणात पैसे देण्यासही तयार झाला.

### यहूदाचा राजा कोणाची सेवा करण्यास सहमत होता?

बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर.

---

## 20:07

परंतु काही वर्षांनंतर यहूदाच्या राजाने बाबेल विरुध्द बंड पुकारले.म्हणून बाबेलच्या लोकांनी परत येऊन यहूदाच्या राज्यावर चढाई केली.त्यांनी यरुशलेम शहर ताब्यात घेतले, मंदिराचा नाश केला व शहरातील व मंदिरातील सर्व संपती घेऊन गेले.

---

## 20:08

यहूदाच्या राजाच्या हया बंडखोरपणाबद्दल शासन म्हणून नबुखद्नेस्सरच्या सैनिकांनी यहूदाच्या राजाच्या मुलांचा त्याच्या समोर वध केला व यहूदाच्या राजाचे डोळे फोडून त्यास आंधळे केले.त्यानंतर त्यांनी त्यास मरण्यासाठी बाबेल येथील तुरुंगात ठेवले.

### यहूदाचा राजाने बंड केले तेव्हा, काय नबुखद्नेस्सर सैनिकांनी त्याला काय केले?

ते त्याच्या समोर राजाचे मुलगे ठार मारले, त्याला आंधळे केले आणि त्याला बाबेलच्या बंदिवासात मरण पावण्यास घेऊन गेले.

---

## 20:09

नबुखद्नेस्सर व त्याच्या सैनिकांनी यहूदाच्या राज्यातील जवळ जवळ सर्वच लोकांना बाबेलमध्ये आणले केवळ फार गरीब इस्त्रायल लोकांनाच शेती करण्यासाठी मागे ठेवले.हयाच कालावधित जेंव्हा देवाच्या लोकांस वचनदत्त देश सोडून जाण्यास सक्ति करण्यात आली, त्यास पाडाव- हद्दपारी असे म्हणतात.

### आम्ही त्या वेळेला काय म्हणतो जेव्हा देवाच्या लोकांना जबरदस्तीने वचन दिलेला देश सोडण्यास भाग पडत?

हद्दपार.

---

## 20:10

जरी देवाने आपल्या लोकांचा त्यांच्या पापांमुळे त्यांचा पाडाव होऊ दिला तरीही तो त्यांना व त्याने दिलेले वचन विसरला नाही.देवाची आपल्या लोकांवर कृपादृष्टी होती व संदेष्टयांच्या द्वारे तो त्यांच्याशी बोलत असे.त्याने त्यांना आश्वासन दिले की, सत्तर वर्षांनंतर तो त्यांना परत वचनदत्त देशात घेऊन येईल.

### हद्दपारी दरम्यान देवाने लोकांना काय आश्वासन दिले?

सत्तर वर्षा नंतर वचन दिलेल्या देशात तुम्ही परत जाल, असे देवाने आश्वासन दिले.

---

## 20:11

त्यानंतर सुमारे सत्तर वर्षांनी पारसाचा राजा कोरेश हयाने बाबेलचा पराभव केला व बाबेलच्या राज्याच्या जागी पारसाचे राज्य आले.इस्त्रायली लोक आता यहूदी या नावाने ओळखले जाऊ लागले व त्यांच्यापैकी पुष्कळ लोक आपल्या आयुष्यभर बाबेलमध्येच राहिले.केवळ थोडयाशा वयोवृध्द यहूद्यांनाच यहूदी राज्याचे स्मरण होते.

### बाबेलच्या राजाचा पराभव कोणी केला होता?

पर्शियन साम्राज्य राजा कोरेश.

---

## 20:12

पारसाचे साम्राज्य शक्तिशाली होते, परंतु आपण पराभूत केलेल्या लोकांविषयी ते दयाळू होते.कोरेश पारसाचा राजा झाल्यानंतर लगेच त्याने फर्मान काढले की जर कोणी यहूदी यहूदामध्ये परत जाऊ इछितो तर त्याला तसे करण्याची परवानगी आहे.त्याने त्यांना मंदिराचे पुन्हा बांधकाम करण्यासाठी पैसाही पुरविला.अशा प्रकारे सत्तर वर्षाचा हद्दपारी संपवून यहूद्यांचा छोटा समूह यहूदातील यरुशलेमेस परतला.

### राजा कोरेश याने यहूदीयांना काय आज्ञा दिली?

कोणत्याही यहूदीयाला यहूदात परत जायचे असेत तर जाऊ शकतात.

---

## 20:13

यरुशलेमेस आल्यानंतर त्यांनी मंदिराचे पुनर्वसन केले व शहराच्या वेशी पुन्हा बांधल्या.जरी अद्याप त्यांच्यावर अन्य लोकांचे वर्चस्व होते, तरी आता पुन्हा एकदा वचनदत्त देशामध्ये ते राहू लागले व मंदिरामध्ये देवाची उपासना करु लागले.

### ते जेव्हा यरुशलेमेला परत आले तेव्हा यहूदीयांनी काय केले?

त्यांनी मंदिर आणि शहराच्या तटबंदी पुन्हा बांधल्या.

# देव मसिहा पाठवण्याचे अभिवचन देतो

## 21:01

आरंभापासूनच, देवाने मसिहाला पाठविण्याची योजना बनविली होती.मसिहा संबंधीचे अभिवचन सर्वप्रथम आदाम व हव्वा यांच्याकडे आले.देवाने वचन दिले की हव्वेला जे संतान होईल ते सापाचे डोके फोडील.ज्या सापाने हव्वेस फसविले तो सैतान होता.हया अभिवचनाचा अर्थ असा होता की मसिहा सैतानास पुर्णपणे पराजित करील.

### देवाने मशीहा पाठवण्याचे प्रथम केव्हा ठरवले होते?

अगदी सुरुवातीला.

### मशीहा सैतानाला काय करणार होता?

मशीहा सैतानाचा पुर्णपणे पराभव करणार होता.

---

## 21:02

देवाने अब्राहामास असे वचन दिले की त्याच्या द्वारे जगातील सर्व कुळे आशिर्वादीत होतील.पुढे भविष्यात मसिहा आल्यानंतर हया अभिवचनाची पुर्तता होणार होती.तो प्रत्येक राष्ट्रातील प्रत्येक गटाच्या लोकांचे तारण होणे शक्य करील.

### अब्राहामाद्वारे सर्व राष्ट्रांचे लोक आशीर्वादीत होतील ह्या देवाच्या वचनाची पुर्णता कोण करणार होते?

मशीहा.

---

## 21:03

देवाने मोशेस वचन दिले होते की भविष्यामध्ये तो मोशेसारखाच एक संदेष्टा तयार करील.हे मसिहाविषयीचे दुसरे अभिवचन होते. जे काही काळानंतर पूर्ण होणार होते.

### मशीहा कोणत्या प्रकारे मोशेसारखा होता?

मशीहा मोशेसारखा संदेष्टा होता.

---

## 21:04

देवाने दाविद राजास अभिवचन दिले की त्याच्याच वंशातील एक जण देवाच्या लोकांवर सर्वकाळ राज्य करील.त्याचा अर्थ असा होता की मसिहा हा दाविदाच्याच घराण्यात जन्मास येणार होता.

### मशीहाचा दावीद राजाशी कसा संबंध होता?

मशीहा दाविदाचा वंशजापैकी एक होता.

---

## 21:05

यिर्मया संदेष्टयाच्या द्वारे, देवाने वचन दिले की तो एक नवा करार करणार आहे, परंतु तो सिनाय पर्वतावर इस्राएलांबरोबर केलेल्या करारासारखा नसेल.नव्या करारामध्ये देव आपल्या आज्ञा मनुष्यांच्या हृदयावर लिहिल, लोक देवाला वैयक्तीकरित्या ओळखतील,ते त्याचे लोक होतील आणि देव त्यांच्या अपराधांची क्षमा करील.मसिहा या नव्या कराराचा आरंभ करील.

---

## 21:06

देवाच्या संदेष्टयांनीही सांगितले होते की मसिहा हा एक संदेष्टा, याजक, आणि राजा असेल.संदेष्टा हा एक असा माणूस असतो की जो देवाचा संदेश ऐकून तो लोकांना सांगतो.देवाने अभिवचन दिलेला मसिहा हा एक परिपूर्ण संदेष्टा असेल.

---

## 21:07

इस्राएली याजक लोकांनी केलेल्या पापाच्या शिक्षेचे प्रायश्चित म्हणून देवाला होमार्पणे करत असत.याजक लोकांसाठी देवाला प्रार्थनाही करत असत.मसिहा हा एक परिपूर्ण महायाजक असणार होता जो देवाला स्वत:चे परिपूर्ण बलिदान करणार होता.

### मशीहा परिपुर्ण याजक कसा होणार होता?

मशीहा लोकांसाठी स्वत:चे निर्दोष परिपुर्ण असे बलिदान देवाला देणार होता.

---

## 21:08

राजा म्हणजे जो लोकांवर राज्य करतो व त्यांचा न्याय करतो.आपला पूर्वज दाविद याच्या सिंहासनावर बसणारा मसिहा हा एक परिपूर्ण राजा असेल.तो संपूर्ण जगावर सर्वकाळ राज्य करील, आणि प्रामाणिकपणे न्याय करील व योग्य निर्णय घेईल.

### मशीहा एक परिपुर्ण राजा कसा असणार होता?

तो सर्व जगावर सदासर्वकाळ राज्य करणार आहे,व नेहमी प्रामाणिकपणे न्याय करील.

---

## 21:09

देवाच्या भविष्यवाद्यांनी मसिहाविषयी पुष्कळ इतर गोष्टी अगोदरच सांगून ठेवल्या होत्या. मलाखी संदेष्टयाने भविष्य केले होते की मसिहा येण्याच्या अगोदर एक महान संदेष्टा येईल.यशया संदेष्टयाने भविष्यवाणी केली की मसिहा हा एका कुमारीच्या पोटी जन्म घेईल.मीखा संदेष्टयाने सांगितले की मसिहा बेथलेहेम नगरामध्ये जन्मास येईल.

### यशायाने मशीहाच्या जन्माविषयी कोणती विशेष गोष्ट सांगितली होती ?

मशीहा एका कुमारीच्या पोटी जन्म घेईल.

---

## 21:10

यशया संदेष्टा म्हणाला की मसिहा गालिलमध्ये राहील, निराशामध्ये असलेल्या लोकांचे सांत्वन करील, आणि बंदिवानांना सोडवून स्वातंत्र्याची घोषणा करील.त्याने हेही सांगितले की मसिहा आजारी आंधळया, मुक्या, बहि-यांस व लंगडयांस बरे करील.

---

## 21:11

यशया संदेष्टयाने हेही भाकित केले की मसिहाचा विनाकारण द्वेश केला जाईल व त्याला नाकारले जाईल.इतर संदेष्टयांनी अगोदरच सांगून ठेवले की मसिहास मारणारे लोक त्याचे कपडे वाटून घेण्यासाठी चिठ्टया टाकतील आणि मसिहाचा एक मित्रच त्याचा विश्वासघात करिल.जख-या संदेष्टयाने अगोदरच सांगून ठेवले होते की मसिहाचा विश्वासघात करण्यासाठी त्याच्या मित्रास वेतन म्हणून चांदीची तीस नाणी दिली जातील.

---

## 21:12

संदेष्टयांनी मसिहा कशा प्रकारे मरेल याचेही भविष्य केले होते.यशयाने भविष्य केले होते की लोक मसिहावर थुंकतील, त्याची थट्टा करतील व त्यास फटके मारतील.जरी त्याने काहीही वाईट केले नव्हते, तरी त्यास खिळे ठोकून भयंकर वेदनेचे पीडादायक मरण देतील.

### संदेष्टयांनी सांगितल्याप्रमाणे,मशीहा कसा मरणार होता?

मशीहाचे हालहाल करतील त्याच्या हातापायात खिळे ठोकतील,व त्याला फार दु:ख सहन करावे लागेल.

---

## 21:13

संदेष्टयांनी हेही सांगितले की मसिहा परिपूर्ण व निष्पाप असेल.तो सर्व लोकांच्या पापाचे प्रायश्चित्त म्हणून मरेल.त्याला मिळालेली शिक्षा मुनष्य आणि परमेश्वर यांमध्ये समेट घडवून आणिल.हया कारणास्तव, मसिहास ठेचावे ही देवाची इच्छा होती.

### मशीहाला चेचावे अशी देवाची इच्छा का होती?

मशीहा,परिपुर्ण असल्यामुळे,सर्व लोकांच्या पापांची शिक्षा स्वतः घेणार होता आणि देव व मनुष्य यांच्यात समेट घडवून आणणार होता.

---

## 21:14

संदेष्टयांनी भविष्य केले होते की मसिहा मरेल आणि देव त्याला पुन्हा जीवंतसुद्धा करील.मसिहाच्या मृत्यू आणि पुनरुत्थानाद्वारे देव आपली योजना पूर्ण करील, पाप्यांचे तारण करुन एक नवा करार प्रस्थापित करील.

### मशीहाच्या(ख्रिस्ताच्या) मरणाद्वारे व पुन्हा उठण्याद्वारे देव काय करु इच्छीत होता?

देव पाप्यांना तारणार होता व नवा करार सुरु करणार होता.

---

## 21:15

देवाने संदेष्टयांना मसिहाविषयी अनेक गोष्टी प्रकट केल्या, परंतु त्या संदेष्टयांपैकी कोणाच्याही काळामध्ये मसिहा आला नाही.शेवटच्या भविष्यवाणीनंतर सुमारे 400 वर्षांनी अगदी योग्य वेळ आल्यानंतर देवाने मसिहास या जगामध्ये पाठविले.

### मशीहाविषयीची शेवटची भविष्यवाणी व त्याचे जगात येणे या दोन्ही गोष्टींमध्ये किती काळ गेला?

400 पेक्षा जास्त वर्षे.

# योहानाचा जन्म

## 22:01

पूर्वीच्या काळी, देव आपल्या लोकांशी देवदूत व संदेष्टयांद्वारे बोलला.परंतु त्यानंतर 400 वर्षे तो लोकांशी बोलला नाही.अचानक एके दिवशी जख-या नावाच्या एका वयोवृध्द याजकाकडे एक देवदूत एक संदेश घेऊन आला.जख-या व त्याची पत्नी, अलीशिबा, हे धार्मिक लोक होते, पण त्यांना मुलबाळ नव्हते.

### देव मनुष्याशी किती वर्षापुर्वी बोलला होता?

४०० वर्षापुर्वी.

### अलीशिबा जखऱ्याची बायको, हिची कोणती समस्या होती?

तिला मुलबाळ नव्हते.

---

## 22:02

देवदूत जख-यास म्हणाला,‘‘तुझ्या पत्नीस मुलगा होणार आहे.’’त्याचे नाव तुम्ही योहान असे ठेवा.तो पवित्र आत्म्याने परिपूर्ण होऊन, मसिहाच्या आगमनासाठी लोकांची तयारी करील !’’जख-याने उत्तर दिले,‘‘मी आणि माझी पत्नी आता खूप म्हातारे झालो आहोत आणि आता आम्हास मुले होऊ शकत नाहीत!हे घडेल हे कशावरुन मी समजू?’’

### देवदूताने जखऱ्याला त्याच्या मुलाचे काय नाव ठेवायला सांगितले?

देवदुताने जखऱ्याला त्याच्या मुलाचे नाव योहान असे ठेवायला सांगितले.

### देवदूताने योहान त्याच्या जीवनात काय करील असे सांगितले होते?

योहान लोकांना मशीहासाठी तयार करील.

### अलीशिबेला मुलगा होईल असा विश्वास जखऱ्याला का वाटला नाही?

कारण ते दोघेही फार म्हातारे झाले होते.

---

## 22:03

देवदूत जख-यास म्हणाला,‘‘तुला ही सुवार्ता सांगण्यासाठी देवाने मला पाठविले आहे.तू माझ्या वचनावर विश्वास ठेविला नाही, म्हणून बाळाचा जन्म होईपर्यंत तुला बोलता येणार नाही.लगेच, जख-या मुका झाला.तेंव्हा देवदूत जख-यास सोडून गेला.त्यानंतर जख-या घरी आला आणि त्याची पत्नी गर्भवती झाली.

### जखऱ्याने विश्वास न ठेवल्यामुळे देवदूताने त्याला कशी शिक्षा केली?

योहानाच्या जन्मापर्यंत जखऱ्या मुका झाला.

---

## 22:04

जेव्हा अलीशिबा ही सहा महिन्यांची गरोदर होती, तेंव्हा तोच देवदूत अलिशिबाच्या नात्यातील मरीयेस अचानक प्रकट झाला.ती कुमारी होती व योसेफ नावाच्या मनुष्याबरोबर तीचे वाग्दान झाले होते.देवदूत म्हणाला,‘‘तू गर्भवती होऊन तूला पुत्र होईल.तू त्याचे नाव येशू ठेव.तो परात्पर परमेश्वराचा पुत्र असून सर्वकाळ राज्य करिल.’’

### देवदूताने मरीयेला दर्शन दिले तेव्हा अलीशिबेला कितवा महिना होता?

सहावा महिना.

### मरीयेला काय होणार होते म्हणून देवदूताने सांगितले?

ती गरोदर होईल व मुलाला जन्म देईल.

### येशू कोण होईल असे देवदूताने सांगितले?

येशू थोर होईल व परात्पराचा पुत्र म्हटला जाईल.

---

## 22:05

मरीयाने उत्तर दिले,‘‘हे कसे होणार, मी तर कुमारी आहे?’’देवदूताने स्पष्ट केले,‘‘पवित्र आत्मा तुझ्यावर येईल, आणि देवाचे सामर्थ्य तुझ्यावर छाया करील.यास्तव ते बाळ पवित्र, देवाचा पुत्र असेल.’’देवदूताने सांगितलेल्या गोष्टीवर मरीयेने विश्वास ठेविला.

### येशूचा जन्म हा चमत्कार का आहे?

कारण मरीया कुमारी असून तीने येशूला जन्म दिला.

### येशू कोणाचा पुत्र आहे?

येशू देवाचा पुत्र आहे.

---

## 22:06

देवदूताच्या भेटीनंतर लगेच मरीया अलीशिबा हीस भेटण्यास गेली.मरीयेचे हे अभिवादन ऐकताच अलीशिबेच्या उदरातील बाळाने आनंदाने उडी मारली.देवाने त्यांच्यासाठी जे काही केले होते त्याविषयी दोन्ही स्त्रियांनी एकत्र आनंद केला.अलीशिबेस भेटून तीन महिन्यानंतर मरीया आपल्या घरी परतली.

### देवदूत निघून गेल्यानंतर मरीया कोणाला भेटावयास गेली?

ती अलीशिबेला भेटावयास गेली.

---

## 22:07

अलीशिबेने आपल्या पुत्रास जन्म दिल्यानंतर, देवदूताने सांगितल्याप्रमाणे जख-या व अलीशिबेने त्याचे नाव योहान असे ठेविले.तेंव्हा देवाने जख-यास पुन्हा बोलण्याची अनुमति दिली.जख-या म्हणला,‘‘परमेश्वराची स्तुती असो, कारण त्याने आपल्या लोकांचे स्मरण ठेविले आहे!तु, माझ्या पुत्रा, तु परात्पर देवाचा एक महान संदेष्टा होशिल जो आपल्या लोकांना त्यांच्या पापांची क्षमा कशी होईल हे सांगेल!’’

### जखऱ्या योहानाविषयी काय म्हणाला?

योहान हा परात्पराचा संदेष्टा होईल व त्यांच्या पापांची क्षमा कशी मिळेल हे तो लोकांना सांगेल.

# येशूचा जन्म

## 23:01

मरीयेचे वाग्दान योसेफ नावाच्या एका धार्मीक पुरुषाबरोबर झाले होते.मरीया गरोदर असल्याचे ऐकून त्याला कळले की, हे बाळ त्याचे नव्हे.तो धार्मीक पुरुष असल्यामुळे मरीयेची बेअब्रु होऊ नये म्हणून त्याने गुप्तपणे तिला सोडण्याची योजना केली.त्याने असे करण्यापूर्वी, एक देवदूत त्याच्या स्वप्नामध्ये आला व त्याच्याशी बोलला.

### योसेफ हा कशा प्रकारचा मनुष्य होता?

तो नीतिमान मनुष्य होता.

### मरीया गरोदर असल्यामुळे तिच्याविषयी काय करायची त्याची योजना होती?

तिला गुप्तपणे घटस्फोट देण्याची त्याची इच्छा होती.

---

## 23:02

देवदूत म्हणाला,‘‘योसेफा, मरीयेस तू आपली पत्नी म्हणून स्विकारण्यास भिऊ नकोस.तिच्या उदरामध्ये असणारे बाळ हे पवित्र आत्म्यापासून आहे.ती एका मुलास जन्म देईल.व त्याचे नाव येशू (अर्थात, ‘देव तारितो’) असे ठेव, कारण तो लोकांना त्यांच्या पापांपासून सोडविल.’’

### त्याऐवजी असे काय झाले की त्याचे मन बदलले व तो मरीयेशी लग्नास तयार झाला.

देवदूत त्याच्या स्वप्नात आला आणि म्हणाला, “तू मरीयेला आपली पत्नी म्हणून स्वीकार करण्यास भिऊ नकोस.”

### “येशू” या नावाचा अर्थ काय आहे?

याचा अर्थ, “यहोवा तारतो.”

---

## 23:03

तेंव्हा योसेफाने मरीयेशी विवाह केला व आपली पत्नी म्हणून तिचा स्विकार केला, परंतु त्या बाळाचा जन्म होईपर्यंत तो तिच्यापाशी निजला नाही.

---

## 23:04

जेंव्हा बाळाचा जन्म होण्याचा समय जवळ आला, तेंव्हा रोमी सरकारने जनगणना करण्यासाठी आपापल्या गावी जाण्यास सांगितले.योसेफ आणि मरीया यांना नासरेथहून बेथलेहेम असा लांबचा प्रवास करावा लागला, कारण त्यांचा पूर्वज दाविद हा बेथलेहेम गावाचा होता.

### योसेफ व मरीयेने बेथलेहेमचा इतक्या लांबचा प्रवास का केला?

कारण रोमी सरकारने प्रत्येकाला आज्ञा केली की त्यांचे पूर्वज राहात असत त्या ठिकाणी जाऊन त्यांनी नावनिशी लिहून द्यावी.

---

## 23:05

बेथलेहेम येथे पोहोचल्यावर, त्यांना राहायला जागा मिळाली नाही.फक्त गुरांच्या गोठयामध्ये जागा होती ती त्यांना मिळाली.बाळाचा जन्म त्या गोठयामध्ये झाला व त्याच्या आईने त्यास गव्हाणीमध्ये ठेवले.त्यांनी त्याचे नाव येशू ठेवले.

### कोणत्या प्रकारच्या जागेत येशूचा जन्म झाला?

त्याचा जन्म गुरांच्या गोठ्यात झाला.

---

## 23:06

त्या रात्री, काही मेंढपाळ आपली मेंढरे रानामध्ये राखीत होते.अचानक एक तेजस्वी देवदूत येऊन त्यांच्यासमोर प्रकट झाला, आणि ते खूप घाबरले.देवदूत म्हणाला, ‘‘भिऊ नका, कारण मी तुम्हास मोठ्या आनंदाची बातमी घेऊन आलो आहे.आज बेथलेहेम नगरामध्ये तुमच्यासाठी मसिहा, अर्थात प्रभू जन्मला आहे!’’

### देवदूताने मेंढपाळास कोणता संदेश दिला?

“ भिऊ नका, कारण तुमच्यासाठी एक चांगली बातमी माझ्याकडे आहे. मशीहा (ख्रिस्त), प्रभु, बेथलेहेमात जन्मला आहे!“

---

## 23:07

‘‘जा आणि बाळाचा शोध घ्या, आणि तो तुम्हास बाळंत्याने गुंडाळलेला गव्हाणीमध्ये ठेवलेला दृष्टिस पडेल.’’अचानक, आकाशामध्ये देवदूत देवाची स्तूती करत म्हणाले,‘‘वर स्वर्गात देवाला गौरव आणि पृथ्वीवर ज्या मनुष्यांवर त्याची कृपा झाली आहे त्यांस शांती!’’

---

## 23:08

मेंढपाळ लगेच येशूच्या जन्माच्या ठिकाणी पोहोचले आणि देवदूताने सांगितल्याप्रमाणे त्यांना ते बाळ गव्हाणीमध्ये ठेवलेले दृष्टीस पडले.हे पाहून त्यांना खूप आनंद झाला.मरीयेस ही खूप आनंद झाला.आपण जे पाहिले व ऐकले त्याविषयी आनंद करत मेंढपाळ आपल्या मेंढरांकडे परतले.

### हेच ते बाळ आहे हे त्यांना कसे समजणार होते?

ते कपड्यात गुंडाळलेले व गव्हाणीत ठेवलेले असणार होते.

### बाळाला पाहिल्यानंतर मेंढपाळांनी काय केले?

त्यांनी जे ऐकले व पाहिले त्याबद्दल ते देवाचे गौरव व स्तुती करत परत शेतात गेले.

---

## 23:09

थोडया दिवसांनंतर, पूर्व दिशेला एक विशेष तारा ज्ञानी लोकांनी पाहिला.त्यांना समजले की, हा यहूद्यांचा एक नवा राजा जन्मास आला आहे.म्हणून त्याचे दर्शन घेण्यासाठी त्यांनी फार मोठा प्रवास केला.ते बेथलेहेम येथे आले आणि जेथे येशू व त्याचे माता-पिता राहात होते ते घर त्यांनी शोधले.

### नंतर,पूर्वेकडच्या ज्ञानी लोकांना यहूद्यांचा राजा जन्मला आहे हे कसे कळले?

त्यांनी पूर्व दिशेला एक विशेष तारा पाहिला.

---

## 23:10

जेव्हा त्या ज्ञानी लोकांनी येशू बाळास त्याची आई मरीया हिच्या बरोबर पाहिले तेव्हा त्यांनी त्याला नमन केले व त्याची उपासना केली.त्यांनी येशूबाळास मौल्यवान भेटवस्तू दिल्या.तेंव्हा ते आपल्या घरी परतले

### ज्ञानी लोकांनी येशूला पाहिले तेव्हा त्यांनी काय केले?

त्याच्या पाया पडून त्यांनी त्याला नमन केले, व त्यांनी येशूला मौल्यवान दाने दिली.

# योहान येशूचा बाप्तिस्मा करतो

## 24:01

योहान, जख-या आणि अलीशिबा यांचा पुत्र, मोठा होऊन एक संदेष्टा बनतो.तो जंगलामध्ये राहत असे, रानमध व टोळ खात असे आणि त्याची वस्त्रे ऊंटाच्या केसापासून बनविलेली होती.

### योहान कोठे राहात होता?

तो रानात राहात असे.

---

## 24:02

योहानाचे भाषण ऐकण्यासाठी अनेक लोक जंगलामध्ये जाऊ लागले.त्याने त्यांस प्रचार केला,''पश्चात्ताप करा, कारण स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे!''

### योहानाने लोकांना कोणता संदेश दिला?

"पश्चात्ताप करा, कारण स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे!"

---

## 24:03

योहानाचा संदेश ऐकून अनेक लोकांनी पश्चाताप केला आणि योहानाने त्यांना बाप्तिस्मा दिला.अनेक धार्मिक पुढारी देखील बाप्तिस्मा घेण्यासाठी आले, परंन्तु त्यांनी आपल्या पापांविषयी पश्चात्ताप केला नव्हता व आपले पाप कबूल केले नव्हते.

### त्याच्या संदेशामुळे ज्यांनी पश्चात्ताप केला त्या लोकांना योहानाने काय केले?

त्याने त्यांना बाप्तिस्मा दिला.

---

## 24:04

योहान त्या धार्मिक पुढा-यांना म्हणाला,'' तुम्ही सापांनो पिल्लांनो!पश्चात्ताप करा आणि तुमची वागणूक बदला.प्रत्येक झाड जे चांगले फळ देत नाही, ते तोडले जाईल व अग्निमध्ये टाकण्यात येईल.योहानाने संदेष्टयांच्या या वचनाची पूर्तता केली, ''पाहा, मी आपला दूत तुझ्या पुढे पाठवित आहे, तो तुझ्यासाठी मार्ग तयार करील.''

### योहान कोणत्या प्रकारच्या लोकांची तुलना विषारी सापाबरोबर करतो?

धार्मिक पुढाऱ्यांपैकी पुष्कळांनी पश्चात्ताप करण्याचे नाकारले त्यांच्यासाठी.

---

## 24:05

काही यहूद्यांनी योहानाला तु मसिहा आहे की काय असे विचारले.योहान म्हणला,''मी मसिहा नाही, परंतू माझ्या मागून एकजण येत आहे.तो एवढा महान आहे की, त्याच्या वहाणांचा बंद सोडण्याची देखील माझी पात्रता नाही.''

### यहूद्यांनी त्याला विचारले की तू मशीहा आहेस का तेव्हा योहानाने काय उत्तर दिले?

तो म्हणाला मी मशीहा नाही.

---

## 24:06

दूस-या दिवशी येशू योहानाकडून बाप्तिस्मा घेण्यासाठी आला.योहानाने त्यास पाहून म्हटले,''पाहा!जगाचे पाप हरण करणारा देवाचा कोकरा.''

### येशूला बाप्तिस्मा घेण्यासाठी आपणाकडे येतांना पाहून योहानाने त्याला काय नाव दिले?

तो त्याला म्हणाला, "जगाचे पाप वाहून नेणारा देवाचा कोकरा. "

---

## 24:07

योहान येशूला म्हणाला, ‘‘मी तुला बाप्तिस्मा देण्यास पात्र नाही.त्याऐवजी मला तुझ्याकडून बाप्तिस्मा घेण्याची आवश्यकता आहे.परंतू येशू त्यास म्हणाला,‘‘तु मला बाप्तिस्मा दे, कारण देवाच्या दृष्टिने हे करणे योग्य आहे.’’तेंव्हा योहानाने त्याला बाप्तिस्मा दिला, जरी येशूने काहीच पाप केले नव्हते.

### योहानाने बाप्तिस्मा देण्यापुर्वी येशूला त्याच्या पापांचा पश्चात्ताप करण्याची का गरज नव्हती?

कारण येशूने कधीच पाप केले नव्हते.

### योहानाने येशूचा बाप्तिस्मा करावा असे येशू का म्हणाला?

योहानाने येशूचा बाप्तिस्मा करावा कारण या प्रकारे सर्व न्यायीपण परिपूर्ण करणे योग्य आहे.

---

## 24:08

जेव्हा येशू बाप्तिस्म्यानंतर पाण्यातून वर आला, तेंव्हा देवाचा आत्मा कबूतराच्या रुपामध्ये येऊन त्याच्यावर थांबला.त्याचवेळी आकाशवाणी झाली,‘‘तू माझा परमप्रिय पुत्र आहेस, तुज विषयी मी फार संतुष्ट आहे.’’

### त्याचा बाप्तिस्मा झाल्यावर येशूवर राहाण्यास कोण आले?

देवाचा आत्मा कबुतराच्या रुपाने त्याच्यावर आला.

### येशूच्या बाप्तिस्म्यानंतर देव येशूला काय म्हणाला?

“हा माझा प्रिय पुत्र आहे, याच्याठायी मी संतुष्ट आहे.”

---

## 24:09

देवाने योहानास सांगितले होते, ‘‘तू बाप्तिस्मा दिलेल्या ज्या व्यक्तिवर पवित्र आत्मा उतरुन येईल.तीच व्यक्ति देवाचा पुत्र असेल’’एकच देव आहे.परंतु जेव्हा योहानाने येशूला बाप्तिस्मा दिला, तेंव्हा त्याने देवपिता बोलत असलेला पाहिला, देवपुत्र येशू पाहिला, आणि पवित्र आत्मा पाहिला.

## पवित्र आत्मा येऊन कोणावर राहील असे देवाने म्हटले होते?

तो येऊन देवाच्या पुत्रावर राहील.

# येशूची सैतानाकडून परिक्षा

## 25:01

बाप्तिस्म्यानंतर लगेच पवित्र आत्म्याने येशूला अरण्यात नेले , त्या ठिकाणी येशू चाळीस दिवस व चाळीस रात्री उपास करतो.तेव्हा सैतानाने तेथे येऊन येशूची परीक्षा पाहिली.

### येशू बाप्तिस्म्यानंतर कोठे गेला?

येशू अरण्यात गेला.

### येशूला अरण्यात कोणी नेले?

पवित्र आत्म्याने त्याला अरण्यात नेले.

### येशूने अरण्यात काय केले?

येशूने चाळीस दिवस व चाळीस रात्र उपास केले.

---

## 25:02

सैतानाने येशूला मोहात पाडले,''जर तू खरोखर देवाचा पुत्र आहेस, तर हया दगडांस भाकरी होण्याची आज्ञा कर म्हणजे तूला जेवण मिळेल!''

### सैतानाने परीक्षा घेण्यासाठी येशूला धोंड्याचे काय करावयास सांगितले?

त्याने सांगितले की धोंड्याची भाकर कर म्हणजे त्याला खाता येईल.

---

## 25:03

येशूने उत्तर दिले,''देवाच्या वचनामध्ये असे लिहिले आहे,'लोकांना जगण्यासाठी केवळ भाकरी नको, तर देवाच्या मुखातून निघणा-या प्रत्येक वचनाची गरज आहे!''

### भाकरी इतकीच आपल्याला कशाची गरज आहे असे येशूने सांगितले?

देवाच्या मुखातून निघणाऱ्या प्रत्येक वचनाची आपल्याला गरज आहे.

---

## 25:04

मग सैतानाने येशूला घेऊन मंदिराच्या शिरोभागी उभे केले आणि त्याला म्हटले,''तू देवाचा पुत्र आहेस तर खाली उडी टाक, कारण असे लिहीले आहे की, 'देव आपल्या दूतांना तुझ्याविषयी आज्ञा करील, आणि तुझा पाय धोंडयावर आपटू नये म्हणून ते तूला हातांवर झेलून धरतील.''

### सैतानाने येशूची परीक्षा घेण्यासाठी पुढे काय करायला सांगितले?

येशूला त्याने मंदिरावरुन खाली उडी टाकण्यास सांगितले.

### कोण येशूचे संरक्षण करील असे सैतान म्हणाला?

देव येशूचे संरक्षण करण्यास देवदूतांना आज्ञा करील.

---

## 25:05

परन्तु येशूने सैतानाला धर्मशास्त्रातूनच उत्तर दिले.तो म्हणला,''देव आपल्या वचनातून आपल्या लोकांना आज्ञा देतो,'तू आपला देव परमेश्वर याची परीक्षा पाहू नकोस.''

### येशूने त्याला काय उत्तर दिले?

देवाचे वचन सांगते की तु तुझ्या देवाची परीक्षा पाहू नको.

---

## 25:06

मग सैतानाने येशूला जगातील सर्व राज्ये व वैभव दाखविले व म्हणाला,''जर तू पाया पडून मला नमन करशील तर मी हे सगळे तुला देईन.''

### शेवटच्या परीक्षेत सैतानाने येशूला काय देऊ केले?

सैतानाने जगाची सर्व राज्ये व त्यांचे वैभव येशूला देऊ केले.

### ही सर्व राज्ये मिळविण्याकरीता सैतानाने येशूला काय करावयास सांगितले?

येशूने सैतानाच्या पाया पडून त्याला नमन करावे.

---

## 25:07

येशूने म्हटले,‘‘अरे सैताना, चालता हो!देव आपल्या वचनामध्ये लोकांस आज्ञा करितो, परमेश्वर तुझा देव हयाला नमन कर व केवळ त्याचीच उपसना कर!’’

### येशूने सैतानाला नमन केले का?

नाही, तो फक्त देवालाच नमन करणार व त्याचीच सेवा करणार.

---

## 25:08

अशा प्रकारे येशू सैतानाच्या मोहाला बळी पडला नाही, म्हणून सैतान त्याला सोडून तेथून निघून गेला.मग देवदूतांनी येऊन येशूची सेवा केली.

### येशूला पाप करायला लावण्यास सैतानाला शक्य झाले का?

नाही.

### सैतान येशूला सोडून गेल्यानंतर काय झाले?

देवदूतांनी येऊन त्याची सेवा केली.

# येशू आपल्या सेवेचा आरंभ करतो

## 26:01

सैतानाच्या परीक्षेवर विजय मिळविल्यावर येशू पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने परिपूर्ण होऊन आपण राहत असलेल्या गालील या ठिकाणी परत आला.येशू परमेश्वराच्या वचनाचे शिक्षण देत अनेक ठिकाणी जात असे.प्रत्येक जण त्याच्याविषयी चांगलेच बोलत असे.

### सैतानाच्या परीक्षा घेणे संपल्यानंतर येशू कोठे गेला?

येशू गालील प्रांतात जेथे तो राहात होता तेथे गेला.

---

## 26:02

येशू त्याच्या बालपणी राहात असलेल्या नासरेथ या ठिकाणी गेला.शब्बाथ दिवशी, तो उपासना करीत त्या ठिकाणी गेला.त्यांनी त्यास यशया संदेष्टयाच्या ग्रंथाची गुंडाळी वाचण्यासाठी दिली.येशूने ती गुंडाळी उघडून त्यातील कांही भाग लोकांसमोर वाचला.

### येशू लहानपणी राहात होता त्या शहराचे नाव काय होते?

नासरेथ.

### शब्बाथ दिवशी येशू कोठे गेला?

तो उपासनेच्या ठिकाणी गेला.

### उपासनेच्या ठिकाणच्या लोकांनी त्याला यशया संदेष्टयाची गुंडाळी का दिली?

येशूने त्यातून वाचावे अशी त्यांची इच्छा होती.

---

## 26:03

येशूने वाचले,''परमेश्वराने त्याचा आत्मा मला दिला आहे, ते अशासाठी की गरीबांस सुवार्ता सांगावी, धरुन नेलेल्यांची सुटका व अंधळयांस पुन्हा दृष्टिचा लाभ व्हावा व ठेचले जात आहेत त्यांस सोडवुन पाठवावे हयाची घोषणा करावी.परेमश्वराच्या कृपा प्रसादाच्या वर्षाची घोषणा करावी''

---

## 26:04

त्यानंतर येशू खाली बसला.प्रत्येकाने त्याला निरखून पाहिले.त्यांना ठाऊक होते की येशूने वाचलेला शास्त्रातील हा उतारा ख्रिस्त येशू विषयी होता.येशू म्हणला,‘‘ हा शास्त्रलेख आज तुम्ही ऐकत असताना पूर्ण झाला आहे.’’तेंव्हा सर्व आश्चर्य करु लागले.‘‘हा योसेफाचा पुत्र ना?’’ ते म्हणू लागले.

### जो शास्त्रभाग येशूने वाचला तो कोणत्या व्यक्तीविषयी होता?

मशीहा.

### जो शास्त्रभाग येशूने नुकताच वाचला होता त्याविषयी तो काय म्हणाला?

तो म्हणाला हा शास्त्रलेख वाचत असतांना पूर्ण झाला आहे.

### येशूच्या ह्या बोलण्याने त्याच्या गावच्या लोकांची प्रतिक्रीया काय होती?

त्यांना आश्चर्य वाटले व ते म्हणाले, ”हा योसेफाचा मुलगा ना”?

---

## 26:05

मग येशू म्हणाला,‘‘ कोणत्याही संदेष्ट्याला आपल्या गावात मान मिळत नाही.एलीया संदेष्टयाच्या काळामध्ये इस्राएलामध्ये अनेक विधवा होत्या. परंतू जेंव्हा साडेतीन वर्षे दुष्काळ पडता तेंव्हा देवाने इस्राएलांतील विधवांना मदत करण्यासाठी एलीयास पाठविले नाही, तर परराष्ट्रीय विधवेस मदत करण्यासाठी पाठविले.’’

### दुसऱ्या राष्ट्रातील लोकांना मदत करणाऱ्या देवाच्या संदेष्ट्यांविषयीची कोणती उदाहरणे येशूने दिली?

एलीयाच्या काळात दुष्काळाच्या वेळी देवाने एका विधवेला मदत केली, आणि जो इस्राएलाच्या शत्रुंचा सेनापती नामान, त्याला बरे केले.

---

## 26:06

येशू पुढे म्हणला, ‘‘आणि अलीशा संदेष्टयाच्या काळामध्ये इस्राएलात अनेक कुष्ठरोगी होते.परंतू अलीशाने त्यांपैकी कोणालाही बरे केले नाही.त्याने फक्त नामानाचा कुष्ठरोग बरा केला, तो इस्राएलाच्या शत्रूंचा सेनापती होता.’’येशूचे भाषण ऐकत असलेले लोक यहूदी होते.म्हणुन जेंव्हा त्यांनी हे ऐकले, त्यांना त्याचा खूप राग आला.

### दुसऱ्या राष्ट्रातील लोकांना मदत करणाऱ्या देवाच्या संदेष्ट्यांविषयीची कोणती उदाहरणे येशूने दिली?

एलीयाच्या काळात दुष्काळाच्या वेळी देवाने एका विधवेला मदत केली, आणि जो इस्राएलाच्या शत्रुंचा सेनापती नामान, त्याला बरे केले.

### येशूने ह्या गोष्टी सांगितल्यावर लोकांचा प्रतिसाद कसा होता?

ते संतापले आणि येशूला जिवे मारण्याचा प्रयत्न केला.

---

## 26:07

नासरेथातील लोकांनी येशूला पकडून ओढत डोंगराच्या कडयावरुन फेकून त्यास जीवे मारावे म्हणून नेले.परंतु येशूने गर्दीतून वाट काढत, नासरेथ नगर सोडले.

### येशूने ह्या गोष्टी सांगितल्यावर लोकांचा प्रतिसाद कसा होता?

ते संतापले आणि येशूला जिवे मारण्याचा प्रयत्न केला.

### लोकांच्या गर्दीतुन येशू कसा निसटला?

येशू त्यांच्यामधून चालत गेला व शहर सोडून निघून गेला.

---

## 26:08

मग येशू गालिलातील प्रांतामधून प्रवास करत गेला व पुष्कळसे लोक त्याकडे आले.त्यांनी त्याच्याकडे अनेक आजारी, अपंग, आंधळे ,पांगळे, बहिरे, व मुके लोक घेऊन आले आणि येशून त्यांना बरे केले.

### गालीलातील लोकांनी येशूला कसा प्रतिसाद दिला?

त्यांनी त्याच्याकडे पुष्कळ आजारी किंवा अपंग लोक आणले यासाठी की त्याने त्यांना बरे करावे.

---

## 26:09

भुते लागलेले असे अनेक लोक येशूकडे आणिले गेले.येशूच्या आज्ञेने, ती भूते त्या मनुष्यांतून बाहेर निघाली व पुष्कळदा ओरडून म्हणत ''तू देवाचा पुत्र आहेस!'' मोठया जनसमुदायाने आश्चर्यचकीत होऊन देवाची उपासना केली.

### जेंव्हा येशू लोकांतुन अशुद्ध आत्म्यांना निघून जाण्याची आज्ञा देत असे तेव्हा ते त्याला तो कोण आहे म्हणून म्हणत होते?

ते म्हणाले येशू देवाचा पुत्र आहे.

---

## 26:10

तेंव्हा येशूने बारा शिष्यांची निवड केली, त्यांना येशूचे प्रेषित म्हणत.ते प्रेषित येशूबरोबर प्रवास करत आणि त्याच्यापासून शिकत असत.

### किती माणसांना येशूने आपले प्रेषित म्हणुन निवडले?

त्याने बारा प्रेषित निवडले.

## चांगल्या शोमरोन्याची गोष्ट

## 27:01

एके दिवशी, यहूदी धर्मशास्त्रात पारंगत असलेला एक व्यक्ति येशूची परिक्षा पाहण्यासाठी येऊन म्हणाला,‘‘गुरुजी सार्वकालिक जीवन प्राप्त करण्यासाठी मी काय करावे?’’येशूने उत्तर दिले,‘‘देवाच्या नियमशास्त्रामध्ये काय लिहिले आहे?’’

### यहूदी नियमशास्त्रात पारंगत असलेल्या मनुष्याने येशूला कोणता प्रश्न विचारला?

“गुरुजी, सार्वकालिक जीवन मिळावे म्हणून मी काय करावे?”

### त्यावर येशूने त्या हुशार मनुष्याला कोणता प्रश्न विचारला?

त्याने विचारले, “देवाच्या नियमशास्त्रात काय लिहीले आहे?“

---

## 27:02

त्याने म्हटले,‘‘तू आपला देव याजवर संपूर्ण मनाने, संपूर्ण जीवाने व संपूर्ण शक्तिने प्रीती कर.आणि जशी आपणावर तशी शेजा-यावर प्रीति कर’’येशूने म्हटले,‘‘अगदी बरोबर उत्तर दिलेस!हे कर म्हणजे तू सर्वकाळ जगशील.’’

### देवाचे नियमशास्त्र आपण कोणावर प्रीति करावी म्हणून सांगते?

आपला देव परमेश्वर आणि आपला शेजारी.

---

## 27:03

परंतु धर्मशास्त्राचा पंडित स्वत:ला धार्मीक ठरवू पाहात होता म्हणून त्याने विचारले,‘‘माझा शेजारी कोण आहे?’’

### माझा शेजारी कोण असे त्या यहूदी नियमशास्त्रामध्ये हुषार असणाऱ्या व्यक्तीने का विचारले?

स्वतःला धार्मिक ठरवून घ्यावे अशी त्याची इच्छा होती.

---

## 27:04

येशूने एक गोष्ट सांगून त्या धर्मशास्त्र पंडितास उत्तर दिले.''एक यहुदी मनुष्य यरुशलेमेहून यरीहो नगरास रस्त्याने जात होता.''

---

## 27:05

''तो मनुष्य रस्त्याने जात असतांना, लुटारुंनी त्याच्यावर हल्ला केला.त्यांनी त्याकडे असलेली सर्व मालमत्ता घेऊन त्यास मारहाण करुन अर्धमेल्या अवस्थेत सोडून गेले.मग ते तेथून निघून गेले.

### येशूच्या गोष्टीमध्ये, प्रवास करीत असताना त्या यहूदी माणसाला काय झाले होते?

लुटारुंनी त्याच्यावर हल्ला केला, त्याच्या जवळचे सर्व घेतले, व अर्धमेला होइपर्यंत त्याला मारले.

---

## 27:06

'' त्यानंतर लगेच, एक यहूदी याजक त्याच रस्त्याने खाली चालत आला.जेंव्हा हया धार्मिक पुढा-याने पाहिले की हा मनुष्याला लुटारुंनी लुटले आहे, अर्धमेल्या अवस्थेत आहे, तो रस्त्याच्या दुस-या बाजुने गेला, त्याने मदतीची गरज असलेल्याकडे दुर्लक्ष केले व पुढे निघून गेला.

### ह्या जखमी माणसाला पाहाणारा पहिला व्यक्ती कोण होता?

एक यहूदी याजक होता.

### त्या जखमी माणसाला पाहून याजकाने काय केले?

त्याने त्याच्याकडे दुर्लक्ष केले आणि रस्त्याच्या दुसऱ्या बाजूने गेला.

---

## 27:07

''त्यानंतर थोड्या वेळातच, एक लेवी त्याच रस्त्याने आला.(लेवी हे यहूदी लोकांतील एक गोत्र होते जे मंदिराच्या सेवेमध्ये याजकांची मदत करत असत.)लेवीनेही त्या मनुष्याकडे, ज्याला लुटारुंनी लुटले होते मारले होते, दुर्लक्ष केले व दुस-या वाटेने निघून गेला."

### दुसरा व्यक्ती कोण होता ज्याने त्याला पाहिले आणि तोही बाजूने निघून गेला?

एक लेवी होता.

### जखमी माणसाला पाहून लेवीने काय केले?

त्याने त्याच्याकडे दुर्लक्ष केले आणि रस्त्याच्या दुसऱ्या बाजूने निघून गेला.

---

## 27:08

''त्या मागून येणारा तिसरा व्यक्ति एक शोमरोनी होता.(शोमरोनी हे यहूदी वंशातील परराष्ट्रीयांशी विवाह केलेले लोक होते.)(शोमरोनी व यहूदी एकमेकांचा द्वेष करत असत.)परंतु हया शोमरोन्याने त्या यहूदी मनुष्यास पाहिले, तेंव्हा त्याला त्याची दया आली.मग त्याने त्याची काळजी घेतली व त्याच्या जखमांवर पट्टी बांधली".

### जखमी माणसाला पाहाणारा तिसरा व्यक्ती कोण होता?

एक शोमरोनी होता.

### यहूदी व शोमरोनी यांच्यात कसे संबंध असत?

ते एकमेकांचा द्वेष करीत असत.

---

## 27:09

''मग त्या शोमरोन्याने त्या मनुष्याला उचलून आपल्या गाढवावर बसविले व त्याने त्याला मार्गावर असलेल्या एका उतार शाळेमध्ये आणिले व त्याची काळजी घेतली."

### शोमरोन्याने त्या जखमी माणसाला कशी मदत केली?

त्याने त्याच्या जखमा बांधल्या, रस्त्याच्या बाजूच्या उतारशाळेत आणले, आणि त्याची काळजी घेतली.

---

## 27:10

''दुस-या दिवशी, शोमरोन्याला पुढे प्रवासास जायचे होते.म्हणून त्याने उतारशाळेच्या व्यवस्थापकास काही पैसे देऊन म्हटले,''याची काळजी घ्या, आणि यापेक्षा जे कांही अधिक पैसे खर्चाल तो खर्च मी परत आल्यावर तुम्हाला देईन.''

### शोमरोन्याने त्या जखमी माणसाला कशी मदत केली?

त्याने त्याच्या जखमा बांधल्या, रस्त्याच्या बाजूच्या उतारशाळेत आणले, आणि त्याची काळजी घेतली.

---

## 27:11

तेंव्हा येशूने त्या धर्मशास्त्राच्या पंडितास विचारले,‘‘तूला काय वाटते?त्या तिघांपैकी लुटलेल्या मारलेल्या अवस्थेत असलेल्या मनुष्याचा शेजारी कोण होता?’’त्याने उत्तर दिले ज्याने त्याजवर दया दाखविली तो.येशूने त्यास म्हटले,‘‘तूही जाऊन तसेच कर.’’

### ह्या तिघांपैकी कोण त्या जखमी माणसाच्या शेजाऱ्यासारखा वागला?

ज्याने त्याच्यावर दया दाखवली तो शोमरोनी.

# एक श्रीमंत तरुण अधिकारी

## 28:01

एके दिवशी, एक श्रीमंत तरुण अधिकारी येशूकडे येऊन विचारु लागला,‘‘उत्तम गुरुजी, सार्वकालिक जीवन मिळावे म्हणून मी काय करावे?’’येशून त्यास म्हटले,‘‘तू मला ‘उत्तम’ असे का म्हणतोस?एका देवा शिवाय कुणीच उत्तम नाही.परंतु तुला सार्वकालिक जीवन हवे आहे, तर देवाच्या आज्ञा पाळ.’’

### श्रीमंत तरुण अधिकाऱ्याने येशूला काय विचारले?

सार्वकालिक जीवन मिळवण्यासाठी मी काय करावे?

### सार्वकालिक जीवन मिळवण्यासाठी येशूने त्या तरुणाला काय करावयास सांगितले?

त्याने त्याला देवाच्या आज्ञा पाळावयास सांगितले.

---

## 28:02

‘‘कोणत्या आज्ञा मी पाळावयाची आवश्यकता आहे?’’ त्याने विचारले.येशूने उत्तर दिले,‘‘खून करु नकोस.व्यभिचार करु नकोस.चोरी करु नकोस.खोटे बोलू नकोस.आपल्या आईबापाचा मान राख, आणि जशी आपणावर तशी आपल्या शेजा-यावर प्रीति कर.’’

---

## 28:03

परंतु त्या तरुणाने म्हटले,‘‘हया सर्व आज्ञा मी लहानपणापासूनच पाळत आलो आहे.सर्वकाळ जगण्यासाठी मला आणखी काय करण्याची गरज आहे?’’येशूने त्याच्याकडे पाहिले व त्याच्यावर प्रीती केली.

### येशूने सांगितलेल्या आज्ञांविषयी तो तरुण अधिकारी काय म्हणाला?

तो म्हणाला ह्या आज्ञा मी लहानपणापासून पाळल्या आहेत.

---

## 28:04

येशूने उत्तर दिले,‘‘जर तू पूर्ण होऊ पाहतोस, तर जा आणि तूझी सर्व मालमत्ता विकून आलेला पैसा गोरगरीबांस दे, म्हणजे तुला स्वर्गामध्ये संपत्ती मिळेल.मग ये आणि माझ्यामागे चालू लाग.’’

### येशूने अजून कोणती गोष्ट त्या तरुणास करावयास सांगितली?

त्याने त्याला सांगितले तुझे जे सर्वकांही आहे ते विक आणि गरीबांस पैसे वाटून टाक, आणि माझ्यामागे ये.

### श्रीमंत तरुण अधिकाऱ्याला काय प्रतिफळ मिळेल म्हणून य़ेशूने सांगितले होते?

त्याला स्वर्गात संपत्ती मिळणार होती.

---

## 28:05

येशूचे हे बोलणे ऐकून तो तरुण खूप निराश झाला, कारण तो खूप श्रीमंत होता व आपल्या जवळची मालमत्ता दुस-यास देऊ इच्छीत नव्हता.तो येशूपासून निघून गेला.

### तो तरुण अधिकारी का दुःखी होऊन येशूपासून निघून गेला?

त्याच्याजवळ असणाऱ्या सर्व वस्तू त्याला देऊन टाकायला नको होत्या.

---

## 28:06

मग येशू आपल्या शिष्यांस म्हणाला, “श्रीमंतांना स्वर्गाच्या राज्यात जाणे फार कठिण आहे!होय, श्रीमंताचा स्वर्गाच्या राज्यात प्रवेश होणे यापेक्षा ऊंटाला सुईच्या छिद्रातून जाणे सोपे आहे.’’

### श्रीमंत मनुष्याचा देवाच्या राज्यात प्रवेश होणे कसे कठीण आहे?

उंटाने सुईच्या नेढ्यातून जाणे सोपे आहे.

---

## 28:07

जेंव्हा शिष्यांनी हे ऐकले तेंव्हा त्यांना आश्चर्याचा धक्का बसला व ते म्हणाले, ‘‘तर मग कोणाचे तारण होणे शक्य आहे?’’

---

## 28:08

येशूने शिष्यांकडे पाहून म्हटले, ‘‘मनुष्यांस हे अशक्य आहे, परंतु देवाला सर्व काही शक्य आहे.’’

### श्रीमंत माणसाचे तारण होणे शक्य आहे का?

होय, देवाला सर्व कांही शक्य आहे.

---

## 28:09

पेत्र येशूला म्हणाला, ‘‘आम्ही सर्व सोडून तुझ्या पाठीमागे आलो आहोत.याचे आम्हास काय प्रतिफळ मिळणार?’’

### येशूच्या पाठीमागे जाण्यासाठी शिष्यांनी काय सोडले?

त्यांनी सर्वकांही सोडले.

---

## 28:10

येशूने उत्तर दिले,‘‘ज्यांनी माझ्यासाठी घरे, भाऊ, बहिणी, माता, पिता, लेकरे किंवा मालमत्ता सोडली आहे, त्यांना ती 100 पटीने जास्त मिळणार व त्याजबरोबर अनंत काळचे स्वर्गीय जीवन हे वतन मिळेल.’’परंतु पहिले ते शेवटले व शेवटले ते पहिले असे पुष्कळांचे होईल’’

### त्यांना काय प्रतिफळ मिळेल असे य़ेशूने म्हटले?

त्यांना येणाऱ्या युगात शंभरपट अधिक मिळेल आणि सर्वकालचे जीवन सुद्धा मिळेल.

## असे प्रतिफळ अजून कोणाला मिळेल?

जो कोणी येशूच्या नावासाठी आपली घरे,भाऊ,बहिणी आई,वडील,लेकरे किंवा,संपत्ती सोडतील.

# कृतघ्न चाकराची गोष्ट

## 29:01

एके दिवशी,पेत्राने येशूला विचारले,''प्रभुजी, जेंव्हा माझा भाऊ माझ्याविरुद्ध अपराध करील तेव्हा मी त्यास किती वेळा क्षमा करावी?''सात वेळा काय?''येशूने म्हटले,''सात वेळा नव्हे, तर साताच्या सत्तर वेळा!''यावरुन, येशूला असे म्हणावयाचे होते की, आपण नेहमी क्षमा करावी.तेंव्हा येशूने ही गोष्ट सांगितली.

### पेत्राने येशूला कोणता प्रश्न विचारला?

" माझ्या भावाने माझ्याविरुद्ध पाप केल्यास मी त्याला किती वेळा क्षमा करावी?"

### किती वेळा आपल्या भावाला क्षमा करावी असे पेत्राला वाटले?

सात वेळा.

### किती वेळा त्याने त्याच्या भावाला क्षमा करावी असे येशूने सांगितले?

साताच्या सत्तर वेळा.

### साताच्या सत्तर वेळा म्हणजे येशूला काय म्हणावयाचे होते?

त्याला म्हणावयाचे होते की आपण नेहमी क्षमा करावी.

---

## 29:02

येशू म्हणाला,''देवाचे राज्य एका राजासारखे आहे. त्याला आपल्या चाकरांकडून हिशेब घ्यावा असे वाटले.त्याच्या एका चाकराकडे 200,000 वर्षांच्या वेतनाइतके इतके फार मोठे कर्ज होते.

---

## 29:03

''हा चाकर कर्ज फेडू शकत नसल्यामुळे राजाने म्हटले की, हया मनुष्यास व त्याच्या कुटुंबास गुलाम म्हणून विकून त्याच्या कर्जाची फेड करुन घ्यावी.''

### चाकराने राजाकडून फार मोठे कर्ज घेतले होते ते तो फेडू शकत होता का?

नाही.

### हे फार मोठे कर्ज फेडण्यासाठी राजाने त्याला कोणती शिक्षा दिली?

राजाने हुकूम दिला की त्या माणसाला व त्याच्या कुटूंबाला गुलाम म्हणून विकावे.

---

## 29:04

‘‘तो चाकर राजासमोर आपले पाया पडून म्हणाला, कृपया माझ्यावर दया करा व मला कही वेळ द्या, म्हणजे मी तुमचे सर्व कर्ज फेडीन’’राजाला त्या चाकराची दया आली व त्याने त्याला त्याचे सर्व कर्ज माफ केले व त्याला जाऊ दिले.’’

### माझ्याशी सहनशीलतेने वागा अशी त्याने राजाजवळ गयावया केली तेव्हा राजाने काय केले?

राजाला चाकराची दया आली व त्याने त्याचे कर्ज माफ केले.

---

## 29:05

‘‘ परंतु हा चाकर बाहेर गेला असताना त्याला त्याच्या सोबतीचा एक चाकर भेटला ज्याच्याकडून त्याचे सुमारे चार महिन्यांच्या वेतनाइतके कर्ज येणे होते.त्या चाकराने आपल्या सोबतीच्या चाकराला पकडले आणि म्हणाला,‘आताच्या आता माझे घेतलेले पैसे मला दे!’’

### ह्या चाकराचा एक सोबतीचा चाकर होता त्याच्याकडे ह्याचे थोडेसे पैसे येणे होते त्याच्याशी तो कसा वागला?

त्याने त्याला धरले व त्याचे पैसे लगेच द्यावे अशी मागणी करु लागला.

---

## 29:06

‘‘त्याचा सोबतीचा चाकर गुडघे टेकून म्हणाला, ‘‘मला थोडा समय द्या व माझ्यावर कृपा करा, म्हणजे मी तुझे सर्व कर्ज फेडीन’’परंतु त्याऐवजी, त्याने आपल्या सोबतीच्या चाकराला सर्व कर्जाची फेड होईपर्यंत तुरुंगात टाकले.

### त्याच्या सोबतीचा दास त्याच्या पाया पडून त्याला म्हणाला की माझ्याशी सहनशीलतेने वाग तेव्हा त्या चाकराने काय केले?

त्याने त्याच्या सोबतीच्या चाकराला तुरुंगात टाकले.

---

## 29:07

तेव्हा त्याच्या सोबतच्या दासाला फार दुख: झाले व त्याने घडलेला सर्व प्रकार आपल्या धण्याला सांगितला .त्यांनी राजाकडे जाऊन सर्वकांही सांगितले.''

### त्याने त्याच्या सोबतीच्या दासाला जेंव्हा तुरुंगात टाकले तेव्हा इतर चाकरांनी काय केले?

इतर चाकरांना खूप वाईट वाटले व त्यांनी याविषयी राजाला सांगितले.

---

## 29:08

राजाने त्या चाकरास बोलावून घेतले व म्हटले,'अरे दुष्ट चाकरा!''तू गयावया केल्यामुळे मी ते सर्व कर्ज तुला सोडिले होते.तशी तूही आपल्या सोबतीच्या चाकरावर दया करावयास पाहिजे होती.राजाला त्याचा खूप राग आला व त्याने त्याचे सर्व देणे फेडीपर्यंत त्याला तुरुंगात टाकले.''

### चाकराने आपल्या सोबतीच्या चाकराला क्षमा केली नाही म्हणून राजाने त्या चाकराला कशी शिक्षा दिली?

त्याने त्याला तुरुंगात टाकले.

---

## 29:09

तेंव्हा येशू म्हणाला, ''जर तुम्ही प्रत्येक जण आपापल्या भावाला मनापासून क्षमा करणार नाही तर माझा स्वर्गातील पिताही त्याप्रमाणेच तुमचे करील.''

### आपण जर मनापासून दुसऱ्यांना क्षमा करणार नाही तर देव आपल्याला क्षमा करील काय?

नाही.

# येशू पाच हजारांना भोजन देतो.

## 30:01

येशूने आपल्या प्रेषितांना अनेक गावांतुन लोकांना सुवार्ता सांगण्यास व शिक्षण देण्यासाठी पाठविले.जेंव्हा ते येशूकडे पुन्हा आले, तेंव्हा त्यांनी आपण केलेली सर्व कार्ये येशूला सांगितली.तेंव्हा येशूने त्यांना तळ्याच्या पलिकडे शांत ठिकाणी काही वेळ विश्रांती घेण्यासाठी त्याच्याबरोबर बोलाविले.म्हणून ते तारवामध्ये बसले व तळयाच्या पलिकडे पोहोचले.

### येशूने आपल्या शिष्यांना गावोगावी का पाठविले?

त्याने त्यांना सुवार्ता सांगण्यास व शिक्षण देण्यास पाठविले

### येशूने त्याच्या प्रेषितांना समुद्राच्या पलीकडच्या बाजूस का नेले?

त्याने त्यांना एकांत स्थळी थोडी विश्रांती घेण्यास बोलावले.

---

## 30:02

परंतु त्या ठिकाणी पुष्कळ लोक होते त्यांनी येशू व शिष्यांना तारवात बसुन जातांना पाहीले.हा जनसमुदाय त्यांच्या अगोदर तळयाच्या पलिकडे पोहचण्यासाठी तळ्याच्या काठाने धावला.म्हणुन येशू व शिष्य त्या ठिकाणी पोहोचले,तेंव्हा एक मोठा जनसमुदाय त्यांची प्रतिक्षा करत तेथे थांबला होता.

### येशू व त्याचे प्रेषित यांना एकांत व विश्रांती मिळाली का?

नाही.पुष्कळ लोक त्यांच्या अगोदर दुसऱ्या बाजुला पळत गेले.

---

## 30:03

त्या जनसमुदायामध्ये सुमारे 5000 पुरुष होते, तरी स्त्रिया व मुले मोजली नव्हती.येशूला त्यांचा कळवळा आला.येशूला, हा समुदाय मेंढपाळ नसलेल्या मेंढरांसारखा दिसून आला.तेंव्हा तो त्यांना शिकवू लागला व त्यामधील आजारी लोकांस बरे करू लागला.

### त्यांची वाट पाहात थांबलेल्या लोकांविषयी येशूला काय वाटले?

त्याला त्यांच्याविषयी कळवळा वाटला.

### येशूने लोकांविषयीचा आपला कळवळा कसा दाखवला?

त्याने त्यांना शिकवले व आजाऱ्यांना बरे केले

### त्यातून किती लोकांनी खाल्ले व ते तृप्त झाले?

पाच हजार पुरुष, स्त्रिया व मुले त्यात मोजलेली नव्हती.

---

## 30:04

दुपारी उशीराने, शिष्यांनी येशूकडे जाऊन सांगितले, ‘‘खूप उशीर झाला आहे आणि येथे जवळपास गाव नाही.तेंव्हा आपण लोकांना पाठवून द्या म्हणजे ते आपणांसाठी कांही खायला घेतील.’’

### लोकांना पाठवून द्यावे असे शिष्यांना का वाटले?

दिवस फार उतरला होता व त्यांना खावयास काहीतरी आणणे जरुरीचे होते.

---

## 30:05

परंतू येशूने शिष्यांस म्हटले, ‘‘तूम्ही त्यांना काहीतरी खावयास द्या!’’ते उत्तरले, ‘‘आम्ही कसे काय एवढया मोठया समुदायास जेवण देऊ शकतो?’’आम्हाकडे केवळ पाच भाकरी व दोन मासळी आहेत.’’

### सर्व लोकांना जेवू घालण्यास शिष्य का असमर्थ होते?

त्यांच्याजवळ फक्त पाच भाकरी व दोन लहान मासे होते.

---

## 30:06

येशूने शिष्यांस सांगितले की, त्यांनी लोकांस हिरवळीवर पन्नास पन्नासाच्या पंक्ति करुन बसायला सांगावे.

---

## 30:07

मग येशूने त्या पाच भाकरी व दोन मासळी घेऊन वरती आकाशाकडे पहिले व त्या अन्नाबद्दल देवाचा धन्यवाद केला.

### त्या पांच भाकरी व दोन लहान मासे यांचे येशूने काय केले?

त्याने अन्नाबद्दल देवाचे आभार मानले व त्या भाकरी मोडून त्याचे तुकडे केले व लोकांना वाढावयास आपल्या शिष्यांना दिल्या.

---

## 30:08

मग येशूने त्या भाकरी व मासळीचे तुकडे केले.मग त्याने शिष्यांस लोकांना वाढण्यासाठी दिले.शिष्य लोकांना वाढतच राहीले तरी ते अन्न संपले नाही.सर्व लोक जेवून तृप्त झाले.

### त्या पांच भाकरी व दोन लहान मासे यांचे येशूने काय केले?

त्याने अन्नाबद्दल देवाचे आभार मानले व त्या भाकरी मोडून त्याचे तुकडे केले व लोकांना वाढावयास आपल्या शिष्यांना दिल्या.

---

## 30:09

त्यानंतर, शिष्यांनी उरलेल्या भाकरी व मासळीचे तुकडे गोळा केले व ते बारा टोपल्या भरल्या.हे सर्व भोजन केवळ पाच भाकरी व दोन मासळयांतूनच पुरविले गेले.

### प्रत्येकाने खाऊन झाल्यावर किती अन्न उरले होते?

बारा टोपल्या भरुन.

# येशू पाण्यावर चालतो

## 31:01

तेंव्हा लोकांना घरी पाठवून देत असतांना येशूने शिष्यांना नावेमध्ये बसून समुद्राच्या पलीकडे जाण्यास सांगितले.सर्व लोक निघून गेल्यानंतर येशू डोंगरावर प्रार्थनेसाठी गेला.येशू तेथे एकटाच होता, आणि रात्री खुप उशिरापर्यंत तो प्रार्थना करीत राहीला.

### येशूने लोकांना निरोप देत असताना शिष्यांना काय सांगितले?

येशू नावेत बसून शिष्यंना सरोवराच्या दुस-या बाजूला जाण्यास सांगितले.

### शिष्यांना त्यांच्या नावेत बसविल्यानंतर येशूने काय केले?

येशू एकटाच प्रार्थना करण्यास डोंगरावर गेला.

---

## 31:02

तोपर्यंत, शिष्य नाव वल्हवत राहीले, पण बरीच रात्र झाली तरी ते समुद्राच्या मध्यभागापर्यंतच पोहोचले होते.फार कष्टाने ते नाव वल्हवीत होते कारण जोराचा वारा त्यांच्या विरुद्ध वाहात होता.

### त्या रात्री शिष्यांना काय समस्या होती?

वारा त्यांच्या विरुद्ध दिशेचा होता, त्यामुळे ते फक्त अर्धेच सरोवर ओलांडू शकले.

---

## 31:03

तेंव्हा येशू प्रार्थना संपवून शिष्यांकडे आला.तो समुद्रावरुन पाण्यावर चालत त्यांच्या नावेकडे येत होता!

### येशू त्यांच्या नावेत कसा पोहचला?

तो पाण्याच्या पृष्ठभागावरुन चालून त्यांच्या नावेत पोहोचला.

---

## 31:04

येशूला पाहून शिष्य खूप घाबरले, कारण त्यांना वाटले की ते कोणा भुताला पाहात आहेत. येशूला ठाऊक होते की, ते घाबरले आहेत म्हणून तो त्यांना म्हणाला, ''भिऊ नका.मीच आहे!''

### त्यांनी प्रथम येशूला पाहिले तेव्हा शिष्यांची प्रतिक्रिया काय होती?

ते भयभीत झाले होते कारण त्यांना वाटले ते भूतच आहे.

### येशू त्यांची भीती शांत करण्यासाठी त्यांना काय म्हणाला?

धीर धरा, भिऊ नका, मी आहे"

---

## 31:05

तेंव्हा पेत्र येशूला म्हणला, ''प्रभुजी, जर आपण आहात, तर मला पाण्यावर चालण्याची आज्ञा द्या.''येशूने पेत्रास म्हटले, ''ये!''

### येशूने पेत्राला पाण्यावरुन येण्यास का सांगितले?

कारण पेत्राने येशूला तसे करण्यास सांगितले.

---

## 31:06

म्हणून पेत्र नावेतून उतरुन येशूकडे पाण्यावर चालू लागला.परंतू थोडे अंतर चालल्यानंतर, त्याने आपली दृष्टि येशूवरुन काढली आणि तो लाटांकडे व वा-याकडे पाहू लागला.

### पेत्राने येशू पासून आपली दृष्टी दूर केल्यानंतर त्याच्या काय लक्षात आले?

त्याला लाटां दिसू लागल्या जोराचा वारा जाणवु लागला व ते पाहून तो घाबरला

---

## 31:07

तेंव्हा पेत्राला भिती वाटली व तो पाण्यामध्ये बुडू लागला.तो मोठयाने ओरडला, ‘‘प्रभुजी, मला वाचवा!’’येशू लगेच त्याच्यापर्यंत पोहोंचला व त्याला धरले.मग तो पेत्रास म्हणाला, ‘‘अरे अल्पविश्वासी माणसा, तू संशय का धरलास?’’

### वारा आणि लाटा पाहून भयभीत झाल्यानंतर पेत्राबरोबर काय घडले?

तो पाण्यात बुडू लागला.

### पेत्राने मदतीसाठी पाचारण केले तेव्हा येशूने काय केले?

येशू आपला हात पुढे केला आणि त्याला धरले.

### येशू पेत्राला धमकावून काय म्हणला?

"हे अल्पविश्वासी, तू संशय का धरलास?"

---

## 31:08

जेंव्हा पेत्र आणि येशू दोघे नावेमध्ये चढले, तेंव्हा लगेच वारा थांबला आणि पाणी शांत झाले.हे पाहून शिष्यांना मोठे आश्चर्य वाटले.त्यांनी येशूला नमन केले व म्हणाले, ‘‘तू खरोखर, देवाचा पूत्र आहेस.’’

### येशू नावेत बसल्या नंतर काय झाले?

वा-याचे वाहने लगेच थांबले आणि पाणी शांत झाले.

### हा चमत्कार पाहिल्यावर शिष्यांनी कसा प्रतिसाद दिला?

त्यांनी येशूची उपासना केली आणि पाया पडून म्हणाले, "तु खरोखर देवाचे पुत्र आहेस."

# येशू एका भूतग्रस्त मनुष्यास व आजारी स्त्रीस बरे करितो

## 32:01

एके दिवशी, येशू आणि त्याचे शिष्य नावेमध्ये बसून समुद्राच्या पलिकडे गरसेकर राहात असलेल्या प्रदेशात गेले.

---

## 32:02

सरोवराच्या पलिकडे जाताच एक भूतग्रस्त मनुष्य येशूकडे धावत आला.

### गरसेकर लोक जेथे राहत होते, तेथे येशू आल्यावर काय झाले?

एक भूत लागलेला मनुष्य येशूकडे धावत आला.

---

## 32:03

हा मनुष्य एवढा शक्तिशाली होता की कोणीही मनुष्य त्याला नियंत्रीत करु शकत नव्हता.लोकांनी त्याचे दंड व पाय साखळदंडांनी व बेडयांनी बांधले, परंतू त्या तो तोडत असे.

### भूत त्या माणसाला काय करायला लावत होते?

भुतग्रस्त महणूस बेड्या तोडून टाकत असे, कबरेमध्ये राहत होता, सर्व दिवस आणि रात्र किंचाळत होता, विवस्त्र असे, आणि दगडांनी स्वत: ठेचून घेत होता.

---

## 32:04

तो मनुष्य कबरींमध्ये रहात असे.तो रात्रंदिवस मोठयाने ओरडत असे.तो अंगावर कपडे घालत नसे व आपले अंग दगडांनी वारंवार ठेचून घेत असे.

### भूत त्या माणसाला काय करायला लावत होते?

भुतग्रस्त महणूस बेड्या तोडून टाकत असे, कबरेमध्ये राहत होता, सर्व दिवस आणि रात्र किंचाळत होता, विवस्त्र असे, आणि दगडांनी स्वत: ठेचून घेत होता.

---

## 32:05

जेंव्हा तो मनुष्य येशूकडे आला, तेंव्हा येशूसमोर येऊन त्याने गुडघे टेकले.येशू त्या दुष्टात्म्यास म्हणाला, ‘‘हया मनुष्यातून बाहेर निघ!’’

---

## 32:06

भूतग्रस्त मनुष्य मोठयाने ओरडला, ‘‘परात्पर देवाच्या पुत्रा येशू , तू मध्ये का पडतोस?’’कृपया मला छळू नकोस !’’तेंव्हा येशूने दुष्टात्म्यास (अशुद्ध आत्म्यास, भुतास) विचारले, ‘‘तूझे नाव काय आहे?’’तो उत्तरला,‘‘माझे नाव सैन्य आहे, कारण आम्ही पुष्कळ आहोत.’’ (‘‘लीजन’’ हा शब्द रोमी सेनेतील हजारो सैनिकांच्या गटासाठी होता)

### भूताचे नाव काय होते?

त्याचे नाव सैन्य होते.

### "सैन्य," या नावाचा काय अर्थ होता?

सैन्य या नावाचा अर्थ पूष्कळ जण असा होतो, त्या मनुष्या मध्ये अनेक भुते होती.

---

## 32:07

ते दुष्टात्मे येशूला विनवणी करु लागले, ‘‘कृपया आम्हाला या प्रांतातून घालवून देऊ नका!’’शेजारच्या टेकडीवर डुकरांचा एक कळप चरत होता.म्हणून, दुष्टात्म्यांनी विनंती केली, “कृपया त्याऐवजी आम्हास डुकरांमध्ये पाठवा!’’येशू म्हणाला, ‘‘जा!’’

### भुते येशूला विनंती करू लागले की, आम्हाला डुकरांच्या कळपात पाठवून दे?

येशू त्यांना म्हणाला जा मग ती भुते नीघून डुकरांमध्ये गेली?

---

## 32:08

तेंव्हा दुष्टात्मे त्या माणसामधून निघून डुकरामध्ये घुसले.तेंव्हा ती डुकरे कड्यावरुन खाली पळत गेली व समुद्रामध्ये बुडाली.त्या कळपामध्ये सुमारे 2000 डुकरे होती.

### भुते येशूला विनंती करू लागले की, आम्हाला डुकरांच्या कळपात पाठवून दे?

येशू त्यांना म्हणाला जा मग ती भुते नीघून डुकरांमध्ये गेली?

### भुतांनी प्रवेश केला तेव्हा डुकरांना काय झाले?

जेव्हा भुतांनी डुकरांनी कळपात प्रवेश केला तेव्हा, तो कळप कड्यावरुन पळत जावून खाली सरोवरात पडला आणि बुडून गेला.

---

## 32:09

हे पाहून डुकरे राखणारे धावत नगरामध्ये गेले व त्यांनी झालेला हा प्रकार व येशूने काय केले हे प्रत्येकाला सांगितले.तेंव्हा नगरातील लोकांनी येऊन त्या भूतग्रस्त मनुष्यास पाहिले.तो शांत बसलेला, अंगावर कपडे घातलेला, व एक सर्वसामान्य वागणा-या माणसा सारखा असा त्यांनी त्याला पाहिला.

### भुते निघाल्यानंतर त्या माणसाचे वागणे कसे होते?

तो शांतपणे बसला, कपडे घातले आणि एक सामान्य व्यक्ती सारखा वागू लागला.

---

## 32:10

हे पाहून लोक फार घाबरले व त्यांनी येशूला त्यांचा प्रांत सोडून जाण्यास सांगितले.तेंव्हा येशू मचव्यात बसून जाण्यासाठी तयार झाला.पूर्वी भूतग्रस्त असलेला मनुष्य येशूच्या बरोबर जाण्यासाठी विनंती करु लागला.

### बरा झालेला मनुष्य आणि मृत डुकरांना पाहून लोकांची प्रतिक्रिया काय होती?

ते घाबरले आणि त्यांनी येशूला त्यांना सोडून जाण्यास सांगितले.

---

## 32:11

परंतू येशू त्यास म्हणाला, ‘‘नाही, तू आपल्या घरी जा व आपल्या मित्रांस व कुटुंबियांस सर्व सांग की देवाने तुझ्यासाठी काय केले व तुझ्यावर कशी दया दाखविली आहे.’’

### आपल्या सोबत जाण्याऐवजी येशूने ब-या झलेल्या माणसाला काय करावयास सांगितले?

येशूने त्याला सांगितले घरी जा आणि तुझ्या मित्रांना आणि कुटुंबाला देवाने जे काही त्याच्यासाठी केले आहे ते सर्वकाही सांग.

---

## 32:12

तेंव्हा तो मनुष्य निघाला व देवाने त्याच्या साठी काय केले आहे याची साक्ष प्रत्येकाला त्याने दिली.हे ऐकणारा प्रत्येकजण आश्चर्याने थक्क झाला.

---

## 32:13

येशू सरोवराच्या पलिकडे परत गेला.तो तेथे पोहोचल्यानंतर, लोकांचा मोठा समुदाय त्याच्याभोवती जमला व ते त्याच्यावर पडू लागले.त्या समुदायामध्ये बारा वर्षापासून रक्तस्रावाची पीडा होत असलेली एक स्त्री होती.तिने आपला सर्व पैसा वैद्यांवर खर्च केला पण तरीही ती बरी झाली नाही, तर तिची परिस्थिती आणखी वाईट झाली.

---

## 32:14

तिने ऐकले होते की येशूने अनेक रोग्यांना बरे केले आहे आणि ती म्हणाली, ‘‘मला खात्री आहे की, जर मी केवळ येशूच्या वस्त्राला स्पर्श केला, तरीही बरी होईन!’’म्हणून तीने येशूच्या मागे जाऊन त्याच्या वस्त्रास स्पर्श केला.तिने वस्त्राला स्पर्श करताच तीचा रक्तस्राव थांबला!

### रक्तस्त्राव समस्येने ग्रस्त स्त्री येशूकडे का आली?

तीने विचार केला की तीने येशूच्या कपड्यांना जरी स्पर्श केला, तरी ती बरी होईल.

### स्त्रीने येशूच्या कपड्यांना स्पर्श केल्या बरोबर काय घडले?

तिचा रक्तस्राव लगेच थांबला.

---

## 32:15

ताबडतोब, येशूला कळले की त्याच्या शरीरामधून सामर्थ्य गेले आहे.म्हणून त्याने मागे वळून पाहिले व म्हटले,‘‘मला कोणी स्पर्श केला?’’

### येशूला कसे माहित की त्याला कोणीतरी स्पर्श केला आहे?

त्याच्या असे लक्षात आले की त्याच्यातून सामर्थ्य बाहेर निघाल्याचे त्याला जाणवले .

---

## 32:16

शिष्यांनी उत्तर दिले, ‘‘लोकांची एवढी गर्दी तुमच्याभोवती आहे व ते तुम्हाला चेंगरत आहेत.तर तूम्ही असे का विचारले, ‘‘मला कोणी स्पर्श केला?’’त्या स्त्रीने भितीने कापत कापत येशूपुढे जाऊन गुढगे टेकले.मग तिने काय केले व ती कशी बरी झाली ते त्याला सांगितले.येशूने तिला म्हटले, ‘‘तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे.शांतीने जा.’’

### ती स्त्री त्याच्या पायावर पडली तेव्हा येशू त्या स्त्रीला काय म्हणला?

मुली "तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे. शांतीने जा."

# पेरणी करणा-याची गोष्ट

## 33:01

एके दिवशी समुद्रकिना-याजवळ येशू एका मोठया जनसमुदायास शिकवण देत होता.पुष्कळ लोक त्याचे ऐकण्यास एकत्र जमले तेंव्हा येशू एका मचव्यात बसला व तो नाव पाण्यामध्ये थोडा आत ढकलला, अशासाठी की त्याला त्यांच्याशी बोलण्यास पुरेशी जागा मिळावी .तो मचव्यात बसून लोकांना शिकवू लागला.

---

## 33:02

येशूने त्यांना ही गोष्ट सांगितली.''एक शेतकरी बी पेरणी करावयास निघाला.तो हाताने पेरणी करत असतांना, काही बी वाटेवर पडले, आणि आकाशातील पक्षांनी येऊन ते सर्व खाऊन टाकले.

### मार्गावर पडलेल्या बियांचे काय झाले?

पक्षी आले व ते सर्व खाऊन टाकले.

---

## 33:03

''काही बी खडकाळीवर पडले, त्या ठिकाणी खूपच कमी माती होती.खडकाळीवरील बी लगेच उगवले, पंरतु (माती खोल नसल्यामुळे) त्याची मुळे खोलवर जाऊ शकली नाहीत.जेंव्हा सूर्य वर आला तेंव्हा, ते करपले.''

### खडकाळ जमिनीवर पडलेल्या बियांचे काय झाले?

ते पटकन अंकुरल, पण मुळ छोट असल्यामुळे सुर्य किरणांनी ते वाळून गेले आणि मेले.

---

## 33:04

''आणखी काही बी काटेरी झुडपांमध्ये पडले.ते बी वाढू लागले, परंतू काटयांनी त्याची वाढ खुंटविली.म्हणून काटेरी झुडपांमध्ये पडलेल्या बीजाची वाढ होऊ शकली नाही व त्यास फळ आले नाही.''

### काटेरी झुडुपात पडलेल्या बियांचे काय झाले?

ते बी वाढू लागल, पण काटेरी झुडुपांनी त्यांची वाढ खुंटविली.

---

## 33:05

‘‘कांही बी चांगल्या जमिनीत पडले.ते बी उगवले व वाढले त्याला पीक आले 30, 60, तर कुठे 100 पट फळ मिळाले.ज्याला ऐकावयास कान आहेत तो ऐको!’’

### चांगल्या जमिनीवर पडलेल्या बियांचे काय झाले?

ते मोठे झाले आणि त्याची लागवड केली गेली, आणि त्याच्या 30, 60, किंवा 100 पट धान्य उत्पादन झाले.

---

## 33:06

हया दाखल्याचा अर्थ शिष्यांना समजला नाही.म्हणून येशूने स्पष्टिकरण केले, ‘‘बी हे देवाचे वचन आहे.वाटेवरची जमीन म्हणजे असा व्यक्ती की जो देवाचे वचन ऐकतो पण समजून घेत नाही आणि सैतान येऊन ते मनातून काढून टाकतो.’’

### शिष्यांनी या बोधकथेचा अर्थ समजला का?

नाही, ते गोंधळून गेले.

### बी या कथेत काय सूचित करते?

बी हे देवाचे वचन सूचित करते.

### मार्ग काय सूचित करते?

तो व्यक्ती, जो वचन ऐकतो, पण ते त्याला समजत नाही, आणि सैतान त्याच्याकजून ते काढून घेतो.

---

## 33:07

‘‘खडकाळ जमीन म्हणजे अशी व्यक्ती जो देवाचे वचन ऐकूतो आणि आनंदाने स्वीकारतो.परंतू कष्ट व छळ आल्यानंतर लगेच अडखळतात.’’

### खडकाळ जमिन काय सूचित करते?

तो व्यक्ती, जो वचन ऐकतो आणि आनंदाने स्वीकारतो, पण दु: ख आणि छळ येते तेव्हा दूर जाते.

---

## 33:08

‘‘काटेरी जमीन म्हणजे जो देवाचे वचन ऐकतो, परंतू कालांतराने संसाराची चिंता, श्रीमंती आणि जगिक सुख यामुळे त्याचे देवावरील प्रेम कमी होत जाते.याचा परिणाम म्हणुन, त्याने ऐकलेले वचन निष्फळ ठरते.’’

### काटेरी जमिन काय सूचित करते?

तो व्यक्ती, जो वचन ऐकतो, पण जसा वेळ जातो, चिंता, संपत्ती, जीवनातील सुखे देवा बद्दल त्याचे प्रेम खुंटविते.

---

## 33:09

‘‘परंतू सुपिक जमिन म्हणजे जो व्यक्ती देवाचे वचन ऐकून त्याजवर विश्वास ठेवतो, आणि फळ देतो.’’

### चांगली माती कशास सूचित करते?

ता व्यक्ती जी वचन ऐकते, विश्वास ठेवतो, आणि फळे देतो.

# येशू अनेक गोष्टी शिकवितो

## 34:01

येशूने देवाच्या राज्याविषयी अनेक गोष्टी सांगितल्या.उदाहरणार्थ, तो म्हणाला, ''देवाचे राज्य मोहरीच्या दाण्यासारखे आहे जे कोणीएकाने आपल्या शेतात पेरले.तुम्हास ठाऊक आहे की मोहरीचा दाणा हा सर्व बीजांमध्ये अगदी लहान आहे.''

### इतर बीयांपेक्षा मोहरीच्या बीया तुलनेत कशा असतात?

ते सर्वात लहान बियाणे आहे.

### गर्विष्ठ आहे त्या प्रत्येकाला देव काय करेल?

तो त्यांना नम्र करेल.

---

## 34:02

परंतू जेंव्हा हा मोहरीचा दाणा उगवुन वाढतो तेंव्हा बागेतील इतर झुडपांपेक्षा ते सर्वत मोठे होऊन इतके वाढते की, आकाशातील पाखरेही येऊन त्याच्या फांद्यात वस्ती करतात.''

### मोहरीच्या बी वाढते तेव्हा काय होते?

ते बागेतल्या सर्व वनस्पती पेक्षा मोठे होते.

---

## 34:03

येशूने आणखी एक गोष्ट सांगितली, ''देवाचे राज्य खमिरासारखे आहे जे एका स्त्रीने पिठामध्ये घातले व संपूर्ण पीठ फुगून गेले.''

### खमिर भाकरीच्या पिठात मिसळल्यानंतर काय होते?

सर्व पीठ हळूहळू फुगून जाते.

---

## 34:04

‘‘देवाचे राज्य शेतामध्ये कुणीतरी लपवून ठेवलेल्या गुप्त खजिन्यासारखे आहे.दुस-या मनुष्यास ते सापडले व त्याने ते पुन्हा पुरुन ठेवले.त्याला एवढा आनंद झाला की त्याने आपली सर्व संपत्ती विकून आलेल्या पैशांनी ते शेत विकत घेतले.

### शेतात लपवून ठेवण्यात आलेले भांडार आढळले तर मनुष्य काय करेल?

तो मनुष्य आनंदाने त्याचे सर्वकाही विकून त्या पैशाने शेत विकत घेईल.

---

## 34:05

‘‘देवाचे राज्य एका मौल्यवान मोत्यासारखे सुद्धा आहे.जेंव्हा मोत्याच्या व्यापा-याच्या ते दृष्टिस पडले, तेंव्हा त्याने त्याची सर्व मालमत्ता विकून टाकली व आलेल्या पैशांनी ते मौलवान मोती विकत घेतले.’’

### मोती व्यापा-याला जर एक मौल्यवान मोती सापडला तेव्हा तो काय करेल?

तो जे आहे ते सर्व काही विकतो आणि तो पैसा मोती खरेदी करण्यासाठी वापरतो.

---

## 34:06

तेंव्हा येशूने कांही लोकांस एक गोष्ट सांगितली जे स्वत:च्या चांगल्या कामावर भरवंसा ठेवत व दूस-या लोकांना तुच्छ मानीत असत.तो म्हणाला, ‘‘दोन माणसे प्रार्थना करण्यासाठी मंदिरात गेले.त्यांपैकी एक जकातदार व दूसरा एक धार्मिक पुढारी होता.’’

### दोन माणसे मंदिरात प्रार्थना करीत असलेली गोष्ट येशू कोणाला सांगतो?

त्या लोकांना जे त्यांच्या स्वत: च्या चांगल्या कामावर विश्वास ठेवतात आणि इतर लोकांचा तिरस्कार करतात.

---

## 34:07

धार्मिक पुढा-याने अशी प्रार्थना केली, ‘‘हे देवा, मी तुला धन्यवाद देतो की मी अन्य मनुष्यांसारखा पापी नाही. जे चोरी, अन्याय, व्यभिचार करतात त्यांच्याप्रमाणे मी नाही, व हया जकातदारासारखाही नाही.”

### धार्मिक पुढारी देवाचे आभार का मानतो?

त्याने देवाचे उपकार मानले यासाठी की तो इतर मनुष्यांसारखा पापी नाही.

---

## 34:08

‘‘उदाहरणार्थ, मी आठवड्यातून दोनदा उपास करितो आणि आपल्या सर्व उत्पन्नाचा दशांश तुला देतो.’’

### धार्मिक पुढारी ते नितीमान आहेत असा विचार का करत होते?

ते प्रत्येक आठवड्यात दोन वेळा उपवास करत आणि त्यांच्या मालमत्तेतून व पैशातून दशमांश देत.

---

## 34:09

‘‘परन्तु तो जकातदार त्या धार्मिक पुढा-यापासून फार दूर उभा होता, आणि वर स्वर्गाकडेही पाहात नव्हता.त्याऐवजी, त्याने आपल्या हातांनी छाती बडवून घेतली आणि प्रार्थना केली, ‘‘देवा, मज पाप्यावर दया कर.’’

### जकातदाराने देवाला काय विनंती केली?

तो म्हणाला हे देवा माझ्यावर दया कर कारण मी पापी आहे.

---

## 34:10

तेंव्हा येशू म्हणाला, ‘‘मी तुम्हाला खचित सांगतो, देवाने त्या जकातदाराची प्रार्थना ऐकून त्यास नितिमान ठरविले.परंतू त्याला धार्मिक पुढा-याची प्रार्थना आवडली नाही.देव प्रत्येक गर्विष्ठाला नीच करील, व जो स्वत:ला नम्र बनवितो त्याला देव उंचाविल.’’

### देवाने कोणाला नितीमान ठरवले?

देवाने जकातदाराला नीतीमान ठरवले.

### नम्र आहे त्या प्रत्येकाला देव काय करेल?

तो त्यांना उच्च स्थान देईल.

# दयाळू पित्याची गोष्ट

## 35:01

एके दिवशी, त्याचे ऐकण्यास जमलेल्या अनेक जकातदार व पापी लोकांस येशू शिकवीत होता.

---

## 35:02

काही धार्मिक पुढारीही त्या ठिकाणी होते व येशू पापी लोक व जकातदार यांना मित्राप्रमाणे वागवतो हे त्यांनी पाहिले आणि ते त्याच्यावर आपसात टीका करु लागले.तेंव्हा येशून त्यांना ही गोष्ट सांगितली.

### धार्मिक नेते येशूची टीका का करत होते?

कारण येशू जकातदार व पाप्यांना त्याच्या मित्रासारखे वागवत असे.

---

## 35:03

‘‘एका मनुष्यास दोन पुत्र होते.धाकटया पुत्राने त्याकडे जाऊन म्हटले, ‘‘बापा, माझ्या वाट्याला येणारी मालमत्ता मला आत्ता द्या’’यास्तव पित्याने आपल्या संपत्तीचे दोन वाटे दोन मुलांसाठी केले.

### लहान मुलाने त्याच्या वडीलाकडे काय मागणी केली?

त्याने त्याचा वारसा हक्काचा वाटा मागितला होता.

---

## 35:04

‘‘लवकरच धाकटा मुलगा सर्व मालमत्ता घेऊन दूरदेशी निघून गेला आणि तेथे वाईट मार्गानी ती संपवून टाकली.’’

### धाकटा मुलाने त्याचे वतनाचे काय केले?

त्याने पापी मार्गाने खर्च केले, त्याने त्याचा वतनाचा वाटा स्वार्थी मित्रांसोबत, रंगेलपनात,दारूबाजीत, उधळून टाकला.

---

## 35:05

‘‘त्यानंतर, तो राहात असलेल्या देशात भयंकर दुष्काळ पडला व त्यास अन्न खरेदी करण्यास त्याच्याजवळ पैसे उरले नाहीत.तेंव्हा त्याला केवळ एकच काम मिळाले ते होते शेतामध्ये डुकरे चारण्याचे काम.तो एवढा दीनवाणा व भूकेलेला होता की डुकरे खात असलेल्या शेंगा खाऊ की काय असे त्याला वाटले.

### धाकटा मुलगा ज्या देशात रहाण्यास गेला होता तेथे काय घडले होते?

तेथे भयंकर दुष्काळ पडला होता.

### दुष्काळाच्या काळात धाकट्या मुलाने जगण्यासाठी काय केले?

त्याने डुकरांना चारायची नोकरी केली.

---

## 35:06

‘‘शेवटी, तो धाकटा पुत्र स्वत:ला म्हणाला, ‘‘मी येथे काय करतोय?’’माझ्या पित्याच्या घरामध्ये नोकरचाकारांची खाण्याची चंगळ आहे, आणि मी येथे उपाशी मरतोय.मी आपल्या पित्याकडे परत जाईल आणि त्याचा एक चाकर म्हणून राहण्यास विनंती करील.’’

### धाकट्या मुलाने घरी परत येण्याचा निर्णय का घेतला?

त्याच्या लक्षात आले की आपल्या वडिलांच्या घरातील नोकरांची हालत चांगली होती व खायला भरपूर होते.

### धाकटा मुलाने वडील भेटल्यावर काय मागण्याचा विचार केला होता?

बाबा मला आपल्या घरात एका नोकरासारखा ठेवून घ्या,

---

## 35:07

‘‘अशा प्रकारे तो धाकटा पुत्र आपल्या पित्याच्या घराकडे जाण्यास निघाला.तो दूर असतानाच, पित्याने त्यास पाहिले व त्याला त्याची दया आली.त्याने धावत जाऊन त्यास मिठी मारली व त्याचे मुके घेतले.’’

### वडिलांनी धाकट्या मुलाला जवळ येताना पाहिले तेव्हा काय केले?

तो त्याकडे पळत गेला त्याला मिठी मारली, आणि त्याचे चुंबन घेतले.

---

## 35:08

‘‘पुत्र म्हणाला, ‘‘हे बापा, मी देवाविरुध्द व आपणाविरुध्द पाप केले आहे.मी आपला पुत्र म्हणविण्यास लायक नाही.’’

### ते भेटले, तेव्हा धाकटा मुलगा त्याच्या वडिलांना काय म्हणला?

"बाबा, मी देवाच्या विरुद्ध व तुमच्या विरुद्ध पाप केले आहे. मी तुमचा मुलगा म्हणवून घेण्याच्या लायकीचा नाही. "

---

## 35:09

‘‘परंतू त्याच्या पित्याने एका चाकरास बोलावून म्हटले, ‘लवकर जा आणि माझ्या पुत्रास उत्तम वस्त्रे आण आणि त्याच्या अंगावर घाला!त्याच्या हातामध्ये अंगठी व पायामध्ये जोडे घाला.मग एक पुष्ट वासरु मारुन एक मेजवानी तयार करा व आपण सगळे आनंद साजरा करु, कारण माझा हा मुलगा मेला होता, पण आता जिवंत झाला आहे!तो हरवला होता, पण आता सापडला आहे!’’

### धाकट्या मुलाच्या कबुलीनंतर वडीलांनी कसा प्रतिसाद दिला?

त्याने त्याला कपडे, एक अंगठी, आणि जोडे दिले आणि शिवाय तो घरी परत आला म्हणून मेजवानी दिली.

---

## 35:10

‘‘अशाप्रकारे त्यांनी आनंदोत्सव सुरु केला.त्याअगोदर, थोरला मुलगा शेतामध्ये काम करुन घरी आला होता.संगीत व नृत्याचा आवाज ऐकून त्याला आश्चर्य वाटले.”

---

## 35:11

‘‘जेंव्हा थोरल्या पुत्रास कळले की त्याचा घाकटा भाऊ घरी आला आहे, तेंव्हा तो रागावला व आत जाईना.त्याचा पिता बाहेर येऊन त्यास आत येण्यासाठी व आनंदामध्ये सहभागी होण्यासाठी विनंती करु लागला, परंतू त्याने आत जाण्यास नकार दिला.

### त्याचा भाऊ घरी आला हे समजल्यावर तेव्हा मोठ्या भावाची प्रतिक्रिया काय होती?

तो खूप रागावला आणि घरात जाण्यास नकार दिला.

---

## 35:12

”थोरला पुत्र आपल्या पित्यास म्हणाला, ‘एवढी वर्षे मी तुम्हासाठी विश्वासूपणे काम करत आहे!मी तुमच्या आज्ञेच्या पलिकडे काहीही केले नाही, तरिही तुम्ही माझ्या मित्रांसोबत आनंद करण्यासाठी एक लहानसे करडूही दिले नाही.परंतू तुमचा हा पुत्र आपली सारी मालमत्ता वाईट मार्गाने नष्ट करुन घरी परतल्यावर, आपण त्याच्यासाठी एक उत्तम वासरु कापले आहे!’’

### मोठा मुलाने त्याच्या वडिलांनाकडे काय तक्रार केली?

मी तुमच्यासाठी विश्वासाने काम केले आणि तू मला मेजवानी करण्यासाठी अगदी लहान शेळी देऊ शकला नाहीस, पण ज्याने तुझा सर्व पैसा उधळला त्यासाठी तू सर्वोत्तम वासरु कापले आहेस.

---

## 35:13

“पित्याने उत्तर दिले, ‘माझ्या मुला, तू नेहमीच माझ्या सोबत आहेस, आणि माझे जे काही आहे, हे सर्व तुझेच आहे.परंतू आता आपण आनंद करणे योग्य आहे, कारण तुझा हा भाऊ मेला होता, पण आता जिवंत झाला आहे.तो हरवला होता, पण आता सापडला आहे!’’

### आता वडिलांच्या मालमत्तेवर मोठ्या मुलाचा किती हक्क होता?

वडीलांकडे जे सर्व काही आहे त्या सर्वावर त्याचा ह्क्क होता.

### धाकटा मुलगा परत आल्यावर केलेल्या मेजवानीसाठी वडीलांनी काय कारण दिले?

त्याचा मुलगा मेलेला होता, पण आता जिवंत होता. तो हरवला होता, पण आता सापडला आहे.

# येशूचे रुपांतर

## 36:01

एके दिवशी, येशूने आपल्या शिष्यांपैकी पेत्र, याकोब व योहान हया तिघांना आपल्या बरोबर घेतले.(य़ोहान नावाचा शिष्य व ज्याने येशूचा बाप्तिस्मा केला ते दोघे एकच व्यक्ती नाहीत.)ते प्रार्थना करण्यासाठी एक उंच डोंगरावर गेले.

### येशूने कोणाला डोंगरावर नेले होते?

त्याचे तीन शिष्य पेत्र, याकोब व योहान.

---

## 36:02

य़ेशू प्रार्थना करीत असतांना त्याचा चेहरा सूर्यासारखा तेजस्वी झाला आणि त्याची वस्त्रे प्रकाशासारखी पांढरीशुभ्र झाली, इतकी पांढरीशुभ्र की, पृथ्वीवरील कोणालाही तेवढी पांढरीशुभ्र काढता आली नसती.

### तो प्रार्थना करीत असताना येशू मध्ये काय बदल झाला?

त्याचे तोंड सूर्यासारखे तेजस्वी झाले आणि त्याची वस्त्रे प्रकाशासारखी पांढरी शुभ्र झाली.

---

## 36:03

तेंव्हा मोशे व एलीया हे संदेष्टे त्यांच्या दृष्टीस पडले.ही माणसे शेकडो वर्षांपूर्वी ह्या पृथ्वीवर होऊन गेली होती.ते येशूच्या मृत्युविषयी त्याच्याशी बोलत होते, जे यरुशलेममध्ये घडणार ङोते.

### येशू सोबत कोण दोन माणसे प्रकट झाली होती?

मोशे व संदेष्टा एलीया.

### एलीया व मोशे येशू सोबत दिसले हे विलक्षण का होते?

या आधी शेकडो वर्षापूर्वी ते होउन गेले.

### मोशे व एलीया येशू विषयी काय चर्चा करत होते?

ते येशूच्या मृत्यू बद्दल बोलत होते.

### येशू मरण्यासाठी कोठे जात होता?

यरुशलेम.

---

## 36:04

जेंव्हा मोशे व एलीया येशूबरोबर बोलत होते, पेत्र येशूला म्हणाला, “इथे असणे आम्हाला बरे आहे.येथे आपण तीन मंडप बनवू, एक आपणासाठी, एक मोशेसाठी, व एक एलीयासाठी.” पेत्र काय बोलत होता त्याचे त्याला समजत नव्हते.

### पेत्राने अन्य शिष्यांना येशू, मोशे व एलीयासाठी करण्यास काय सूचवले?

तो तीन मंडप घालणार होता एक येशूसाठी, एक मोशेसाठी, आणि एक एलीयासाठी.

---

## 36:05

पेत्र बोलत असतानाच, एका तेजस्वी मेघाने येऊन त्यांना वेढिले व मेघातून अशी वाणी झाली की, ‘‘हा माझा पुत्र आहे याच्यावर मी प्रीती करतो.मी याजविषयी मी संतुष्ट आहे.त्याचे तुम्ही ऐका’’ते तिन्ही शिष्य खूप भयभित झाले व भूमिवर खाली पडले.

### तेजस्वी ढगातील आवाज शिष्यांना काय म्हणला?

"हा माझा पुत्र ज्याच्यावर मी प्रेम करतो. मी त्याच्याविषयी संतुष्ट आहे. त्याचे ऐका. "

---

## 36:06

तेंव्हा येशूने त्यांना स्पर्श करुन म्हटले, ‘‘भिऊ नका.चला उठा.’’जेंव्हा त्यांनी सभोवताली पाहिले, तेंव्हा तेथे फक्त येशूच होता.

---

## 36:07

येशू आणि ते तीन शिष्य पुन्हा डोंगरावरुन खाली उतरले.तेंव्हा येशू त्यांना म्हणाला की, इथे जे घडले त्याविषयी कोणाला काही सांगू नका.मी लवकरच मरेल व पुन्हा जिवंत होईल.त्यानंतर तुम्ही याविषयी लोकांना सांगू शकता.''

### त्यांनी जे काही पाहिले होते त्याविषयी येशूने शिष्यांना काय करण्यास सांगितले?

तो मरण पावून आणि जीवनात परत येई पर्यंत डोंगरावर काय घडले हे कोणालाही सांगू नका असे त्यांना त्याने सांगितले.

# येशू लाजारास जिवंत करितो

## 37:01

एके दिवशी, लाजर खूप आजारी असल्याची बातमी येशूला कळलीलाजर व त्याच्या दोन बहिणी मरीया व मार्था हे येशूचे जवळचे मित्र होते.जेव्हा येशूने ही बातमी ऐकली तेंव्हा तो म्हणाला, ''हा आजार मरणासाठी नाही, तर हा आजार देवाच्या गौरवासाठी आहे.''येशू आपल्या मित्रांवर प्रीती करत होता, परंतू तो होता त्या ठिकाणी आणखी दोन दिवस राहिला.

### लाजराच्या आजारपणाचा शेवटी परिणामा बद्दल येशू काय म्हणाला?

ते देवाच्या गौरवासाठी होईल.

### लाजराच्या आजार बद्दल ऐकल्यानंतर येशूने काय केले?

तो आणखी दोन दिवस जेथे होता तेथेच राहीला.

---

## 37:02

दोन दिवसानंतर, येशू आपल्या शिष्यांना म्हणाला,''आपण पुन्हा यहूदीयामध्ये जाऊ''. ''परंतू गुरुजी '' शिष्यांनी उत्तर दिले, ''थोडया वेळापूर्वीच तेथील लोक आपणास मारावयास टपले होते!''येशू म्हणाला, ''आपला मित्र लाजर हा झोपला आहे, मी त्याला उठवणे अगत्याचे आहे.''

### येशूने यहूदीयात जाण्याचा निर्णय घेतला तेव्हा शिष्य चिंतीत का होते?

कारण तेथे लोक त्याला ठार मारण्याचा प्रयत्नात होते.

---

## 37:03

येशूच्या शिष्यांनी उत्तर दिले, ''प्रभुजी, जर लाजर झोपलेला आहे तर तो बरा होईल.''तेंव्हा येशूने त्यांना स्पष्ट शब्दांत सांगितले, ''लाजर मेला आहे.आणि मी तेथे नव्हतो म्हणून मला आनंद वाटतो, यासाठी की तुम्ही मजवर विश्वास ठेवाल.''

### लाजर झोपी गेला आहे असे येशूने सांगितले तेव्हा शिष्यांनी काय विचार केला?

त्यांना असे वाटले की तो फक्त झोपला आहे आणि तो बरा होईल.

### येशूने शिष्यांना लाजरा बद्दल स्पष्ट काय सांगितले?

येशूने त्यांना लाजर मेला आहे असे सांगितले.

### लाजर मेला तेव्हा तो तेथे नव्हता म्हणुन येशूला आनंद का झाला?

कारण काहीतरी होईल ज्यामुळे शिष्य येशूवर विश्वास ठेवतील.

---

## 37:04

जेंव्हा येशू लाजर राहत असलेल्या गावी आला, तेंव्हा लाजर मरुन चार दिवस झाले होते.मार्था येशूला भेटण्यासाठी बाहेर गेली आणि म्हणाली, ‘‘प्रभुजी, जर आपण इथे असता, तर माझा भाऊ मेला नसता.परंतु माझा विश्वास आहे की आपण जे काही देवाजवळ मागाल, ते देव देईल.

### येशू लाजराला बरे करेल असा मार्थाचा विश्वास होता का?

होय.

### लाजर मरुन किती काळ झाला होते?

त्याला मरुन चार दिवस झाले होते.

---

## 37:05

येशू म्हणाला, ‘‘पुनरुत्थान व जीवन मीच आहे.माझ्यावर विश्वास ठेवणारा मेला असला तरी जगेल.आणि जो मजवर विश्वास ठेवितो तो कधीही मरणार नाही.याजवर तू विश्वास ठेवतेस काय?’’मार्थाने उत्तर दिले, ‘‘होय,प्रभुजी!आपण देवाचे पुत्र मशीहा आहात असा मी विश्वास धरिते’’

### येशू पुनरुत्थान आणि जीवन आहे यामुळे विश्वासींना काय होईल?

जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवेल तो मेला तरी जगेल, आणि प्रत्येकजण जण जो त्याच्यावर विश्वास ठेवील तो कधीच मरणार नाही.

### मार्थाचा येशू कोण आहे असा विश्वास होता?

ख्रिस्त, देवाचा पुत्र.

---

## 37:06

तेंव्हा मरीया तेथे आली.ती येशूच्या पाया पडली आणि म्हणाली, ''प्रभुजी, तुम्ही येथे असता, तर माझा भाऊ मेला नसता.''येशूने त्यांना विचारले, ''तुम्ही लाजारला कोठे ठेविले आहे?''त्यांनी म्हटले ,''कबरेमध्ये.या आणि पाहा.''तेंव्हा येशू रडला.

---

## 37:07

ती खडकामध्ये खोदलेली कबर होती व तिच्या दाराशी धोंडा ठेवण्यात आला होता.कबरेपाशी येऊन येशू त्यांना म्हणाला, ''धोंडा बाजूला सारा.''परंतू मार्था म्हणाली, ''त्याला मरुन चार दिवस झाले आहेत.आता त्याला दुर्गंधी येत असेल.''

### लाजर मरुन किती काळ झाला होते?

त्याला मरुन चार दिवस झाले होते.

---

## 37:08

येशूने उत्तर दिले, ''तू विश्वास ठेवशील तर देवाचे गौरव पाहशील असे मी तुला सांगितले नव्हते काय?''मग त्यांनी ती धोंड काढली.

---

## 37:09

तेव्हा येशूने वर स्वर्गाकडे पाहून म्हटले, ''बापा, तू माझे ऐकले म्हणून मी तुझे आभार मानतो.मला ठाऊक आहे, की तू सर्वदा माझे ऐकतोस, परंतू जो लोकसमुदाय सभोवती उभा आहे त्यांच्याकरिता मी बोललो, हयासाठी की तू मला पाठविले आहे असा ते विश्वास धरतील.''मग येशूने मोठयाने हाक मारली, ''लाजरा, बाहेर ये!''

### येशूने मोठ्याने पित्याचे आभार का मानले?

त्याने हे असे केले कारण लोकांनी विश्वास ठेवावा की त्याला पित्याने पाठवले आहे.

### येशूने लाजरला काय आज्ञा केली?

त्याने लाजरला कबरेच्या बाहेर ये अशी आज्ञा केली!

---

## 37:10

तेव्हा लाजर चालत बाहेर आला!त्याचे हातपाय प्रेतवस्त्रांनी बांधलेले होते.येशूने त्यांना सांगितले, ‘‘ प्रेतवस्त्रे काढुन टाकण्यासाठी त्याला मदत करा व त्याला मोकळे करा! ’’हा चमत्कार पाहून अनेक यहूद्यांनी येशूवर विश्वास ठेविला.

---

## 37:11

परंतु यहूद्यांचे धार्मिक पुढारी येशूचा द्वेष करु लागले, व येशू आणि लाजर यांना जीवे मारण्यासाठी योजना आखू लागले.

### ते चमत्कार पाहिले तेव्हा यहूदी धार्मिक नेतायांची प्रतिक्रिया काय होती?

ते द्वेश करु लागले आणि येशू व लाजरला ठार मारण्याचा कट करु लागले.

# येशूला विश्वासघाताने धरुन देण्यात येते

## 38:01

दरवर्षी, यहूदी वल्हांडण सण साजरा करत असत.देवाने मिसर देशातील गुलामगिरीतून शेकडोवर्षापुर्वी त्यांच्या पुर्वजांची कशी सुटका केली, याचा आनंद साजरा करण्यासाठी यहूदी लोक हा सण पाळत.येशूच्या प्रचारकार्यास उघडपणे आरंभ झाल्यानंतर सुमारे तीन वर्षांनी येशूने आपल्या शिष्यांस सांगितले की यरुशलेममध्ये त्यांजबरोबर वल्हांडण साजरा करावा अशी त्याची इच्छा आहे, आणि त्यानंतर तो तेथे मारला जाणार आहे असेही त्याने सांगितले.

### यहूदी दरवर्षी वल्हांडण सण साजरा करतात याचा अर्थ काय होतो?

देवाने यहूदीयांच्या पूर्वजांना मिसरच्या गुलामगिरीतून सोडवले म्हणून वल्हांडण सण साजरा केला जातो.

---

## 38:02

येशूच्या शिष्यांपैकी यहूदा नावाचा एक शिष्य होता.यहूदा हा प्रेषितांच्या पैशाची थैली सांभाळणारा खजिनदार होता, पण तो पैशाचा लोभी असल्यामुळे अनेकदा त्यातून पैसे चोरत असे.येशू आणि शिष्य यरुशलेममध्ये आल्यानंतर, यहूदा धार्मिक पुढा-यांना जाऊन भेटतो व पैशांच्या मोबदल्यात येशूला पकडून देण्याविषयी बोलतो. त्याला ठाऊक होते की यहूदी पुढारी येशू हा मशीहा आहे हे नाकारत होते व त्यास मारण्याचा कट रचत होते.

### येशूचा विश्वासघात करण्याबद्दल यहूदा काय इच्छिता होता?

त्याला या कामाचे पैसे हवे होते.

---

## 38:03

तेंव्हा महायाजक व यहूदी पुढा-यांनी मिळून, येशूचा विश्वासघात करण्यासाठी यहूदाला चांदीची तीस नाणी दिले.संदेष्ट्यांनी सांगितलेली भविष्यवाणी पूर्ण होण्यासाठी हे सर्व काही झाले.यहूदा त्यांच्याशी सहमत झाला, व पैसे घेऊन गेला.तेंव्हापासून तो येशूला धरुन देण्याची वाट पाहू लागला.

### येशूला विश्वासघाताने धरून देण्यासाठी यहूदी नेत्यांनी यहुदाला कीती पासे दीली?

त्यांनी त्याला चांदीची 30 नाणी दिली.

---

## 38:04

यरुशलेमध्ये, येशूने आपल्या शिष्यांसह वल्हांडण सण साजरा केला.वल्हांडण भोजना दरम्यान येशूने भाकर घेऊन ती मोडिली. व तो म्हणाला, ''घ्या आणि खा.''हे माझे शरीर आहे, ते तुम्हासाठी दिले जात आहे.माझ्या आठवणीसाठी हे करा.''त्याचप्रकारे, येशूने म्हटले की त्याचे शरीर त्यांच्यासाठी बलिदान म्हणून देण्यात येईल.

### वल्हांडण सणाच्या वेळी येशूने भाकरी विषयी काय म्हणाला?

तो म्हणाला, "हे माझे शरीर आहे, तुम्हांसाठी दिले जात आहे."

---

## 38:05

मग येशूने एक प्याला घेऊन म्हटले, '' ह्यातुन प्या.हा माझे नव्या कराराचे रक्त आहे. ते अनेकांच्या पापक्षमेसाठी ओतले जात आहे.जेंव्हा तुम्ही हे पिता, तेंव्हा हे माझ्या आठवणीसाठी हे करा.''

### येशू प्याल्या विषयी काय म्हणाला?

तो म्हणाला, "हे माझे नवीन कराराचे रक्त आहे जे पाप क्षमेसाठी ओतले जात आहे."

---

## 38:06

मग येशू शिष्यांना म्हणाला, ''तुम्हापैकी एक माझा विश्वासघात करील.''तेंव्हा त्यांना धक्का बसला आणि ते विचारु लागले की अशी गोष्ट कोण करील.येशू म्हणला, ''ज्याला मी ही भाकर मोडून देईल, तोच माझा विश्वासघात करील.''मग त्याने यहूदास ती भाकर मोडून दिली.

### येशू कडून भाकर घेतल्यानंतर यहूदाला काय झाले?

यहूदामध्ये सैतान आला.

---

## 38:07

यहूदाने भाकर घेतल्याबरोबर, सैतानाने त्याच्यामध्ये प्रवेश केला.मग येशूला पकडून देण्यासाठी यहूदा तेथून निघून यहूदी पुढा-यांना मदत करण्यासाठी गेला.तो रात्रीचा समय होता.

### येशू कडून भाकर घेतल्यानंतर यहूदाला काय झाले?

यहूदामध्ये सैतान आला.

---

## 38:08

भोजनानंतर, येशू आपल्या शिष्यांसोबत जैतुनाच्या डोंगराकडे गेला.येशू म्हणाला, ‘‘आज रात्री तुम्ही सर्व मला सोडून जाल.असे लिहिले आहे की, मी मेंढपाळास मारीन व मेंढरांची दाणादाण करीन.’’

### त्या रात्री शिष्य काय करतील या विषयी येशू काय अंदाज सागितला?

ते सर्व येशूला सोडून जातील.

---

## 38:09

पेत्राने उत्तर दिले, ‘‘जरी सर्वांनी तुला सोडिले, तरी मी तुला सोडणार नाही!’’तेंव्हा येशू पेत्रास म्हणाला, ‘‘सैतानाने तुम्हा सर्वांचा नाश करायचे ठरविले आहे, परंतू मी तुम्हासाठी प्रार्थना केली आहे, पेत्रा, अशासाठी की तुमचा विश्वास डळमळू नये.तरीदेखिल आज रात्री, कोबडा आरवण्यापूर्वी तू मला तीन वेळा नाकारशील.’’

### कोंबडा आरवण्या पूर्वी पेत्र काय करणार याविषयी येशू काय म्हणाला?

तो येशूला ओळखतो हे पेत्र तीन वेळा नाकारेल.

---

## 38:10

तेव्हा पेत्र येशूला म्हणाला, ‘‘मला मरावे जरी लागले, तरी मी तुला नाकारणार नाही!’’बाकीच्या शिष्यांनीही तसेच म्हटले.

### येशूच्या अंदाजाला शिष्यांनी कसा प्रतिसाद दिला?

ते म्हणाले येशूला नाकारण्या ऐवजी मरण पत्करू.

---

## 38:11

मग येशू आपल्या शिष्यांना घेऊन गेथशेमाने म्हटलेल्या ठिकाणी गेला.शिष्यांनी परिक्षेत पडू नये म्हणून येशूने त्यांना प्रार्थना करावयास सांगितले.मग येशू स्वत: प्रार्थना करावयास गेला.

---

## 38:12

येशूने तीन वेळा प्रार्थना केली ,''हे पित्या, जर शक्य असेल, तर हा दु:खसहनाचा प्याला माझ्यापासून दूर कर.परंतु लोकांच्या पापक्षमेसाठी दुसरा मार्गच नसेल, तर तुझी इच्छा पूर्ण होवो.''येशू खूप व्याकूळ झाला व त्याचा घाम रक्ताच्या थेंबासारखा झाला.देवाने एक देवदूत पाठवून त्यास सामर्थ्य दिले.

### गेथशेमाने येथे येशू त्याच्या पित्याला काय प्रार्थना केली?

त्याने त्याच्या पित्याला विचारले शक्य असेल तर हा प्याला माझ्या पासून दूर कर, परंतू लोकांच्या पापांची क्षमा करण्यास अजून इतर मार्ग नसेल तर तूझ्या इच्छेप्रमाणे होवो.

---

## 38:13

प्रार्थना संपवून प्रत्येक वेळी येशू शिष्यांकडे आलेला असता शिष्य झोपलेल्या अवस्थेत त्याला आढळले.जेंव्हा तो तिस-यांदा परतला तेंव्हा येशू म्हणाला, ''उठा!''माझा विश्वासघात करणारे आला आहे.''

### येशू प्रार्थना करीत असताना शिष्य काय करीत होते?

ते झोपलेले होते.

---

## 38:14

यहूदा धार्मिक पुढारी, सैनिक व एका मोठया लोकसमुदायाबरोबर आला.त्यांनी आपणाबरोबर तलवारी व सोटे आणले होते.यहूदा येशूजवळ येऊन म्हणाला, ‘‘सलाम, गुरुजी,’’ आणि त्याने त्याचे चुंबन घेतले.कोणाला पकडावे हे यहूदी धर्मपुढा-यांना समजण्यासाठे हे एक चिन्ह होते.तेंव्हा येशू म्हणाला, ‘‘यहूदा, माझे चुंबन घेऊन माझा विश्वासघात करीत आहेस काय?’’

### येशू कोण व्यक्ती आहे हे शिपायांना कसे माहीत होते?

येशूला अटक करण्यासाठी त्यांना एक चिन्ह म्हणून यहूदाने येशूचे चुंबन घेतले.

---

## 38:15

सैनिक येशूला पकडत असतांना, पेत्राने आपली तलवार काढली व महायाजकाच्या सेवकाचा कान कापला.येशू म्हणाला,‘‘तलवार बाजुला ठेव!मी पित्यास माझ्या बचावासाठी देवदूतांचे सैन्य मागू शकतो.परंतू मला पित्याची आज्ञा पाळणे आवश्यक आहे”.मग येशूने त्या मनुष्याचा कान बरा केला.येशूला अटक झाल्यानंतर, सर्व शिष्य पळून गेले.

### येशूचे रक्षण करण्यासाठी पेत्राने काय केले?

पेत्राने तलवार बाहेर काढली आणि मुख्य याजकाच्या सेवकाचा कान कापला.

### त्याचे संरक्षण करण्याची पेत्राची गरज नव्हती असे येशूने का म्हटले?

येशू पित्याला विचारून देवदूतांचे सैन्य मागू शकतो.

### येशूला अटक करण्यात आल्यानंतर शिष्यांनी काय केले?

ते सर्व येशूला सोडून पळून गेले.

# येशूची चौकशी

## 39:01

हा मध्यरात्रीचा समय होता.सैनिकांनी येशूची चौकशी करण्यासाठी त्याला महायाजकाच्या घरी घेऊन गेले.पेत्र लांबूनच त्यांच्या पाठीमागे येत होता.ते जेंव्हा येशूला आत घरामध्ये घेऊन गेले, तेंव्हा पेत्र बाहेर थंडी असल्यामुळे शेकत बसला होता.

### यहूदी पुढारी येशूला जेव्हा प्रश्न विचारू लागले, तेव्हा दिवसाची कोणती वेळ होती?

ती मध्यरात्री होती.

---

## 39:02

आत घरामध्ये, यहूदी धर्मपुढारी येशूची चौकशी करीत होते.त्यांनी येशूविरुद्ध अनेक खोटे साक्षीदार आणले होते.तथापि, त्यांच्या जबानीमध्ये मेळ नव्हता म्हणुन यहूदी पुढा-यांना येशूचा गुन्हा सिद्ध करता आला नाही.या समयी येशू काहीच बोलला नाही.

### येशू हा अपराधी आहे असे यहूदी नेते का सिद्ध करू शकले नाही?

कारण खोटे साक्षीदारांचे जबाब एकमेकांशी सहमत नव्हते.

---

## 39:03

शेवटी, महायाजकाने येशूकडे पाहून विचारले, ‘‘आम्हास सांग, की तू मशीहा, जिवंत देवाचा पुत्र आहेस?’’

### मुख्य याजक येशूला शेवटी कोणता प्रश्न विचारते?

"आम्हांला सांग, तू ख्रिस्त, जिवंत देवाचा पुत्र आहेस का?"

---

## 39:04

येशू म्हणाला, ‘‘ मी आहे, आणि तुम्ही मला पित्याच्या बाजूस बसलेला व स्वर्गातून येत असतांना पाहाल.’’तेंव्हा महायाजकाने रागाने आपली वस्त्रे फाडिली व अन्य धार्मीक पुढा-यांसमोर मोठयाने म्हणाला, ‘‘आता आम्हास आणखी पुराव्याची गरज नाही!तो देवाचा पुत्र आहे असे त्याने म्हटले हे तुम्ही स्वत: ऐकले आहे.तुमचा निवाडा काय आहे?’’

### येशूकडून मुख्य याजकाला काय उत्तर मिळाले?

"मी आहे, आणि तू मला स्वर्गातून येताना देवा बरोबर बसलेला असा पाहशील."

### येशूने कोणता गुन्हा केला आहे असे मुख्य याजक म्हणत होता?

येशू म्हणाला तो देवाचा पुत्र आहे.

---

## 39:05

सर्व यहूदी पुढा-यांनी महायाजकास उत्तर दिले, ‘‘तो मरणदंडास पात्र आहे!’’मग त्यांनी येशूच्या डोळयांवर पट्टी बांधली, त्याच्या तोंडावर थुंकले, त्यास मारिले व त्याची थट्टा उडविली.

---

## 39:06

पेत्र घराबाहेर वाट पहात होता, तेंव्हा घरकाम करणा-या एका मुलीने त्यास म्हटले, ‘‘तूही येशूबरोबर होतास!’’पेत्राने नकार दिला.नंतर, दुस-या एका मुलीने असेच म्हटले, आणि पेत्राने पुन्हा एकदा नकार दिला.शेवटी, लोक म्हणाले, ‘‘आम्हास ठाऊक आहे की तू येशूबरोबर होतास कारण तुम्ही दोघेही गालील प्रदेशातील आहात.

### पेत्र येशूच्या चौकशी दरम्यान कोठे होता?

पेत्र मुख्य याजकाच्या घरा बाहेर वाट पाहत होता.

### पेत्र येशू बरोबर होता अले लोकांला का वाटले?

पेत्र व येशू दोघेही गालीलातील होते.

---

## 39:07

तेंव्हा पेत्राने शपथ घेऊन म्हटले, ‘जर मी हया मनुष्यास ओळखत असेल तर देव मला शापित करो!’’लगेच, कोबडा आरवला, आणि येशूने मागे वळून पेत्राकडे पाहिले.

### तू येशूला ओळखतोस असे लोकांनी विचारले असता, पेत्र काय म्हणला?

पेत्र येशूला ओळखतो हे तीन वेळा नाकारले. मी त्या माणसाला मुळीच ओळखत नाही.

### पेत्राने येशूला तिसऱ्या वेळी नाकारल्यानंतर लगेच काय झाले?

तेव्हा पेत्राला येशूचे शब्द आठवले, कोंबडा आरवण्यापूर्वी तीन वेळा तू मला नाकारशील.

---

## 39:08

तेंव्हा पेत्र दूर जाऊन खूप रडला.दरम्यान, येशूस धरुन देणा-या यहूदाने पाहिले की, यहूदी धर्मपुढा-यांनी येशूला मरणदंडाची शिक्षा दिली आहे.तेंव्हा यहूदास असे केल्याचा पस्तावा झाला व त्याने जाऊन आत्महत्या केली.

### यहूदी पुढा-यांनी येशूला दोषी ठरविले हे पाहिले तेव्हा यहूदाने काय केले?

यहूदा दु: खी झाला आणि दूर गेला आणि स्वत:ला ठार मारले. त्याने पैसे फेकून दिले व बाहेर येवून गळफास घेतला.

---

## 39:09

दुस-या दिवशी सकाळीच, यहूदी पुढा-यांनी येशूला रोमी सुभेदार पिलातासमोर आणले.त्यांना आशा होती की पिलात येशूस दोषी ठरवून मरणदंडाची शिक्षा देईल.पिलाताने येशूला विचारले, ‘‘तू यहूद्यांचा राजा आहेस काय?’’

### यहूदी पुढा-यांनी येशूला रोमन राज्यपाल पिलाताच्या कडे का नेले होते?

त्यांना वाटले पिलात येशूला दोषी ठरवील आणि त्याला ठार मारण्याची शिक्षा सुनावेल.

### पिलाताने येशूला पहिला प्रश्न काय विचारला होता?

"तू यहूद्यांचा राजा आहेस काय?"

---

## 39:10

येशूने उत्तर दिले, ‘‘तू असे म्हणतोस परंतू माझे राज्य हया पृथ्वीचे नाही.असे असते तर, माझे सेवक माझ्यासाठी लढले असते.मी या पृथ्वीवर देवाविषयीचे सत्य सांगण्यास आलो आहे.सत्यावर प्रेम करणारा प्रत्येक जण माझे ऐकतो’’ पिलाताने विचारले, ‘‘सत्य काय आहे?’’

### येशूने तो पृथ्वीवर का आला याचे कारण काय सांगितले?

देवा विषयीचे सत्य सांगण्यासाठी आणि बहूत लोकांच्या पापांची क्षमा व्हावी व त्यांना तारण प्राप्त व्हावे ही पित्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी.

---

## 39:11

येशूबरोबर बोलल्यानंतर पिलात बाहेर असलेल्या जमावास म्हणाला, ‘‘मला या मनुष्यामध्ये काहीच दोष आढळत नाही.’’परन्तु यहूदी पुढारी व लोकसमुदाय मोठयाने ओरडले, ‘‘त्याला वधस्तंभावर खिळून टाका!’’यावर पिलात उत्तरला, ‘‘तो निर्दोष आहे!’’पण ते आणखी मोठयाने ओरडू लागले.तेंव्हा पिलात तिस-यांदा म्हणाला, ‘‘तो निरपराध आहे.’’

### येशू दोषी नाही हे पिलाताने जमलेल्या गर्दी सकिती वेळा सांगितले?

तीन वेळा.

---

## 39:12

जमाव आपल्या विरुध्द बंड पुकारील अशी पिलातास भिती वाटली व त्याने आपल्या सैनिकांस येशूला वधस्तंभावर खिळण्याची आज्ञा दिली.रोमी सैनिकांनी येशूला फटके मारले, त्याच्या अंगावर एक राजकीय झगा घातला व डोक्यावर काटयांचा मुकुट ठेवला.मग ते त्याची थट्टा करु लागले, ‘‘पहा, हा यहूद्यांचा राजा!’’

### मग पिलाताने येशूला वधस्तंभावर खिळून मारावे अशी परवानगी का दिली?

पिलाताला वाटले गर्दीत दंगा सुरू होईल, म्हणुन तो भयभीत झाला होता.

### रोमन सैनिकांनी येशूशी कसा व्यवहार केला?

त्यांनी येशूला चाबकाचे फटके मारले, त्याचे कपडे फाडले, त्याच्या तोंडावर थूंकले आणि त्याला काट्यांचा एक मुकुट घातला, त्याची थट्टा केली.

# येशूला वधस्तंभावर खिळतात

## 40:01

सैनिकांनी येशूची थट्टा उडविल्यानंतर, ते त्यास वधस्तंभावर खिळे ठोकून मारण्यासाठी घेऊन गेले.ज्या वधस्तंभावर त्यास मारावयाचे होते तो वधस्तंभ त्यांनी त्याच्या खांद्यावर दिला.

### शिपायांनी येशूला वधस्तंभावर खिळून मारण्यासाठी घेऊन जात असताना, त्यांनी त्याला काय वाहयाला लावले?

तो ज्या वधस्तंभावर मरणार होता, तो त्याला वाहून न्यायाला लावला.

---

## 40:02

तेंव्हा ‘‘कवटी’’ नाव असलेल्या ठिकाणी ते त्याला घेऊन आले आणि त्यांनी येशूच्या हातामध्ये व पायामध्ये खिळे ठोकले.परंतू येशू म्हणाला, ‘‘हे पित्या, यांना क्षमा कर, कारण ते काय करतात ते त्यांना कळत नाही.’’पिलाताने त्यांना आज्ञा दिली की त्यांनी ‘‘यहूद्यांचा राजा’’ अशी लिहिलेली पाटी वधस्तंभाच्या वर येशूच्या डोक्यावर लावावी.

### जेथे येशूला वधस्तंभावर देण्यात आले त्या ठिकाणाचे नाव काय होते?

कवटी.

### सैनिकोनी येशूला वधस्तंभावर कसे जोडले?

त्यांनी वधस्तंभावर त्याच्या हाता पायात खिळे ठोकले.

### त्याला वधस्तंभावर खिळले होते तेव्हा लोकांबद्दल येशूने काय प्रार्थना केली?

"हे बापा, त्यांना क्षमा कर, कारण ते काय करत आहेत हे त्यांना माहीत नाही."

### येशूच्या मस्तकावरील पाटीवर काय लिहिले होते?

हा येशू,यहूद्यांचा राजा आहे.

---

## 40:03

येशूचे वस्त्र वाटून घेण्यासाठी सैनिकांनी चिठ्ठया टाकल्या.जेंव्हा त्यांनी हे केले, त्यावेळी ही भविष्यवाणी पूर्ण झाली, '' त्यांनी माझे वस्त्रे आपसात वाटून घेण्यासाठी चिठ्ठया टाकल्या.''

### येशूचे कपडे शिपायांनी कसे विभाजीत केले?

भविष्यवाणीत सांगितल्या प्रमाणे त्यांनी त्याच्या कपड्यासाठी चिठ्ठया टाकल्या.

---

## 40:04

येशूला दोन लुटारुंच्या मधोमध वधस्तंभावर खिळण्यात आले.त्यापैकी एकाने येशूची थट्टा केली, परंतू दुसरा म्हणाला,''तू देवाला भित नाही काय?आपण दोषी आहोत, पण हा मनुष्य निर्दोष आहे.''तेंव्हा तो येशूला म्हणाला, ''तुझ्या राज्यामध्ये माझी आठवण ठेव.''येशू त्यास म्हणाला, ''आजच, तू मजबरोबर सुखलोकात असशील.''

### ज्या लुटारुने येशूची थट्टा केली नाही त्याने त्याला काय करण्यास सांगितले?

त्याने येशूला विनंती केली की त्याच्या राज्यात त्याची आठवण ठेव.

### दरोडेखोराच्या विनंतीला येशूने काय उत्तर दिले?

" खचित, आज तु मजबरोबर सुखलोकात असशील."

---

## 40:05

यहूदी पुढारी व जमावातील इतर लोकांनीही येशूची थट्टा केली.ते त्यास म्हणाले, ''जर तू देवाचा पुत्र आहेस तर वधस्तंभावरुन खाली उतरुन ये व स्वत:चा बचाव कर!म्हणजे आम्ही तुझ्यावर विश्वास ठेवू.''

### येशू हा देवाचा पुत्र होता हे सिद्ध करण्यासाठी काय करावे अशी जमावाची इच्छा होती?

त्याने वधस्तंभावरून खाली यावे आणि स्वत: ला वाचवावे.

---

## 40:06

तेंव्हा भर दुपारी देशभर आकाशामध्ये काळोख निर्माण झाला. दुपारपासून तीन वाजेपर्यंत पृथ्वीवर काळोख होता.

### दिवसाच्या मध्यभागी आकाशात काय असामान्य गोष्ट घडली?

भर दुपारी सर्व पृथ्वीवर पूर्णपणे अंधार पसरला.

---

## 40:07

तेंव्हा येशू मोठयाने म्हणाला, ‘‘पूर्ण झाले!हे पित्या, मी माझा आत्मा तुझ्या हाती सोपवितो.’’तेंव्हा त्याने आपले डोके लेववून प्राण सोडिला.जेंव्हा येशू मरण पावला तेंव्हा मोठा भूकंप झाला आणि मंदिरातील पडदा वरपासून खालपर्यंत फाटून दुभागला.

### वधस्तंभावर येशूचे शेवटचे शब्द काय होते?

"हे पित्या, मी आपला आत्मा तूझ्या हातांत सोपवून देत आहे. "

### येशूच्या मृत्यूनंतर केणती विलक्षण गोष्ट लगेच झाली?

भूकंप झाला व मंदिराच्या पवित्रस्थानातील पडदा वरच्या टोकापासून खालपर्यंत मधोमध फाटला, मोठ्या पडद्याचे दोन भाग झाले.

---

## 40:08

आपल्या मृत्यूद्वारे, येशूने लोकांसाठी देवाकडे जाण्याचा मार्ग खुला करुन दिला.येशूवर पहारा करत असलेल्या सैनिकाने हे सर्व पाहून उद्गारला, ‘‘खरोखर, हा मनुष्य निष्पाप होता.तो देवाचा पुत्र होता.’’

### त्याच्या मृत्यूच्या माध्यमातून येशूने काय साध्य केले?

येशूने लोकांसाठी देवाकडे येण्याचा मार्ग उघडला.

---

## 40:09

तेंव्हा योसेफ आणि निकदेम हे दोघे यहूदी पुढारी ज्यांनी येशू हा मशीहा आहे असा विश्वास ठेविला होता, पिलाताकडे जाऊन येशूचे शरीर मागितले.त्यांनी त्याचे शरीर वस्त्रात गुंडाळून खडकामध्ये खोदलेल्या एका कबरेमध्ये ठेवले.मग त्यांनी त्या कबरेच्या दाराशी एक मोठी धोंड उभी करुन कबरेचे दार बंद केले.

### पिलाताकडे येशूच्या शरीराची मागणी कोणी केली?

योसेफ व निकदेम.

### त्या शरीराचे काय केले?

ते शरीर कापडात गुंडाळले व खडकात खोदलेल्या कबरेत ठेवले, आणि नंतर कबरेच्या समोर एक मोठा दगड ठेवला.

# देव येशूला मेलेल्यातून उठवितो

## 41:01

सैनिकांनी येशूला वधस्तंभावर खिळल्यानंतर, विश्वास न ठेवणा-या यहूदी पुढा-यांनी पिलातास म्हटले, "तो खोटारडा, येशू म्हणाला होता की तो तीन दिवसांनंतर पुन्हा उठेन.कोणीतरी त्या कबरेवर पहारा ठेवणे अगत्याचे आहे, नाहीतर त्याचे शिष्य त्याचे शरीर चोरून नेतील व तो उठला आहे असे म्हणतील."

### येशु ख्रिस्ताने त्याच्या मृत्युनंतर तीन दिवसानंतर काय होणार होतो म्हणुन सांगितले?

तो मरणातून पुनरुत्थित होणार होता.

### यहुदी लोक येशु ख्रिस्ताचे मरण व पुनरुस्थानाबद्दल काय विचार करत होते?

त्यांना वाटत होते की तो खोटे बोलत आहे.

### यहुदी पुढाऱ्यांना काय भिती वाटली आणि शिष्य असे काय करणार होते?

त्यांना वाटले की, शिष्य येशूचे शरीर चोरून नेतील व म्हणतील तो मृत्यूंतून जिवंत झाला आहे.

---

## 41:02

पिलात म्हणाला, "काही सैनिकांना घ्या व त्या कबरेभोवती तुमच्याने होईल तितका चांगला बंदोबस्त ठेवा."तेव्हा त्यांनी त्या कबरेच्या तोंडावरच्या धोंडीवरती शिक्कामोर्तब केले व तेथे सैनिकांना ठेवले यासाठी की कोणी येशूचे शरीर चोरू नये.

### यहुदी पुढाऱ्यांनी येशूची कबर सुरक्षित असावी म्हणून काय केले?

त्यांनी त्या कबरेवर शिपायांना पहारा देण्यास सांगितले व मोठ्या दगडाने ती बंद केली आणि शिक्का लावून ती बंद केली.

---

## 41:03

येशूला कबरेत ठेवल्यानंतरचा दुसरा दिवस हा शब्बाथ दिवस होता, त्या दिवशी यहूद्यांना कबरेकडे जाण्याची मनाई होती.तेव्हा शब्बाथाच्या दुस-या दिवशी पहाटेच, काही स्त्रिया सुगंधी द्रव्ये घेऊन कबरेवर गेल्या त्यांनी ती त्याच्या उत्तरक्रियेसाठी तयार केली होती.

### स्त्रिया येशूच्या केव्हा कबरेकडे गेल्या?

शब्बाथ दिवसाच्या पहाटेस.

---

## 41:04

तेव्हा अचानक, एक मोठा भूकंप झाला.विजेसारखे रुप असणारा एक देवदूत स्वर्गातून प्रकट झाला.त्याने कबरेच्या तोंडाशी असलेली धोंड बाजूला सारली व त्यावर बसला.तेव्हा त्या कबरेवर पहारा करत असलेल्या सैनिकांना फार भिती वाटली व ते मेल्यासारखे जमिनीवर पडले.

### त्या तेथे पोहचल्या तेव्हा स्त्रियांसमोर अशी कोणती चमत्कारिक घटना घडली?

एका एकी जमिन जोरात हादरली व एक देवदुत कबरे जवळ आला आणि त्याने कबरेवरचा दगड बाजुला केला.

### स्वर्गदूतांना पहिल्यावर पाहारेकऱ्यांना काय झाले?

ते भयभीत झाले व जमिनीवर मृतासारखे कोसळले.

---

## 41:05

जेव्हा त्या स्त्रिया कबरेजवळ आल्या, तेव्हा देवदूत त्यांना म्हणाला, "भिऊ नका.येशू येथे नाही.त्याने सांगितल्याप्रमाणे तो मेलेल्यातून उठला आहे!पाहा, ज्या कबरेत त्याला ठेवले होते ती जागा."तेव्हा त्या स्त्रियांनी आत जाऊन जेथे येशूचे शरीर ठेवले होते, ती जागा पाहिली.त्याचे शरीर त्या ठिकाणी नव्हते!

### त्या कबरेजवळ गेल्या तेव्हा स्वर्गदूतांनी स्त्रियांना काय सांगितले?

घाबरू नका, येशू मरणातून जिवंत झाला आहे तुम्ही कबरेत येउन पहा.

---

## 41:06

तेव्हां देवदूत त्यां स्त्रियांना म्हणाला, "जा, आणि शिष्यांना सांगा, 'येशू मरणातून उठला आहे व तो तुमच्यापुढे गालीलास जात आहे.'"

### स्वर्गदूतांनी स्त्रीला शिष्यांना काय सांगण्यास सांगितले?

त्यांनी शिष्यास सांगितले कि,येशू मरणातून जिवंत झाला आहे आणि यापुढे तो गालील प्रांतात असेल.

---

## 41:07

हे ऐकून स्त्रियांना फार भिती वाटली व आनंदही झाला.त्यांनी धावत जाऊन शिष्यांनी ही आनंदाची बातमी सांगितली.

---

## 41:08

त्या स्त्रिया शिष्यांना ही बातमी सांगायला जात असतांना, येशूने त्यांना दर्शन दिले, आणि त्यांनी त्याला नमन केले.येशू म्हणाला, "भिऊ नका.जा आणि माझ्या शिष्यांना गालीलात यायला सांगा.मी त्यांना तेथे भेटेन."

### जेव्हा त्या शिष्यासोबत बोलण्यासाठी जात होत्या तेव्हा स्त्रीयांना कोण दिसले?

येशू त्यांना दिसला.

### येशुला पाहील्यावर स्त्रियांनी काय केले?

त्यांनी आराधना केली

# येशूचे स्वर्गारोहण ( येशू परत स्वर्गात जातो)

## 42:01

येशू मेलेल्यातून ज्या दिवशी उठला, त्या दिवशी त्याचे दोन शिष्य जवळच्या एका नगरामध्ये जात होते.ते चालत असतांना, येशूविषयी जे घडले होते त्याविषयी बोलत होते.त्यांनी येशू हा मसिहा आहे असा विश्वास ठेवला होता, परंतु येशूला मारण्यात आले होते.आता त्या स्त्रिया म्हणत होत्या की तो पुन्हा जिवंत झाला आहे.आता कशावर विश्वास ठेवावा हे त्यांना कळत नव्हते.

### येशू सोबत चालणारे दोन शिष्य कोणते?

ते येशुसोबत काय झालेलं त्याबद्दल ते बोलत होते.

---

## 42:02

येशू त्यांच्या जवळ आला व त्यांच्याबरोबर चालू लागला, पण त्यांनी त्याला ओळखले नाही.ते कशाविषयी बोलत होते हे त्याने त्यांना विचारले, आणि त्यांनी त्याला कांही दिवसापुर्वी येशूविषयी घडलेल्या उल्लेखनीय गोष्टी सांगितल्या.त्यांना वाटले की ते एका अनोळख्या प्रवाशाबरोबर ज्याला यरूशलेममध्ये घडलेल्या गोष्टी माहीत नाहीत त्याच्याशी बोलत आहेत.

### येशू त्यांच्या जवळ आला तेव्हा त्या दोन शिष्यांनी येशुबद्दल कोणता विचार केला?

त्यांना वाटले हा एखादा नविन व्यक्ती आहे आणि त्याला यरुशलेमेत काय घडले ते माहित नसावे.

---

## 42:03

तेव्हा येशूने त्यांना, देवाच्या वचनात मसिहाविषयी काय सांगितले आहे हे स्पष्ट करुन सांगितले.त्याने त्यांना आठवण करून दिली की संदेष्ट्यांनी सांगितले होते की मसिहा दु:ख सोशील, त्यास जीवे मारतील, पण तीस-या दिवशी तो पुन्हा उठेल.जेव्हा ते दोघे जेथे त्यांना मुक्काम करावयाचा होता तेथे पोहोचले, तेव्हा संध्याकाळ होत आली होती.

### भविष्यवक्त्यांनी मशीहा बरोबर काय होणार सांगितले?

मशीहाला ताडना होईल व त्याला मारून टाकण्यास येईल परंतु तिसऱ्या दिवशी तो पुन्हा: जिवंत होईल.

---

## 42:04

त्या दोघांनी येशूला आपल्याबरोबर मुक्काम करण्याचा आग्रह केला व तो त्यांच्याबरोबर राहण्यास आत गेला.ते संध्याकाळच्या जेवणासाठी बसलेले असतांना, येशूने भाकर घेऊन देवाचा धन्यवाद केला व ती मोडली.अचानक तो येशू आहे हे त्यांनी ओळखले.परंतु त्या समयी, येशू त्यांच्यापासून अंतर्धान पावला.

### जेव्हा दोन शिष्यांनी त्याला ओळखले तेव्हा येशूने काय केले?

त्यांने भाकरीचा तुकडा घेतला व परमेश्वराला धन्यवाद दिला.

---

## 42:05

ती दोघे एकमेकांना म्हणू लागली, "तो येशू होता!आणि म्हणूनच तो देवाचे वचन आम्हाला उलगडा करून सांगत असतांना आपले अंतःकरण आतल्याआत उकळत होते!"तेव्हा लगेच, ते यरुशलेमेस परतले.त्यांनी येऊन शिष्यांना सांगितले की, "येशू जिवंत झाला आहे!आम्ही त्यास पाहिले आहे!"

### येशू त्यांना सोडून निघून गेल्यावर त्या दोन शिष्यांनी नंतर काय केले

त्यांनी यरुशलेमेत परत जावून इतर शिष्यांना सांगितले की येशू जिवंत झाला आहे आणि आम्ही त्याला पहिले आहे.

---

## 42:06

शिष्य हे बोलत असतांनाच, येशूने त्या खोलीमध्ये स्वतःला प्रकट केले व म्हटले, "तुम्हास शांती असो!"शिष्यांना वाटले की ते भूत आहे, पण येशू म्हणाला, "तुम्ही भयभित होऊन शंका का घेता?माझ्या हाताकडे व पायाकडे पाहा.जसे मला शरीर आहे तसे भूतांना शरीर नसते."तो भूत नाही हे सिद्ध करण्यासाठी, त्याने त्यांस खाण्यासाठी काही आहे का ते विचारले.त्यांनी त्यांस शिजविलेला मासा दिला, आणि त्याने तो खाल्ला.

### कोणत्या प्रकारे येशूने शिष्यांना प्रमाणित केले की तो भुत नाही?

येशूने शिजलेल्या माश्याचा तुकडा घेतला व खाल्ला

---

## 42:07

येशू म्हणाला, "मी तुम्हास सांगितले होते की माझ्याविषयी देवाच्या वचनामध्ये लिहिलेल्या सर्व गोष्टी पूर्ण होणे अगत्याचे आहे."मग त्याने त्यांची अंतःकरणे उघडली, तेव्हा त्यांना देवाचे वचन कळले.तो म्हणाला, "अनेक वर्षांपूर्वी असे लिहिले होते की मसिहा दुःख सहन करील, त्यास मारतील व तीस-या दिवशी तो मरणातून पुन्हा उठेल.

### शिष्यांना देवाचे वचन समजण्यास का अशक्य झाले?

कारण त्यांची मने कठीन झाली होती.

---

## 42:08

"धर्मशास्त्रामध्ये हेही लिहिले होते की माझे शिष्य पापांच्या क्षमेसाठी पश्चातापाची घोषणा करतील.ते यरूशलेमेपासून ह्या संदेशास आरंभ करतील, मग सर्व ठिकाणच्या सर्व लोकांकडे हा संदेश घेऊन जातील.तुम्ही ह्या गोष्टींचे साक्षीदार आहात."

### येशूच्या शिष्यांनी कोणत्या संदेशाची घोषणा करावयाची होती?

त्यांनी क्षमा प्राप्तीसाठी प्रत्येक व्यक्तीने पश्चाताप करावा हा संदेश द्यावयाचा होता.

### येशूच्या शिष्यांनी हा संदेश कोठे द्यावयाचा होता?

त्यांनी हा संदेश सर्वप्रथम यरुशलेमेत, आणि पृथ्वीच्या भूतलावरील सर्व लोकांत गाजवायचा होता.

---

## 42:09

पुढील चाळीस दिवसांमध्ये, येशू अनेक वेळा शिष्यांना प्रकट झाला.एकदा तर तो 500 हून अधिक लोकांस एकाच वेळी प्रकट झाला.त्याने आपल्या शिष्यांना आपण जिवंत असल्याचे प्रमाण विविध प्रकारे दिले व त्यांना देवच्या राज्याविषयी शिकवण दिली.

### येशू निरंतर किती वेळ दिसत राहिला?

तो चाळीस दिवस पर्यंत दिसत राहिला.

### येशूला कोणत्या मोठ्या समुदायाने या वेळेस पाहिले?

तो एकाच वेळेस ५०० हून अधिक शिष्यांना दिसला.

---

## 42:10

येशू आपल्या शिष्यांना म्हणाला, "स्वर्गात व पृथ्वीवर सर्व अधिकार मला देण्यात आले आहे.म्हणून, तुम्ही जा व सर्व राष्ट्रांतील लोकांस शिष्य बनवा आणि पिता, पुत्र व पवित्र आत्माच्या नावाने त्यांना बाप्तिस्मा द्या, आणि मी आज्ञापिलेल्या सर्व गोष्टी त्यांना पाळावयास शिकवा.आणि आठवण ठेवा की मी नेहमी तुम्हाबरोबर आहे."

### येशूने शिष्यांस कोणती आज्ञा दिली व काय करण्यास सांगितले?

त्याने सांगितले, “शिष्य बनवा, पिता, पुत्र व पवित्र आत्माच्या नावाने बाप्तिस्मा द्या आणि जे काही मी आज्ञापिले ते पालन करण्यास शिकवा.”

---

## 42:11

येशूच्या पुनरूत्थानानंतर चाळीस दिवसांनी येशूने शिष्यांस सांगितले, "जोपर्यंत माझा पिता तुम्हास सामर्थ्य देणारा पवित्र आत्मा तुम्हावर पाठवत नाही, तोपर्यंत यरूशलेम सोडून जाऊ नका."मग येशू स्वर्गात गेला व मेघाने त्याला त्यांच्या दृष्टिआड केले.सर्व गोष्टींवर अधिकार चालवण्यासाठी येशू देवाच्या उजवीकडे बसलेला आहे .

### येशूने शिष्यांना यरुशलेमेत का थांबण्यास सांगितले?

त्यांना पिताकडून पवित्र आत्म्याचे सामर्थ्य येईल तो पर्यंत त्यांनी थाबायचे होते.

### पुनरुत्थानानंतर चाळीस दिवस झाल्यावर येशू कोठे गेला?

तो स्वर्गात गेला.

### येशू आता काय करीत आहे?

तो पित्याच्या उजव्या बाजूला आपल्यासाठी मध्यस्थी करीत आहे.

# मंडळीची सुरूवात

## 43:01

येशू स्वर्गात गेल्यानंतर, येशूने आज्ञा दिल्याप्रमाणे शिष्य यरूशलेमेतच राहिले.तेथील विश्वासणारे प्रार्थना करण्यासाठी वारंवार एकत्र येऊ लागले.

### शिष्य काय करत होते जेव्हा ते यरुशलेमेत वाट पाहत होते?

ते एकत्र येऊन सतत प्रार्थना करीत होते.

---

## 43:02

प्रत्येकवर्षी, वल्हांडणानंतर 50 दिवसांनी, यहूदी लोक पेंटेकॉस्ट नावाचा महत्वाचा दिवस साजरा करत.पेंटेकॉस्ट हा यहुदी लोकांचा हंगामाचा सण होता.जगातील सर्व यहूदी लोक यरुशलेमेत येऊन पेंटेकॉस्ट साजरा करत.यावेळी येशूचे स्वर्गारोहण झाल्यानंतर सुमारे एक आठवड्यानंतर पेंटेकॉस्ट आला होता.

### यहुदी पेंन्टीकॅास्टचा सण केव्हा साजरा करत?

प्रत्येक वर्षी वल्हांडणाच्या पन्नास दिवसानंतर

### येशूच्या पुनरुत्थानानंतर पेंन्टेकॉस्टच्या दिवशी विश्वासणाऱ्यांमध्ये काय झाले?

तेथे मोठा आवाज व सुसाटयाचा वारा व जणू काही अग्निज्वाला त्याच्या डोक्यावर चमकल्या आणि ते पवित्र आत्म्याने भरून अन्य भाषा बोलू लागले.

---

## 43:03

जेंव्हा सर्व विश्वासणारे एकत्र जमले होते एकाएकी ते बसले होते ती खोली सोसाट्याच्या वा-यासारख्या ध्वनीने भरून गेली.तेव्हा अग्निच्या ज्वालेसारख्या जिभा त्यांना सर्व विश्वासणा-यांच्या डोक्यावर दिसल्या.ते सर्व पवित्र आत्म्याने भरून गेले व वेगवेगळ्या भाषेत बोलू लागले.

---

## 43:04

यरूशलेमेतील लोकांनी जेंव्हा हा आवाज ऐकला तेंव्हा हे काय आहे ते पाहाण्यासाठी आले.जेव्हा लोकांनी विश्वासणा-यांना देवाची आश्चर्यकर्मे प्रकट करतांना व त्यांच्याच मातृभाषेमध्ये बोलतांना ऐकले तेव्हा लोकांना फार आश्चर्य वाटले.

### तेथील लोक का स्तब्ध झाले?

शिष्यांना आपापल्या मातृभाषेत बोलतांना ऐकून गर्दीतले लोक स्तब्ध झाले.

---

## 43:05

काही लोकांना वाटले की विश्वासणारे मद्यपान करून मस्त झाले आहेत.परंतु पेत्र उभा राहून त्यांना म्हणाला, "माझे बोलणे ऐका!ही माणसे मद्यपान करून मस्त झाली नाहीत!ह्याद्वारे योएल भविष्यवक्त्याने केलेली भविष्यवाणी पूर्ण होत आहे, देवाने म्हटले आहे "शेवटच्या काळामध्ये मी आपल्या आत्म्याचा वर्षाव करील.'"

### तेथील लोक शिष्यांच्या अन्य भाषा बोलण्याविषयी काय विचार करत होते, ते असे का बोलत असावे असे त्यांना वाटले?

शिष्य प्यालेले आहेत असे त्यांना वाटले.

### पेत्राने त्यांना त्या भाषेत बोलण्याचे काय कारण सांगितले?

पेत्राने म्हटले, देवाने त्याचा आत्मा ओतला.

---

## 43:06

"अहो इस्राएल लोकांनो, येशूने देवाच्या शक्तिद्वारे अनेक चिन्हे व अद्भुत कार्ये केली, जी तुम्ही स्वतः डोळ्याने पाहिली व तुम्हाला माहीत आहेत.पण तुम्ही त्यास वधस्तंभावर खिळले!"

### येशूला वधस्तंभावर खिळण्यासाठी कोण जबाबदार आहे असे पेत्र म्हणाला?

या गर्दीत असलेले लोक.

---

## 43:07

"जरी येशू मरण पावला होता, तरी देवाने त्यास मेलेल्यांतून पुन्हा उठविले.ह्या घटनेद्वारे ही भविष्यवाणी पूर्ण होते, ‘तू आपल्या पवित्रास कबरेमध्ये कुजू देणार नाहीस.’आम्ही ह्या गोष्टीविषयीचे साक्षीदार आहेत की देवाने येशूला मरणातून पुन्हा उठविले आहे."

### पेत्राने येशू जिवंत आहे हे कसे सांगितले?

देवाने त्याला मरणातून उठवल्याच्या व्दारे.

---

## 43:08

येशू आता आपल्या देवपित्याच्या उजव्या बाजूस ऊंचावलेला आहे.आणि येशूने अभिवचन दिल्याप्रमाणे त्याने आम्हासाठी पवित्र आत्मा पाठविला आहे.आता जे तुम्ही पाहाता व ऐकत आहात, त्या सर्व गोष्टी पवित्र आत्मा करीत आहे.

### शिष्यांना अन्य भाषा बोलण्याचे काय कारण होते?

पवित्र आत्मा त्यांना अन्य भाषा बोलण्याचे कारण होय.

---

## 43:09

"तुम्ही येशू ह्या मनुष्यास, वधस्तंभावर खिळले.परंतु आता तुम्हाला कळू द्या की ज्याला तुम्ही वधस्तंभावर खिळून मारले त्याला देवाने प्रभू व ख्रिस्त असे करून ठेवले आहे!"

### येशूला वधस्तंभावर खिळण्यासाठी कोण जबाबदार आहे असे पेत्र म्हणाला?

या गर्दीत असलेले लोक.

### देवाने येशूला कोण व्हावे असे ठरवले त्या कोणत्या दोन गोष्टी पेत्राने सांगितल्या?

प्रभू व मशीहा.

---

## 43:10

पेत्राचे भाषण ऐकणा-यांच्या मनाला टोचणी लागली.म्हणून त्यांनी पेत्र व अन्य प्रेषितांना विचारले, "बंधुजनहो, आम्ही आता काय करावे?"

### लोकांनी पेत्राच्या संदेशाला कोणत्या प्रकारे प्रतिसाद दिला?

त्यांच्या मनाला तीव्र जाणीव झाली व ते त्याला विचारू लागले, आम्ही काय करावे?

---

## 43:11

पेत्र त्यांना म्हणाला, "तुम्हांपैकी प्रत्येकाने आपआपल्या पापांचा पश्चाताप करुन येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये बाप्तिस्मा घ्यावा, म्हणजे देव तुम्हास तुमच्या पापांची क्षमा करील.मग तो तुम्हास पवित्र आत्म्याचे दान सुद्धा देईल."

### पेत्राने लोकांना काय करण्यास सांगितले?

त्याने पश्चाताप करण्यास सांगितले व येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्यावा तर त्यांची पापे परमेश्वर माफ करेल.

---

## 43:12

तेव्हा सुमारे 3,000 लोकांनी पेत्राच्या बोलण्यावर विश्वास ठेविला व ते येशूचे शिष्य झाले.त्यांनी बाप्तिस्मा घेतला व यरूशलेमेच्या मंडळीमध्ये सामिल झाले.

### त्या दिवशी किती लोकांनी विश्वास ठेवला व बाप्तिस्मा घेतला?

३००० च्या जवळपास लोकांनी.

---

## 43:13

शिष्य प्रेषितांच्या शिक्षणात सहवासात भाकर मोडण्यात व इतरांबरोबर प्रार्थना करण्यात तत्पर असत.ते आनंदाने एकत्र देवाची स्तुती करीत आणि त्यांचे सर्व काही समाईक होते.सर्व लोक त्यांना प्रसन्न असत.प्रत्येक दिवशी त्यांच्यामध्ये नवीन विश्वासणा-यांची भर पडत होती.

## शिष्यांनी आपला वेळ कशांत घालवला?

प्रेषितांचे शिक्षण एकून, भाकरी मोडून, प्रार्थना करून व परमेश्वराचे गुणगान करून.

# पेत्र व योहान एका भिका-यास बरे करतात

## 44:01

एके दिवशी पेत्र व योहान मंदिरामध्ये जात होते.ते मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ जात असतांना, त्यांनी एक लंगडा भिकारी भीक मागत असतांना पाहिला.

#### लंगडा मनुष्य पेत्र आणि योहानाकडून काय अपेक्षा करत होता?

त्याला काही पैसे भिक म्हणून मिळतील.

---

## 44:02

पेत्राने त्या पांगळ्या मनुष्याकडे पाहून म्हटले, "तुला देण्यासाठी माझ्याकडे पैसे नाहीत.पण माझ्याकडे जे आहे ते मी तुला देतो.येशूच्या नावामध्ये ऊठ आणि चालू लाग!"

#### पैश्या ऐवजी पेत्राने लंगड्या माणसाला काय दिले?

पेत्राने त्याला येशूच्या नावाने बरे केले.

---

## 44:03

लगेच तो पांगळा मनुष्य बरा झाला, तो चालू लागला व तो उड्या मारत देवाची स्तुती करू लागला.मंदिराच्या अंगणातील लोकांनी त्याला पाहून आश्चर्य केले.

---

## 44:04

त्या ब-या झालेल्या मनुष्यास पाहण्यासाठी लोकांनी त्याच्याभोवती गर्दी केली.पेत्र त्यांना म्हणाला, "हा मनुष्य बरा झालेला पाहून तुम्ही का आश्चर्य करता?"आम्ही आमच्या सामर्थ्याने किंवा आमच्या चांगुलपणाने त्यास बरे केले नाही.तर येशूच्या शक्तीने व देवाने दिलेल्या विश्वासाद्वारेच हा मनुष्य बरा झाला आहे."

### लंगड्या मनुष्याला बरे होण्यासाठी पेत्राने काय सांगितले?

माझ्या जवळ सोनेरूपे काही नाही, पण जे आहे ते तुला देतो, नासोरी येशू ख्रिस्ताच्या नावाने चालु लाग.

---

## 44:05

"तुम्ही रोमी सम्राटास येशूला जीवे मारावयास सांगितले.तुम्ही जीवनदात्यास ठार मारिले, परंतु देवाने त्यास मेलेल्यांतून पुन्हा उठविले.जरी तुम्ही काय करत होता ते तुम्हास कळले नाही, तरी देवाने तुमच्या करवी मसिहा दु:ख सोशिल व मरेल ही भविष्यवाणी पूर्ण करून घेतली आहे.यास्तव, आता पश्चाताप करा व देवाकडे वळा म्हणजे तुमची पापे धुतली जातील."

### पेत्राने म्हटले, येशूला कोणी मारले?

त्याने लोकांच्या गर्दीत सांगितले, रोमी सरकारने येशूला मारले.

### कोणती भविष्यवाणी लोकांनी पूर्ण केली जेव्हा त्यांनी येशूला मारले?

भविष्यवाणी हि की, मासिहाने दुख सोसावे व मरावे.

### लोकांनी केल पाहिजे असे पेत्राने म्हटले?

त्यांनी पश्चाताप करावा व देवाकडे फिरावे. जेणेकरून त्यांची पापे पुसून टाकले जातील.

---

## 44:06

मंदिरातील पुढारी पेत्र व योहान यांचे बोलणे ऐकून संतापले.म्हणून त्यांनी त्यांस धरून तुरुंगात टाकले.परंतु पुष्कळ लोकांनी पेत्राच्या वचनावर विश्वास ठेविला, आणि आता विश्वासणा-यांची संख्या वाढून सुमारे 5000 झाली होती.

### परिणाम स्वरुप किती लोकांनी पेत्राच्या संदेशावर विश्वास केला?

कमीत कमी ५००० लोक.

---

## 44:07

दुस-या दिवशी, यहूदी पुढा-यांनी पेत्र व योहान यांना महायाजकासमोर व इतर धर्मपुढा-यांसमोर उभे केले.त्यांनी पेत्र व योहान यांना विचारले, "तुम्ही कोणत्या शक्तिद्वारे ह्या पांगळ्या मनुष्यास बरे केले?"

---

## 44:08

पेत्र त्यांना म्हणाला, "हा मनुष्य येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये बरा होऊन तुम्हापुढे उभा आहे.तुम्ही येशूला खिळले, परंतु देवाने त्यास पुन्हा जिवंत केले!तुम्ही त्यास नाकारले, परंतु येशू ख्रिस्ताच्या सामर्थ्याशिवाय तारणाचा दुसरा मार्ग नाही!"

### आपण वाचावे यासाठी कोणता एकमात्र मार्ग आहे?

फक्त येशू ख्रिस्तच तारणाचा एकमात्र मार्ग आहे जो आपल्याला तारण देऊ शकतो.

---

## 44:09

हे ऐकून धार्मिक पुढा-यांना आश्चर्याचा धक्का बसला, कारण पेत्र व योहान सामान्य व अडाणी माणसे असतांनाही त्यांच्यासमोर मोठ्या धाडसाने बोलत होते.परंतु ते येशूच्या सहवासात होते हे त्यांनी ओळखले.मग त्यांनी पेत्राला व योहानाला धमकावले व जाऊ दिले.

### यहुदी लोक योहान व पेत्राच्या संदेशाने का आश्चर्यचकीत झाले?

कारण येशूच्या द्वारे मेलेल्यातून पुन्हा उठने आहे, असे ते उघडपणे सांगत होते.

### यहुदी पुढाऱ्यांनी योहान व पेत्राबद्दल काय निर्णय घेतला?

त्यांनी त्यांची अवहेलना केली व त्यांना जावू दिले.

# फिलिप्प आणि कूशी अधिकारी

## 45:01

प्रारंभीच्या मंडळींमध्ये पुढा-यांपैकी स्तेफन नावाचा एक पुढारी होता.तो एक प्रतिष्ठित पुरूष होता, तो ज्ञानी व पवित्र आत्म्याने परिपूर्ण असा होता.स्तेफनाने अनेक चमत्कार केले व लोकांनी येशूवर विश्वास ठेवावा यास्तव अनेक प्रमाण देऊन वादविवाद करीत असे.

### स्तेफन हा कोणत्या प्रकारचा व्यक्ती होता?

तो चांगला नामवंत व पवित्र आत्म्याच्या ज्ञानाने परिपुर्ण होता.

---

## 45:02

एके दिवशी, स्तेफन येशूविषयी शिकवण देत असतांना, विश्वास न ठेवणारे काही यहूदी त्याच्याशी वादविवाद करू लागले.त्यांना स्तेफनाचा फार राग आला व त्याच्यावर त्यांनी धार्मिक पुढा-यांसमोर खोटे दोषारोप केले.ते म्हणाले, "आम्ही त्यास मोशे व देवाविषयी अपशब्द बोलतांना ऐकले आहे!"तेव्हा धार्मिक पुढा-यांनी स्तेफनास अटक केले व त्यास महायाजक व इतर पुढा-यांसमोर आणले, तेथे त्याच्याविरुदध आणखी खोटे साक्षीदार उभे केले व त्यांनी स्तेफनावर खोटे आरोप लाविले.

### यहुद्यांच्या स्तेफना विषयी काही चुकीच्या धारणा त्या कोणत्या?

त्यांनी म्हटले, स्तेफन मोशे व देवाबद्दल वाईट बोलतो.

---

## 45:03

महायाजक स्तेफनास म्हणाला, "ह्या गोष्टी ख-या आहेत का?"स्तेफनाने त्यांस उत्तर देत देवाने अब्राहमापासून ते येशूपर्यंत कशा प्रकारे आश्चर्यकर्मे केली व देवाच्या लोकांनी निरंतर कशा त्याच्या आज्ञा मोडिल्या ह्याविषयी आठवण करून दिली.मग तो म्हणाला' "अहो ताठ मानेच्या व बंडखोर लोकांनो, जसे तुमचे पूर्वज नेहमी पवित्र आत्म्याचा विरोध करत होते, तसेच तुम्ही करत आहात.परंतु तुम्ही त्यांच्याहीपेक्षा वाईट केले आहे!तुम्ही मसिहास जीवे मारले आहे!"

### स्तेफनाने लोकांना, ते त्यांच्या पूर्वजा पेक्षा वाईट होते असे का म्हटले?

त्यांनी मशीहाला मारून टाकले.

---

## 45:04

जेव्हा धार्मिक पुढा-यांनी हे ऐकले, तेव्हा त्यांना खूप राग आला व त्यांनी आपल्या कानांवर हात ठेवून मोठ्याने ओरडले.त्यांनी स्तेफनास नगराच्या बाहेर ओढत नेले आणि त्यास दगडमार केला.

### स्तेफनाच्या आरोपाबद्दल धार्मिक पुढाऱ्यांची प्रतिक्रिया काय होती?

त्यांनी त्याला शहरातून बाहेर काढून दगडमार केले व मारून टाकण्याचा प्रयत्न केला.

---

## 45:05

स्तेफन मरत असतांना, तो मोठ्याने ओरडला, "येशू, माझ्या आत्म्याचा स्वीकार कर."मग त्याने गुडघ्यावर येउन पुन्हा ओरडून म्हटले, "प्रभुजी, हे पाप त्यांच्याकडे मोजू नकोस."मग त्याने प्राण सोडला.

### मृत्यू पूर्वी कोणते शेवटले वाक्य स्तेफन म्हणाला?

“स्वामी, हे पाप त्यांच्या विरुद्ध मोजू नको.”

---

## 45:06

शौल नावाचा एक तरूण मनुष्य स्तेफनाला मारणा-या लोकांशी सहमत होता व त्यास दगडमार करणा-यांची वस्त्रे तो सांभाळत होता.त्या दिवसांमध्ये, यरूशलेमेतील पुष्कळ लोक येशूच्या शिष्यांचा छळ करत होते, म्हणून शिष्य दुस-या ठिकाणी पळून गेले.पण, असे असतांनाही, जेथे कोठे ते गेले, त्यांनी येशूविषयी प्रचार केला.

### कोणी चोरांची सुरक्षा केली व स्तेफनाला मारून टाकणाऱ्या लोकांच्या कपड्यांची राखण कोण करत होता?

शौल

### यरूशलेमेत छळ सुरु झाला तेव्हा विश्वासणाऱ्यांनी काय केले?

ते त्या जागेपासून पळून गेले व जेथे कोठे गेले तेथे येशूविषयीची सुवार्ता गाजवली.

---

## 45:07

फिलिप्प नावाचा येशूचा शिष्य छळामूळे यरुशलेम सोडून पळून जाणा-या विश्वासणा-यांपैकी एक होता.तो शोमरोनामध्ये पळून गेला होता व त्या ठिकाणी त्याने येशूची सुवार्ता सांगितली व अनेकांचे तारण झाले.तेव्हा एके दिवशी, देवाच्या एक दूताने फिलिप्पास सांगितले वाळवंटातील एका विशिष्ट वाटेवर जा.तो वाटेने चालत असतांना फिलिप्पाने कूशी देशाचा एक अधिकारी आपल्या रथामध्ये बसून जात असताना पाहिला.पवित्र आत्म्याने फिलिप्पास त्या मनुष्याशी बोलण्यास सांगितले.

### वाळवंटी रस्त्यात फिलिप्पाला कोण भेटला?

इथिओपीया राष्ट्राचा एक महत्त्वाचा अधिकारी त्याला भेटला .

---

## 45:08

जेव्हा फिलिप्प रथाजवळ आला, तेव्हा त्याने तो कूशी यशया संदेष्ट्याचा ग्रंथ वाचत असताना ऐकले.तो वाचत होता, "त्याला मेंढरासारखे वधासाठी नेले; आणि जसे कोकरू कातरणा-याच्या पुढे गप्प असते, तसा तो आपले तोंड उघडीत नाही.त्यांनी त्याला वाईट वागणूक दिली व त्याचा सन्मान केला नाही.त्यांनी त्यास जीवे मारिले."

### फिलीप्प जेव्हा पोहचला तेव्हा तो अधिकारी काय करत होता?

तो यशया संदेष्ट्याच्या द्वारे लिहिलेल्या भविष्यावाणीच्या पुस्तकाचे वाचन करत होता.

---

## 45:09

फिलिप्पाने कूशी अधिका-यास विचारले, "तुम्ही जे वाचत आहात, ते तुम्हास समजते का?कूशी माणसाने उत्तर दिले, "नाही.जोपर्यंत मला कोणी समजावून सांगत नाही, तोपर्यंत मी समजू शकत नाही.कृपया येऊन माझ्या बाजूस बसा.यशया संदेष्टा स्वतःविषयी की अन्य कोणाविषयी लिहित आहे?"

### काय तो अधिकारी ती भविष्यवाणी समजत होता?

नाही, कोणीतरी येऊन त्याला वर्णन करून सांगावे याची त्याला गरज होती.

---

## 45:10

फिलिप्पाने त्या कूशीस स्पष्टिकरण देत सांगितले की संदेष्टा हे मसिहाविषयी लिहित आहे.फिलिप्पाने अन्य शास्त्रपाठातूनही संदर्भ घेऊन त्यास येशूविषयीची सुवार्ता सांगितली.

### फिलिपने कोणास कोकऱ्या विषयी भविष्यवाणी सांगितली?

कोकरा हा येशूचा संधर्भ होय.

---

## 45:11

फिलिप्प आणि कूशी अधिकारी पुढे प्रवास करत-करत एका तळ्याजवळ आले.कूशी अधिकारी म्हणाला, "पाहा!येथे पाणी आहे!मी बाप्तिस्मा घेऊ शकतो का?"आणि त्याने सारथ्यास रथ थांबवायला सांगितले.

### फिलीप ने भविष्यवाणीचे वर्णन केल्यानंतर षंढाने काही पाणी पहिले आणि त्यानंतर काय विचारले?

षंढाने विचारले, पाहा हे पाणी, मला बाप्तीस्मा घेण्यास काय हरकत आहे?

---

## 45:12

मग ते पाण्यामध्ये उतरले, आणि फिलिप्पाने त्या कूशी अधिका-यास बाप्तिस्मा दिला.ते पाण्यातून वर आल्यानंतर, पवित्र आत्मा फिलिप्पास दूस-या ठिकाणी घेऊन गेला तो त्या ठिकाणी लोकांना येशूविषयी सांगत राहिला.

### षंढाला बाप्तिस्मा दिल्यानंतर फिलीपला काय झाल?

पवित्र आत्म्याने फिलीप ला दूर नेलं.

---

## 45:13

कूशी इकडे आनंदाने आपल्या घराकडे प्रवास करू लागला, कारण त्याला येशूची ओळख झाली होती.

## फिलीपने षंढाला सोडल्यानंतर त्याने काय केलं?

आपल्या मार्गात हर्ष चालला व येशूला ओळखल्यामुळे आनंदित होता.

# पौल ख्रिस्ती बनतो

## 46:01

शौल हा तरुण मनुष्य स्तेफनाला दगडमार करणा-यांची वस्त्रे सांभाळत होता.तो येशूवर विश्वास ठेवत नव्हता, म्हणून तो विश्वासी लोकांचा छळ करत असे.यरुशलेममध्ये तो घरोघरी जाऊन विश्वास ठेवणाऱ्या स्त्रीया आणि पुरूषांस दोघांसही तुरूंगात टाकत असे.महायाजकाने शौलास दिमिष्क शहरातील ख्रिस्ती लोकांस पकडून यरूशलेमेस आणण्यासाठी परवाना दिला होता.

### शौल दिमिश्कला का जात होता?

ख्रिस्ती लोकांना धरून यरूशलेमात पुन्हा आणण्यासाठी.

---

## 46:02

शौल दिमिष्काच्या मार्गावर प्रवास करत असतांना, अचानक त्याच्या सभोवती आकाशातून प्रकाश चमकला आणि तो जमिनीवर पडला.शौलाने कोणी तरी हाक मारतांना ऐकले, "शौला!शौला!तू माझा छळ का करतोस?"शौलाने विचारले, "प्रभु, तू कोण आहेस?"येशूने त्यास म्हटले, "मी येशू आहे.ज्याचा तू छळ करत आहेस!"

### दिमिश्काच्या रस्त्यावर येशूने शौलाला काय प्रश्न विचारला?

शौला,शौला, माझा छळ का करितोस?

---

## 46:03

शौल जेव्हा उठला, तेव्हा त्याला कांही दिसेना.तेव्हा त्याच्या मित्रांना त्याला दिमिष्कास न्यावे लागले.शौलाने तीन दिवस काहीच खाल्ले व प्याले नाही.

### तिक्ष्ण प्रकाश पाहून जेव्हा शौल उठला तेव्हा काय घटना घडली?

शौल पाहू शकत नव्हता, त्याच्या मित्रांनी त्याला दिमिश्कात आणले व शौलने तीन दिवस व रात्र काहीच खाल्ले नाही.

---

## 46:04

दिमिष्कात हनन्या नावाचा एक शिष्य होता.देव त्यास म्हणाला, "शौल रहात असलेल्या घरी जा.आणि त्याच्यावर आपले हात ठेव म्हणजे त्यास पुन्हा दृष्टी मिळेल."परंतु हनन्या म्हणाला, "प्रभूजी, मी ऐकले आहे की हा मनुष्य कशाप्रकारे ख्रिस्ती लोकांचा छळ केला आहे."देव त्यास म्हणाला, "जा!कारण यहूदी लोकांसमोर व परराष्ट्रीयांसमोर माझे नाव घेऊन जाण्याकरिता मी त्याला निवडलेले आहे.माझ्या नावासाठी तो खूप दुःख सोसणार आहे."

### हनन्या शौलाशी बोलायला का घाबरला?

त्याने एकलं होते की शौल विश्वासी लोकांचा छळ करतो.

### देव शौलाला निवडण्याबद्दल काय हेतू सांगतो?

शौल देवाचे नाव यहुदी व अन्य लोकांना सांगणार.

---

## 46:05

तेव्हा हनन्याने शौलाकडे जाऊन त्याजवर आपले हात ठेवले व म्हणाला, "जो येशू तुला मार्गामध्ये प्रकट झाला, त्याने मला तुझ्याकडे पाठविले आहे, अशासाठी की, तुझी दृष्टी तुला पुन्हा प्राप्त व्हावी व तू पवित्र आत्म्याने परिपूर्ण व्हावेस."लगेच शौलाला पुन्हा दिसू लागले, आणि हनन्याने त्यास बाप्तिस्मा दिला.मग शौलाने अन्न घेतले व त्यास शक्ति मिळाली.

### कोणत्या प्रकारे हनन्याने शौलाला पाहण्यास समर्थ केले?

त्याने त्याजवर हात ठेवून व प्रार्थना करून.

### हनन्याने काय केले जेव्हा शौलला पुन्हा दृष्टी आली?

हनन्याने त्याला बाप्तिस्मा दिला.

---

## 46:06

लगेच शौल दिमिष्कामध्ये असणाऱ्या यहूद्यांना प्रचार करू लागला व म्हणाला, "येशू हाच देवाचा पुत्र आहे."यहूद्यांना हे पाहून मोठे आश्चर्य वाटले की ख्रिस्ती लोकांचा छळ करणारा आता येशूवर विश्वास ठेवतो व त्याचा प्रचार करत आहे!शौलाने तर्कशुद्ध संभाषण करून यहूद्यांना येशू हा मसिहा असल्याचे सिद्ध केले.

### कोणता संदेश शौलाने लगेच यहुद्यांना प्रचार केला?

“येशू हाच देवाचा पुत्र आहे.”

---

## 46:07

पुष्कळ दिवसांनंतर, यहूद्यांनी शौलास मारण्याचा कट रचला. शौलाला मारण्यासाठी त्यांनी त्याच्यावर नजर ठेवली व शहराच्या वेशीजवळ काही लोक नेमले.परंतु शौलाला हा कट समजला, व त्याच्या मित्रांनी त्याची सुटका करण्यास मदत केली.एके रात्री त्यांनी वेशीच्या भिंतीवरून एका पाटी (मोठी टोपली) मध्ये बसवून त्याला खाली सोडले. शौल दिमिष्कातून, सुटल्यानंतर येशूविषयी प्रचार करू लागला.

### शौलाच्या संदेशावर यहूद्यांनी कोणत्या प्रकारे प्रतिक्रिया दिली?

त्यांनी शौलाला मारण्याची योजना आखली.

### शौल दिमिश्काहून कसा बाहेर पडला?

त्याला त्याच्या मित्रांनी टोपलीत ठेऊन शहराच्या भींती पासून नेले.

---

## 46:08

शौल यरूशलेमेस शिष्यांना भेटण्यासाठी गेला, परंतू त्यांना त्याची भिती वाटली.तेव्हा बर्णबा नावाच्या एका विश्वासणाऱ्याने शौलास प्रेषितांकडे नेले व सांगितले की कशा प्रकारे शौलाने दिमिष्कामध्ये येशूचा मोठ्या धाडसाने प्रचार केला.त्यानंतर शिष्यांनी त्याचा स्विकार केला.

### शौलाला कोणी मदत केली की तो यरूशलेमेत शिष्यांद्वारे स्विकारल्या जाईल?

बर्णबाने शौलाला प्रेषितांकडे नेले आणि शौल दिमिश्कात हिम्मतीने कसा बोलला ते सांगितले.

---

## 46:09

यरूशलेमेतील छळामुळे काही विश्वासणारे दूर अंत्युखिया शहरामध्ये गेले व तेथे त्यांनी येशूविषयी प्रचार केला.अंत्युखिया येथील लोकांमध्ये जास्त यहुदी लोक नव्हते, पण प्रथमच, त्यांच्यापैकी पुष्कळ लोक सुद्धा विश्वासणारे झाले.बर्णबा आणि शौल तेथील नवीन विश्वासणा-यांना येशूविषयी अधिक शिक्षण देण्यासाठी व मंडळीला उत्तेजन देण्यासाठी अंत्युखियास गेले.अंत्युखिया येथील येशूवर विश्वास ठेवणा-यांना प्रथमच "ख्रिस्ती" म्हटले गेले.

### अन्तुखियाच्या विश्वासणाऱ्यांमध्ये काय वेगळेपण होते?

ते यहुदी नव्हते.

### अन्तुखियाच्या विश्वासणाऱ्यांसाठी कोणते नाव वापरले गेले?

ख्रिस्ती.

---

## 46:10

एके दिवशी, अंत्युखियाचे ख्रिस्ती उपवास-प्रार्थना करत असतांना, पवित्र आत्मा त्यांच्यावर आला व म्हणाला, "बर्णबा व शौल यांना ज्या कार्यासाठी मी बोलावले आहे, त्यासाठी त्यांना वेगळे करुन ठेवा."तेव्हा अंत्युखिया येथील मंडळीने शौल व बर्णबासाठी प्रार्थना केली व त्यांच्यावर हात ठेविले.आणि मग त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी येशूची सुवार्ता सांगण्यासाठी त्यांना पाठविले.बर्णबा व शौल यांनी पुष्कळ वेगवगळ्या लोकगटांस सुवार्ता सांगितली व पुष्कळ लोकांनी येशूवर विश्वास ठेविला.

### अन्तूखियातील मंडळीने काय केले जेव्हा पवित्र आत्म्याने शौलला आणि बर्णबाला वेगळे केले?

ते प्रार्थना व उपास करीत होते.

### शौल व बर्णबाला वेगळे करुन पाठवण्यात अन्तूखियाच्या मंडळीचा हेतू काय होता?

त्यांनी त्यांना सुवार्ता सांगण्यास इतर ठिकाणी पाठविले.

# फिलिप्पै नगरामध्ये पौल आणि सीला

## 47:01

शौल संपूर्ण रोमन साम्राज्यामधून प्रवास करत असतांना, त्याने आपल्या "पौल" ह्या रोमन नावाचा उपयोग करु लागला.एके दिवशी पौल आणि त्याचा मित्र सीला हे फिलिप्पै नगरामध्ये येशूची सुवार्ता सांगण्यासाठी गेले.शहराच्या वेशीबाहेर नदीच्या काठावर प्रार्थनेसाठी एकत्रित आलेल्या लोकांकडे ते गेले.तेथे त्यांना लुदिया नावाची एक व्यापारी स्त्री भेटली.तिचे देवावर प्रेम होते व ती देवाची भक्ती करणारी होती.

### शाऊलाने कोणते रोमी नाव वापरण्यास सुरवात केली?

पौल.

### पौल शुभवर्तमान प्रचार करण्यास कोठे गेला?

ते एका नदीच्या जागेवर गेले जे शहराच्या बाहेर होते व प्रार्थनेस एकत्र जमत.

---

## 47:02

देवाने लुदियाचे अःकरण उघडले व तिने येशूविषयीच्या संदेशावर विश्वास ठेविला, मग तिने आपल्या कुटुंबियांसहित बाप्तिस्मा घेतला.तिने पौल व सीला यांना आपल्या घरी बोलाविले, तेव्हा ते तिच्या कुटुंबासोबत राहिले.

### लुदियाने येशूवर विश्वास ठेवावा हे कोणत्या गोष्टीने शक्य झाले?

लुदियाला देवाने संदेश समजण्यास शक्य केले ह्यामुळे तीने विश्वास ठेवला.

### लुदियाने विश्वास ठेवल्यानंतर पौल व सीलाने काय केले?

त्यांनी लुदिया व तिच्या घराण्यास बाप्तिस्मा दिला.

---

## 47:03

पौल आणि सीला प्रार्थनेच्या स्थळी लोकांस वारंवार भेटले.दररोज ते त्या ठिकाणी जात असतांना, एक दासी व दुष्टात्माग्रस्त मुलगी त्यांच्यामागे चालू लागली.ह्या दुष्टात्म्याच्या आधारे ती लोकांचे भविष्य सांगत असे, अशा प्रकारे भविष्य सांगून ती आपल्या धन्यासाठी भरपूर मिळकत करुन देत असे.

## 47:04

ते रस्त्याने चालत असतांना ती गुलाम मुलगी ओरडत राहिली, "ही माणसे परात्पर देवाचे दास आहेत.ते तुम्हास तारणाचा मार्ग सांगत आहेत!"तिने असे अनेक वेळा केल्यामुळे पौलास त्रास झाला.

### शौल आणि सीलाला पाहून भूतग्रस्त बंधक मुलगी का ओरडत होती?

" हे माणसे अति उच्च देवाचे दास आहेत आणि ते तारण प्राप्तीची गोष्ट सांगतात!"

### दुष्ट आत्माग्रस्तीच्या साक्षीला शौलने कसे प्रतिउत्तर दिलं?

पौल अभिषेकाने आणि आज्ञा देऊन दुष्ट आत्मा ग्रस्त मुलीला आज्ञा देतो.

---

## 47:05

शेवटी एके दिवशी ती मुलगी ओरडू लागली, पौलाने तिच्याकडे वळून तिच्यामध्ये असणाऱ्या दूष्टआत्म्याला म्हटले, "येशू ख्रिस्ताच्या नावाने मी तुला आज्ञा करतो की तू हिच्यामधून निघून जा."आणि तत्काळ तो दूष्टआत्मा तिला सोडून निघून गेला.

### दुष्ट आत्माग्रस्तीच्या साक्षीला शौलने कसे प्रतिउत्तर दिलं?

पौल अभिषेकाने आणि आज्ञा देऊन दुष्ट आत्मा ग्रस्त मुलीला आज्ञा देतो.

---

## 47:06

हे पाहून त्या मुलीच्या धन्यांस खूप राग आला!त्यांच्या लक्षात आले की दुष्टात्म्याशिवाय ती मुलगी लोकांचे भविष्य सांगू शकत नव्हती.ह्याचा अर्थ तीने लोकांना त्यांचे भविष्य सांगावे म्हणुन लोक आता तिच्या मालकांस पैसे देणार नव्हते.

### का दासी पुत्री क्रोधीत झाली, तर शैतान निघून गेला?

त्यांनी हे जाणून घेतले की भविष्याची गोष्ट सांगण्यास ते लोक आता जास्त पैसे भरणार नाही.

---

## 47:07

तेव्हा या मुलीच्या धन्यांनी पौल व सीला यांना रोमन अधिकाऱ्याकडे नेले व त्यांनी त्यांना मारहाण केली व तुरुंगामध्ये टाकले.

---

## 47:08

त्यांनी पौल व सीला यांना तुरूंगाच्या एकदम आतल्या ठिकाणी ठेवले व त्यांचे पाय खोड्यात अडकवले.तरीही मध्यरात्रीच्या समयी, ते देवाची स्तुती करत होते व गीत गात होते.

### पौल आणि सीला मध्यरात्री तुरुंगात काय करत होते?

ते गीते गाऊन देवाची स्तुती करत होते

---

## 47:09

अचानक, त्या ठिकाणी एक मोठा भूकंप झाला! तेव्हा तुरूंगाचे सर्व दरवाजे आपोआप उघडले गेले, आणि कैद्यांचे साखळदंडही तुटून पडले.

### जेव्हा पौल आणि सीला गीत गात होते तेव्हा काय झाले?

तेथे मोठा धरणीकंप झाला व तुरुंगाचे दरवाजे उघडले आणि बंदिवान मुक्त झाले.

---

## 47:10

तेव्हा तुरूंगाचा अधिकारी जागा झाला, आणि जेव्हा त्याने तुरूंगाचे दरवाजे उघडे पाहिले तेव्हा तो खूप भयभित झाला!त्याला वाटले की सर्व कैदी पळून गेले असतील, म्हणून तो आत्महत्या करणार होता.(त्यास माहीत होते जर कैदी निसटून गेले तर रोमी अधिकारी त्यास जीवे मारतील.)परंतु पौलाने त्यास ओरडून म्हटले, "थांब!स्वतःस इजा करून घेऊ नकोस.कारण आम्ही सर्व इथेच आहोत."

### तुरुंगाचा अधिकारी का भयभीत झाला?

सर्व बंदिवान पळून गेले असावे आणि रोमी अधिकारी मला मारून टाकणार असे त्याला वाटले

---

## 47:11

तुरूंगाचा अधिकारी पौल व सीलाकडे जात असतांना थरथर कापत होता, तो म्हणाला, "माझे तारण व्हावे म्हणून मी काय करावे?"पौलाने उत्तर दिले, "प्रभु येशूवर विश्वास ठेव म्हणजे तुझे व तुझ्या घराण्याचे तारण होईल."तेव्हा तुरूंगाधिकारी पौल व सीला यांना आपल्या घरी घेऊन गेला आणि त्याने त्यांच्या जखमा धुतल्या.पौलाने त्याच्या घरातील सर्व लोकांना येशूची सुवार्ता सांगितली.

### तुरुंगाच्या अधिकाऱ्याने पौलाला कोणता प्रश्न विचारला?

“मला तारण मिळावे म्हणून मी काय करावे?”

### तारण मिळवण्यासाठी काय करावे असे पौलाने तुरुंगाच्य अधिकाऱ्याला सांगितले?

त्याला प्रभु येशूवर विश्वास ठेवावयास सांगितले.

---

## 47:12

तुरुंगाधिकारी आणि त्याचे सर्व कुटुंब यांनी येशूवर विश्वास ठेवून बाप्तिस्मा घेतला.तेव्हा तुरूंगाधिकाऱ्याने पौल व सीला यांना जेवण दिले, आणि त्यांनी एकत्र मिळुन आनंद केला.

---

## 47:13

दुसऱ्या दिवशी शहराच्या अधिका-यांनी पौल व सीला यांची सुटका केली व फिलिप्पै शहर सोडून त्यांना जाण्यास सांगितले.तेव्हा पौल व सीला यांनी लुदिया व इतर बंधूंना भेट दिली व नंतर त्यांनी ते शहर सोडले.येशूविषयीची सुवार्ता पसरत गेली व मंडळीची वाढ होत गेली.

---

## 47:14

पौल व इतर ख्रिस्ती पुढारी येशूची सुवार्ता सांगत व शिक्षण देत अनेक शहरांमधून प्रवास करत गेले.त्यांनी पुष्कळ पत्रे सुद्धा लिहीली व मंडळ्यातील विश्वासणा-यांना प्रोत्साहन व शिक्षण दिले.त्यांपैकी काही पत्रे बायबलमधील पुस्तके झाली.

### पौलाने व अन्य ख्रिस्ती पुढाऱ्यांनी मंडळीतील विश्वासणाऱ्यांसाठी लिहिलेल्या पत्रांचे पुढे काय झाले?

काही पत्रे पवित्र शास्त्रातीलपुस्तके बनली.

# येशू हा अभिवचनानुसार दिलेला मसिहा आहे

## 48:01

देवाने जेव्हा सृष्टी बनविली तेव्हा सर्वकाही परिपूर्ण होते.तेथे पाप नव्हते.आदाम आणि हव्वा एकमेकांवर प्रेम करत व त्यांचे देवावर प्रेम होते.तेथे कुठल्याही प्रकारचा आजार किंवा मृत्यु नव्हतासृष्टी अशीच राहावी अशी देवाची इच्छा होती.

### देवाने सर्वप्रथम जग निर्माण केले तेव्हा ते कसे होते?

परिपूर्ण, पाहविरहीत, दुखविरहीत व मृत्युविरहीत होते.

---

## 48:02

हव्वेला फसविण्यासाठी सैतानाने सर्पाद्वारे संभाषण केले.तेव्हा तिने व आदामाने देवाविरूद्ध पाप केले.त्यांनी केलेल्या पापाचा परिणाम म्हणून पृथ्वीवरील प्रत्येकजण आजारी पडतो व मरण पावतो.

### पृथ्वीवरील सर्व लोक आजारी का पडतात? आणि सर्वजण मृत्यूमुखी का पडतात?

कारण आदम आणि हव्वेने देवाविरुद्ध पाप केले होते.

---

## 48:03

आदाम आणि हव्वेने पाप केल्यामुळे आणखी एक भयानक गोष्ट घडली.ते देवाचे वैरी झाले.परिणामतः तेव्हापासून पृथ्वीवर जन्म घेणारा प्रत्येक व्यक्ति पापाचा स्वभाव घेऊन जन्मतो व तो देवाचा शत्रु देखिल होतो.पापामुळे देव आणि मनुष्यांमध्ये असणारा नातेसंबंध तुटला.परंतु हा नातेसंबंध पुन्हा जोडण्याची देवाने एक योजना बनविली.

### प्रत्येक जन्मलेल्या व्यक्तीची परीस्थिती काय आहे?

त्यांच्या अंत:करणात पापी स्वभाव होता आणि देवाचे शत्रू झाले आहेत.

---

## 48:04

देवाने अभिवचन दिले की हव्वेचा एक वंशज सैतानाचे डोके फोडिल व सैतान त्याची टाच फोडिल.अर्थात सैतान मसिहास जीवे मारील, परंतु देव त्यास पुन्हा जिवंत करील आणि मग मसिहा सैतानाच्या सत्तेचा संपूर्ण नायनाट करील.अनेक वर्षांनंतर देवाने येशू हाच मसिहा आहे हे प्रकट केले.

### शैतान स्त्रीच्या “एडीला डंक” मारणार याचा अर्थ काय?

शैतानाने मशीहाला मारणार होता पण देव पुन्हा त्याला पुन्हा जिवंत करणार.

---

## 48:05

जेव्हा देवाने संपुर्ण पृथ्वी जलप्रलयाद्वारे नष्ट केली, तेव्हा त्याच्यावर विश्वास ठेवणा-यांसाठी देवाने एक जहाज दिले.त्याचप्रकारे, मनुष्यांच्या पापांमुळे प्रत्येक जण मृत्युस पात्र आहे, पण त्याजवर विश्वास ठेवणारांस वाचविण्यासाठी (तारण्यासाठी) देवाने येशूला पाठविले.

### कोणत्या प्रकारे येशू जहाज रुपी झाला जेव्हा देवाने पृथ्वी पुराने नाश केला?

देवाने येशूचा प्रबंध केला, जो कोणी विश्वास धरणार तो तारलाजाईल.

---

## 48:06

शेकडो वर्षे, महायाजक मनुष्यांना आपल्या पापांची शिक्षा मरण आहे हे दर्शविण्यासाठी सारखे पशुबली व होमार्पणे करत.परंतु त्या अर्पणांद्वारे त्यांच्या पापांची क्षमा होऊ शकली नाही.येशू हा एक थोर महायाजक आहे.इतर याजकांनी केले नाही असे येशूने केले, संपूर्ण जगातील लोकांसाठी स्वतःचेच अर्पण केले, अशासाठी की जे त्याजवर विश्वास ठेवतील त्यांना पापांची क्षमा व्हावी.येशू हा एक परिपूर्ण महायाजक होता, कारण त्याने, प्रत्येकाने केलेल्या प्रत्येक पापाची शिक्षा स्वत:वर घेतली.

### कोणत्या प्रकारे येशू वेगळा होता जे याजक त्यांच्या जवळ आले?

त्याने स्वतःचे बलिदान देऊन सगळ्यांचे पाप दूर करण्यास ठरवले.

---

## 48:07

देवाने अब्राहामास म्हटले, "सर्व राष्ट्रांतील कुळे तुझ्याद्वारे आशीर्वादीत होतील."येशू ख्रिस्त हा अब्राहामाचा वंशज होता.

### देवाची प्रतिज्ञा अब्राहामाच्या जीवनात येशूच्या माध्यमाने कशी पूर्ण झाली?

कोणत्याही लोकांचा समूह जो येशूवर विश्वास ठेवतो तो पापापासून मुक्त होतो आणि अब्राहामाचा आत्मिक वंशज होतो.

---

## 48:08

जगातील सर्व कुळे त्याच्याद्वारे आशीर्वादीत झाली, कारण जो कोणी येशूवर विश्वास ठेवतो त्याच्या पापांची क्षमा होते व तो अब्राहामाचा आत्मिक वंशज होतो.जेव्हा देवाने अब्राहामास इसहाकाचे अर्पण करावयास सांगितले, तेंव्हा देवाने इसहाकाच्या ऐवजी, अर्पणासाठी कोकरा पुरविला होता.आम्ही आमच्या पापांमुळे मरणदंडास पात्र आहोत!परंतु देवाने येशूला, देवाचा कोकरा, अर्पण म्हणून आमच्याजागी मरण्यास पाठविले.

### बलिदानासाठी इसाहाकाऐवजी ज्या कोकऱ्याप्रमाणे वधण्यात आले त्याच्याशी येशूचा काय सारखेपणा आहे?

येशू हा देवाचा कोकरा जो आपल्यासाठी बलिदान झाला.

---

## 48:09

जेव्हा देवाने मिसर देशामध्ये शेवटची पीडा पाठविली, तेव्हा त्याने प्रत्येक इस्राएली कुटुंबास एक निर्दोष कोकऱ्याचा वध करून त्याचे रक्त त्यांच्या घरांच्या चौकटीस लावावयास सांगितले होते.जेव्हा देवाने ते रक्त पाहिले, तेव्हा त्यांचे घर ओलांडून तो गेला व प्रथम जन्मलेल्या पुत्रांस त्याने मारले नाही.ह्या घटनेस वल्हांडण म्हणतात.

---

## 48:10

येशू ख्रिस्त हाच आमच्या वल्हांडणाचा कोकरा आहे.तो परिपुर्ण व निर्दोष होता आणि वल्हांडणाच्या सणाच्या समयी वधला गेला होता.जेव्हा कोणी येशूवर विश्वास ठेवितो, तेव्हा येशूच्या रक्ताद्वारे त्याच्या पापांची खंडणी भरून देण्यात येते, आणि देवाची शिक्षा त्या व्यक्तीस ओलांडून जाते.

### कोणत्या प्रकारे येशू वल्हांडणाचा कोकरा झाला?

येशू संपूर्ण व पापविरहीत, जो कोणी विश्वास करेल त्याला त्याचे रक्त हे देवाच्या प्रतिज्ञेला जवळ करण्यास सक्षम झाले.

---

## 48:11

देवाने इस्राएलाबरोबर एक करार केला होता, ते त्याचे निवडलेले लोक होते.पण त्याने आता सर्वांसाठी उपलब्ध असणारा एक नवा करार केला.ह्या नव्या करारामुळे, कोणत्याही लोकसमुदायातील कोणीही येशूवरील विश्वासाद्वारे देवाची मुले होऊ शकतात.

### देवाच्या लोकांचा भाग कोण होऊ शकतो?

नव्या करारानूसार येशूवर विश्वास ठेवल्याने, कोणत्याही लोकसमुदायातील कोणताही व्यक्ती देवाच्या लोकांत सहभागी होऊ शकतो

---

## 48:12

देवाच्या वचनाचा प्रचार करणारा मोशे हा एक महान संदेष्टा होता.परंतु येशू त्या सर्वांहून अधिक महान संदेष्टा आहे.तो देव आहे, म्हणून त्याने जे काही केले व बोलले ती देवाची कृत्ये व देवाचे शब्द होते.म्हणूनच येशूला देवाचा शब्द असे म्हणतात.

### कोणत्या प्रकारे येशू सर्वश्रेष्ठ संदेष्टा झाला?

तो देव आहे म्हणून जे काही त्याने सांगितले व जे काही त्याने केले ते कार्य देवाचे वचन होते.

---

## 48:13

देवाने दाविद राजाला अभिवचन दिले होते की त्याच्या वंशजांपैकीच एक जण देवाच्या लोकांवर सर्वकाळ राज्य करील.येशू हा देवाचा पुत्र व मसिहा असल्यामुळे देवाच्या लोकांवर सर्वकाळ राज्य करणारा तो दाविदाचा एक विशेष वंशज आहे.

### कोणत्या प्रकारे देवाने दावीद राजाला दिलेले अभिवचन येशू पुर्ण करतो?

तो देवाचा पुत्र आहे म्हणून, तो दाविदाचा वंशज आहे आणि तो सर्वदा शासन करील.

---

## 48:14

दाविद हा इस्राएलाचा राजा होता, परंतु येशू हा संपुर्ण विश्वाचा राजा आहे!तो पुन्हा येणार आहे व आपल्या राज्यामध्ये न्यायाने व शांतीने सर्वकाळ राज्य करणार आहे.

### कोणत्या प्रकारे येशू दाविदापेक्षा उत्तम राजा झाला?

येशू हा संपूर्ण विश्वाचा राजा आहे.

# देवाचा नवा करार

## 49:01

देवाच्या एका दूताने मरियेस सांगितले की ती देवाच्या पुत्रास जन्म देणार आहे.म्हणून ती कुमारी असतांनाच तिने एका पुत्रास जन्म दिला आणि त्याचे नाव येशू ठेवले.म्हणून येशू हा देव व मनुष्य दोन्ही आहे.

### कोणत्या प्रकारे येशू देव व मनुष्य होता?

कारण तो कुंमारीद्वारे जन्माला आला व देवाचा पुत्र देखील होता.

---

## 49:02

येशूने अनेक चमत्कार करून आपण देव असल्याचे प्रमाण पटवून दिले.तो पाण्यावर चालला, वादळ शांत केले, अनेक आजा-यांना बरे केले, दुष्टात्म्यांना बाहेर काढले, मेलेल्यांना जिवंत केले व पाच भाकरी व दोन मासळ्यांद्वारे 5,000 पेक्षा अधिक लोकांना पोटभर जेवू घातले.

### येशूने कसे पटवून दिले की तो देव होता?

त्याने अनेक चमत्कार केले.

---

## 49:03

येशू हा एक महान शिक्षक सुद्धा होता व देवाचा पुत्र असल्यामुळे अधिकारवाणीने बोलत होता.त्याने शिकविले की आपण जशी आपल्यावर प्रीती करतो तशी आपण दुस-यांवरही प्रीती केली पाहिजे.

### आपण दुसऱ्या लोकांवर प्रेम कसे केले पाहिजे?

जसे आपण स्वतःवर प्रेम करतो.

---

## 49:04

त्याने असे सुद्धा शिकवले की आपण आपल्या इतर सर्व वस्तूपेक्षा, संपत्तीपेक्षा देवावर अधिक प्रिती करायला पाहिजे.

### इतर कोणत्याही वस्तूपेक्षा आपण कोणावर प्रेम केले पाहिजे?

देवावर.

---

## 49:05

येशूने म्हटले की जगात जे सर्वकाही आहे त्यापेक्षा देवाचे राज्य हे अधिक मौल्यवान आहे.कोणाही मनुष्यासाठी तो देवाच्या राज्याचा घटक असणे हे सर्वात महत्त्वाचे आहे.देवाच्या राज्यामध्ये प्रवेश करण्यासाठी तुम्हास तुमच्या पापांपासुन तारले जाण्याची आवश्यकता आहे.

### प्रत्येकासाठी सर्वात महत्वपुर्ण गोष्ट कोणती?

देवाच्या राज्याचा भागीदार होणे.

---

## 49:06

येशूने शिकवले की काही लोक त्याचा स्वीकार करतील व तारण पावतील, परंतु काहीजण त्यास नाकारतील.त्याने म्हटले की काही लोक सुपिक जमिनीप्रमाणे आहेत.ते येशूची सुवार्ता स्वीकारून तारण पावतात.इतर लोक वाटेवरल्या कठीण जमिनीसारखे आहेत. ज्या ठिकाणी देवाचे वचन खोलवर न गेल्यामुळे निष्फळ ते ठरते.ते लोक येशूचा संदेश नाकारतात व त्यामूळे स्वर्गाच्या राज्यात प्रवेश करणार नाहीत.

### येशूच्या संदेशाचा तिरस्कार करणाऱ्या लोकांचे काय होईल?

ते देवाच्या राज्यात प्रवेश करणार नाहीत.

---

## 49:07

येशूने शिकवले की देव पाप्यांवर फार प्रेम करतो.तो त्यांना क्षमा करू इच्छितो व त्यांना आपली लेकरे बनवू पाहतो.

### देव अपराधी लोकांना काय करायला सांगतो?

तो त्यांचे पाप माफ व त्यांना त्याची मुले बनविणार.

---

## 49:08

देवाला पापाचा वीट आहे असेही येशूने सांगितले.जेव्हा आदाम व हव्वा यांनी पाप केले, तेव्हा ते सर्व मानवजातीमध्ये पसरले.त्याचा परिणाम म्हणून आज प्रत्येक व्यक्ति पाप करतो व देवापासून दूर होते.म्हणून, प्रत्येक मनुष्य हा देवाचा वैरी झाला आहे.

### परमेश्वर काय तिरस्कार करतो?

पाप.

---

## 49:09

परंतु देवाने जगातील प्रत्येक मनुष्यावर एवढी प्रिती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की जो कोणी त्याजवर विश्वास ठेवितो येशू त्याला त्याच्या पापांची शिक्षा देणार नाही, पण देवाबरोबर सदासर्वकाळ राहील.

---

## 49:10

तुमच्या पापांमुळे तुम्ही दोषी आहात व मरणदंडास पात्र आहात.देवाचा क्रोध तुमच्यावर यावयास हवा होता, पण त्याने तुमच्याऐवजी आपला क्रोध येशूवर ओतला.जेंव्हा येशू वधस्तंभावर मरण पावला, तेंव्हा त्याने तुमची शिक्षा स्वतःवर घेतली.

### कारण आपल्या पापामुळे देवाकडून आपण काय अपेक्षा करावी?

आपणास मराणास पात्र आहोत.

### ज्यासाठी येशू पात्र नव्हता अशी कोणती बाब त्याला क्रुसावर खिळल्याने त्याने आपणा स्वत:वर घेतली?

त्याने माझी शिक्षा आपणावर घेतली.

---

## 49:11

येशूने कधीच पाप केले नाही, परंतु त्याने तुमच्या व जगातील प्रत्येक मनुष्यांच्या पापांची शिक्षा स्वतःवर घेण्याचे निवडले व आपल्या मरणाने परिपूर्ण प्रायश्चित्त भरुन दिले. येशूने दिलेल्या बलिदानामुळे, देव आपणांस आपल्या सर्व पापांची क्षमा करू शकतो.

### येशूचे बलिदान साऱ्या जगाचे पाप दूर करण्यास का समर्थ ठरते?

कारण येशूने कधीच पाप केले नव्हते.

---

## 49:12

चांगल्या कामांनी आपले तारण होऊ शकत नाही.देवाबरोबर समेट घडवून आणण्यासाठी आपण काहीच करू शकत नाही.केवळ येशूच तुमची पापे मिटवू शकतो.तुम्ही असा विश्वास धरिला पाहिजे की येशू हा देवाचा पुत्र आहे, तो माझ्यासाठी वधस्तंभावर मरण पावला, व देवाने त्यास पुन्हा जिवंत केले आहे.

---

## 49:13

जो येशूवर आपला वैयक्तिक तारणारा म्हणून विश्वास ठेवितो, व त्याला आपला प्रभू म्हणून स्वीकारतो देव त्याचे तारण करील.परंतु तो विश्वास न ठेवणाऱ्याचे तारण करणार नाही.तुम्ही गरीब किंवा श्रीमंत, स्त्री किंवा पुरूष, तरूण किंवा वृद्ध असा किंवा तुम्ही कोठे राहता हे महत्त्वाचे नाही.देव आपणांवर प्रिती करतो व आपण येशूवर विश्वास ठेवावा अशी त्याची इच्छा आहे, अशासाठी की त्याने आम्हाबरोबर जवळचे नातेसंबंध जोडावे.

### कोण तारला जाईल?

जो कोणी येशूला स्वीकार करतो व त्याला आपला प्रभू म्हणून स्वीकारतो.

---

## 49:14

येशू आपणांस आमंत्रण देत आहे यासाठी की तुम्ही विश्वास धरावा व बाप्तिस्मा घ्यावा.येशू हा मसिहा, देवाचा एकूलता एक पुत्र आहे असा तुम्ही विश्वास ठेविता का?आपण पापी आहोत व देवाकडून होणाऱ्या दंडास आपण पात्र आहोत याचा आपण स्वीकार करता काय?येशू आपल्या पापांसाठी वधस्तंभावर मरण पावला यावर आपण विश्वास ठेवता काय?

---

## 49:15

जर आपण येशूवर विश्वास ठेवता व त्याने तुमच्यासाठी जे केले त्यावर विश्वास ठेवता तर आपण ख्रिस्ती आहात!देवाने आपणांस सैतानाच्या अंधःकारमय राज्यातून काढून आपल्या प्रकाशाच्या राज्यामध्ये आणिले आहे.देवाने आपला जुना पापी स्वभाव काढून आपणाला नवीन स्वभाव दिला आहे, ज्याच्यायोगे आपण न्यायीपणाची कामे करु शकतो.

---

## 49:16

जर आपण ख्रिस्ती आहात, तर येशूने केलेल्या कामामुळे देवाने आपणांस क्षमा केली आहे.आता शत्रुऐवजी देव आपणांस त्याचा जवळचा मित्र असे समजतो.

### काय विश्वासणारे अजून देवाचे शत्रू आहेत?

नाही, ते आता देवाचे जवळचे मित्र आहे.

---

## 49:17

जर आपण देवाचे मित्र व प्रभु येशूचे सेवक आहात, तर तुम्हाला येशू जे कांही शिकवील त्याचे पालन करण्याची इच्छा होईल.जरी आपण ख्रिस्ती आहात, तरी आपल्याला पाप करण्याचा मोह होऊ शकतो.परंतु देव विश्वासू आहे आणि म्हणतो की जर आपण आपल्या पापांचा स्वीकार केला, तर तो आपणांस क्षमा करील.पापाविरूद्ध लढण्यासाठी तो आम्हास शक्ति देईल.

### काय ख्रिस्ती लोक पापाचस बळी पडू शकतात?

होय.

### जेव्हा पाप करतो तेव्हा काय केले पाहिजे?

देवासमोर त्यांनी त्यांची पापे अंगीकार करावी.

### जर आम्ही आपली पापे स्वीकारली तर देवाने काय अभिवचन आम्हाला दिले आहे?

तो आमची पापे क्षमा करेल, पापासोबत लढण्याची शक्ती देईल.

---

## 49:18

देव आम्हास प्रार्थना करण्यास, त्याच्या वचनाचा अभ्यास करण्यास, इतर ख्रिस्ती लोकांसोबत त्याची आराधना करण्यास व त्याने तुम्हासाठी काय केले आहे इतरांना सांगण्यास सांगतो.ह्या सर्व गोष्टी आपणांस देवाबरोबर सखोल नातेसंबंध ठेवण्यास मदत करतात.

### ख्रिस्ती लोकांना देव कोणत्या गोष्टी करण्यास सांगतो?

आपण प्रार्थना करावी, वचन मनन करावे, त्याची आराधना तसेच त्याने जे काही आपल्यासाठी केले ते इतरास सांगावे.

# येशूचे पुनरागमन (येशूचे पुन्हा येणे)

## 50:01

सुमारे 2000 वर्षांपासून सर्व जगात अधिक आणि अधिक लोक येशू ख्रिस्ताच्या सुवार्तेविषयी ऐकत आहेत.मंडळीची वाढ होत आहे.येशूने आश्वासन दिले की तो युगाच्या शेवटी पुन्हा पृथ्वीवर येणार आहे.जरी तो अद्याप आला नाही, तरी तो आपले वचन पाळीलच.

### या दोन हजार वर्षात येशूवर विश्वास ठेवणाऱ्या लोकांचे संख्येबाबत काय घडले?

ते संख्येत वाढतच जात आहेत.

---

## 50:02

आपण येशूच्या येण्याची वाट पहात असतांना देवाची अशी इच्छा आहे की आपण पवित्र व त्याचा आदर करणारे जीवन जगावे.आपण त्याच्या राज्याविषयी इतरांना सांगावे अशीही त्याची इच्छा आहे.येशू ह्या पृथ्वीवर असतांना म्हणाला, "माझे शिष्य देवाच्या राज्याची सुवार्ता संपुर्ण जगामध्ये गाजवतील, तेव्हा शेवट होईल."

### येशू पुन्हा येण्यापर्यंत आपणास कसे जीवन जगण्यास देव अपेक्षा करत आहे?

आपण असे जीवन जगावे ज्याने तो आपल्याकडून पवित्र मानल्या जाईल आणि त्याचा आदर केल्या जाईल.

### येशूने काय म्हटले, जगाचा शेवट काय होणार?

येशूचे शिष्य संपूर्ण जगात त्याच्या राज्याची सुवार्ता प्रसार करणार.

---

## 50:03

करण अनेक लोकांनी अजून येशूविषयी ऐकलेले नाही.स्वर्गात जाण्यापुर्वी येशूने ख्रिस्ती लोकांना सांगितले की, ज्या लोकांनी कधीच सुवार्ता ऐकली नाही त्यांना जाऊन सांगा. तो म्हणाला, "जा आणि सर्व राष्ट्रातील लोकांना शिष्य करा!" आणि, "शेते कापणीसाठी तयार आहेत!"

---

## 50:04

येशूने हेही सांगितले, " सेवक आपल्या धन्यापेक्षा थोर नसतो.जसे मला ह्या जगातील अधिका-यांनी माझा द्वेष केला तसेच ते तुमचाही छळ करतील व माझ्या नावासाठी तुमचा वध करतील.जरी तुम्हास ह्या जगामध्ये त्रास व संकटे आहेत तरी धैर्य धरा, कारण मी सैतानावर जो ह्या जगावर अधिकार करतो त्याचा पराभव केला आहे.जर तुम्ही शेवटपर्यंत विश्वासू राहिलात, तर देव तुमचे तारण करील!"

### जग कोणत्या प्रकारे येशूच्या शिष्यांशी वर्तणूक करणार?

जग शिष्यांना सुद्धा त्रास देईल.

### शेवट पर्यंत विश्वासू असेल त्यांसाठी देवाची कोणती प्रतिज्ञा आहे?

त्यानी वाचविण्याची (तारणाची) प्रतिज्ञा दिली.

---

## 50:05

ह्या युगाच्या शेवटी जगातील लोकांचे काय होईल हे स्पष्ट करण्यासाठी येशूने शिष्यांना एक गोष्ट सांगितली.तो म्हणाला, "एका मनुष्याने आपल्या शेतात उत्तम बी पेरले.मग तो झोपेत असतांना, त्याच्या शत्रुने येऊन त्यामध्ये निदण पेरले आणि तो निघून गेला.

### येशूने जगाच्या शेवटाविषयी सांगितलेल्या गहू मध्ये येईल?

जसं शत्रूंनी लावले असावे.

---

## 50:06

जेव्हा त्या बिजास अंकुर फुटू लागले, त्या धन्याच्या सेवकाने म्हटले, 'महाराज, आपण शेतामध्ये उत्तम बीज पेरिले होते.पण आता त्यात निदण कोठून आले?'धन्याने उत्तर दिले, 'शत्रुने ते पेरले असावे.'

### येशूने जगाच्या शेवटाविषयी सांगितलेल्या गहू मध्ये येईल?

जसं शत्रूंनी लावले असावे.

---

## 50:07

सेवकाने आपल्या धन्यास म्हटले, 'आम्ही निदण उपटून टाकू का?'धनी म्हणाला, 'नाही.'जर आपण असे केले तर आपण कदाचित त्याजबरोबर गहूही उपटून टाकाल.हंगामापर्यंत वाट बघा आणि मग निदण जाळून टाकण्यासाठी पेंढ्या बांधून ठेवा; परंतु गहू माझ्या कोठारामध्ये साठवून ठेवा."

### का दास खोड उपटू शकत नाही?

ते आकस्मीतीने उपटू शकत नाही.

---

## 50:08

शिष्यांना ही गोष्ट समजली नाही, म्हणून त्यांनी येशूला समजावून सांगण्यास विनंती केली.येशू म्हणाला, "ज्याने उत्तम बी पेरले, तो मसिहा आहे.शेत हे जग आहे.उत्तम बी म्हणजे देवाच्या राज्यातील लोक."

### चांगले बीज काय दर्शविते?

चांगले बीज देवाच्या राज्याच्या लोकांना दर्शविते.

---

## 50:09

"निदण म्हणजे सैतानाचे लोक.ज्या शत्रूने निदण पेरले, तो शत्रू म्हणजे सैतान.कापणी म्हणजे जगाचा शेवट आणि कापणी करणारे म्हणजे देवाचे दूत."

### धान्य काय दर्शविते?

धान्य जगाचे अंत दर्शविते आणि स्वर्गदूत सैतानाच्या लोकांना एकत्र करणार.

---

## 50:10

"जेव्हा जगाचा शेवट होईल, तेव्हा देवदूत सैतानाच्या सर्व लोकांस न भडकणाऱ्या अग्निमध्ये टाकून देईल, तेथे रडणे व दात खाणे चालेल.तेव्हा आपल्या पित्याच्या राज्यात नीतिमान सूर्याप्रमाणे प्रकाशतील."

#### धान्य काय दर्शविते?

धान्य जगाचे अंत दर्शविते आणि स्वर्गदूत सैतानाच्या लोकांना एकत्र करणार.

#### जगाच्या शेवटी शैतानाच्या लोकांचे काय होईल?

ते धगधगत्या अग्नीत टाकले जातील तेथे खूप त्रास भोगतील.

---

### 50:11

येशूने हेही सांगितले की जगाच्या शेवटापूर्वी तो या पृथ्वीवर परत येईल.जसा तो स्वर्गात घेतला गेला, तसाच तो येईल, अर्थात त्याला एक शरीर असेल व तो आकाशातील ढगावर बसून येईल.जेव्हा येशू परत येईल, प्रत्येक ख्रिस्ती जो मेलेला आहे तो मरणातून उठेल व अंतराळामध्ये येशूला भेटेल.

#### येशू कोणत्या रुपात पृथ्वीवर परतणार?

जसे त्यांनी सोडले होते तसेच तो शरीरात मेघारुढ होऊन येईल.

---

### 50:12

तेव्हा जिवंत असलेले ख्रिस्ती मेलेल्यांतून उठलेल्या ख्रिस्ती बांधवांस भेटण्यासाठी सामोरे जातील.तेथे ते सर्व येशूबरोबर राहतील.त्यानंतर, येशू आपल्या लोकांबरोबर परिपुर्ण शांतीमध्ये व एकतेमध्ये सर्वकाळ राहील.

#### येशू आल्यावर सगळ्या ख्रिस्ती लोकांचे काय होईल?

जे मृत झाले आहेत ते उठविले जातील

---

### 50:13

येशूने आपणावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकास एक मुकुट देण्याचे आश्वासन दिले आहे.ते त्या ठिकाणी राहतील व देवाबरोबर पुर्ण शांतीत सर्वकाळ राज्य करतील.

---

## 50:14

परंतु येशूवर विश्वास न ठेवणाऱ्या प्रत्येकाचा देव न्याय करील.तो त्यांना नरकात टाकील, ज्या ठिकाणी सर्वकाळ रडणे व दु:खाने दात खाणे सर्वकाळ चालेल.त्यांना न विझणाऱ्या अग्निमध्ये जाळून टाकण्यात येईल व किडे त्यांना सर्वकाळ खात राहतील.

---

## 50:15

जेव्हा येशू परत येईल, तो सैतान व त्याच्या राज्याचा नाश करील.तो सैतानाला नरकात टाकील, ज्या ठिकाणी तो सर्वकाळ जळत राहील, त्याच्याबरोबर ज्यांनी त्याच्या मागे जाण्याचे निवडले व देवाची आज्ञा मानली नाही तेही असतील.

### येशू परतल्यानंतर सैतानाचे काय करणार?

येशू सैतानाला अग्निकुंडात टाकणार तो तेथे सर्वदा जळत राहील.

---

## 50:16

आदाम आणि हव्वेने देवाच्या आज्ञेचे उल्लंघन केल्यामुळे पाप ह्या जगात आले व देवाने त्याचा नाश करण्याचा निर्णय घेतला.परंतु एक दिवस देव परिपूर्ण असे नवे आकाश व नवी पृथ्वी बनविणार आहे.

---

## 50:17

येशू आणि त्याचे लोक नवीन पृथ्वीवर राहतील, व तो अस्तित्वात असणाऱ्या सर्व गोष्टींवर सर्वकाळ राज्य करेल.तो त्यांचे सर्व अश्रू पुसून टाकील व त्या ठिकाणी कुठलाही त्रास, शोक, रडणे, दुष्टाई, दु:ख किंवा मृत्यु नसेल.येशू आपल्या राज्यामध्ये शांतीने व न्यायाने व राज्य करील व तो आपल्या लोकांबरोबर सर्वकाळ राहील.

### नव्या स्वर्गात व पृथ्वीवर कोणत्या प्रकारचे जीवन असेल?

येशू सर्वदा शासन करेल, शांती व न्यायाने, आणि आणखी दु:ख नसणार.

# योगदानकर्ते

## OBS translationQuestions योगदानकर्ते

Amit Kumar Aryan
Merlyn Easa
Shojo John
BCS

## Open Bible Stories योगदानकर्ते

Amit Kumar Aryan
Merlyn Easa
Shojo John